म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक मोरेश्वर सखाराम चितळे. | सन १८९ |
|---|---|---|
| चरित्र | | |
| संग्रहालय क्रमांक ८० २१३ | पुस्तकाचें नांव महाराज्ञी व्हिक्टोरिया २१३ | |

८०
चरित्र

२५/११/६३



# महाराज्ञी व्हिक्टोरिआ

## ह्यांचें चरित्र.

हें

पुस्तक

अनेक लेखांच्या व ग्रंथांच्या आधारानें

मोरेश्वर सखाराम चितळे

ह्यांणीं

लिहिलें

तें

मुंबई येथें 'शारदाक्रीडन' छापखान्यांत

छापिलें.

सन १८९७

( सर्व हक्क राखिले आहेत. )

" मुंबई ग्याझेट " नामक दैनिक इंग्रजी पत्राचा व
कित्येक विद्वानांचा सदरहू पुस्तकावर
अनुकूल अभिप्राय
आलेला आहे.

**पुस्तक मिळण्याची ठिकाणें:—**

मेसर्स वझे ॲन्ड को, गिरगांव मुंबई.

मेसर्स राधाबाई. ए. सगुण, काळकादेवी रोड मुंबई.

हें

पुस्तक

# सर दिनशा माणिकजी पेटिट

नाईट, ब्यॅरोनेट, इत्यादि, इत्यादी,

ह्यांस

त्यांच्या अंगीं वसत असलेल्या

अविश्रांत उद्योग

अविकार्य राजनिष्ठा

अमर्याद औदार्य

निरपेक्ष दातृत्व

व

विद्या प्रोत्साहन बुद्धी

ह्या

आणि अशाच दुसऱ्या सद्गुणांच्या

अभिनंदनार्थ

अत्यादरपूर्वक

अर्पण केलें असे.

पुस्तककर्ता.

# प्रस्तावना

दयाळू, भाग्यशालिनी, अशा महाराज्ञी व्हिक्टोरिआ ह्यांची असंख्यात चरित्रें मोठमोठ्या विख्यात आंग्लदेशस्थ ग्रंथकारांनीं लिहिलेली असतां सांपत्तिक व मानसिक दृष्ट्या विचार केला असतां ज्याची स्थिति असमाधानकारक ठरेल अशा मज सारख्यानें तेंच काम कां म्हणून हातीं घेतले हा प्रश्न सदर पुस्तक हातीं घेतांच सकृतदर्शनीं उद्भवेल. ह्याचें उत्तर अगदीं साधें आहे. ह्या पुस्तकांत नमूद केले गेले म्हणूनच महाराज्ञीच्या अंगीं असलेल्या गुणांस महत्व येऊन तिचें वैभव वाढेल असें बिलकुल म्हणणें नाहीं. त्या गुणांचें महत्व मी नव्यानें गावयास पाहिजे असें नाहीं. पुस्तक लिहिण्याचें कारण आत्मगत आहे. महाराज्ञी चक्रवर्तिनी असून अखिल स्त्रीजातीस ललामभूत आहे असा ग्रह तिच्या उदार चरितांतील गोष्टींशीं परिचित अशा गृहस्थांचें मनामध्यें उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. सदर पुस्तक लेखन व प्रकाशन हा ह्याच ग्रहाचा परिणाम होय. आमच्या समजुतीप्रमाणें व— तशी समजूत असणें अयथार्थ नाहीं—राजा हा सर्वशक्तिमत् व विश्वचालक जो परमेश्वर त्याचा ह्या भूलोकचा प्रतिनिधि होय. ज्याप्रमाणें ह्या अखिल विश्वाचा चालक संपूर्ण वस्तुजाताशीं समदृष्टीनें दयाळू व न्यायी वर्तन ठेवितो त्याप्रमाणेंच ह्या भाग्यशाली राज्ञीचे लहाना पासून थोरापर्यंत दयाळू व न्यायी वर्तन आहे.

ह्मणून, ह्या डायमन्ड ज्युबिली उत्सवाच्या प्रसंगीं माझ्या राजनिनिष्ठतेचें द्योतक ह्मणून सदरहू चरित्र अत्यादरपूर्वक मी महाराज्ञींचें चरणीं सादर करीत आहे.

मुंबई ७ खेतवाडी
नंबर १२६, ता. २५
जून सन १८९७.

मो० स० चि०

# अनुक्रमणिका.


| | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | उपोद्घात | १ |
| २ | जनन, पीठिका | ६ |
| ३ | बालपण | १४ |
| ४ | शिक्षण | २१ |
| ५ | राणीसरकारचा दयाळुपणा | २७ |
| ६ | पितृभक्तीचें उदाहरण | २९ |
| ७ | राज्यपदारूढ होण्यापूर्वीच्या कांहीं गोष्टी | ३२ |
| ८ | आकस्मिक् प्रसंगांतून निभावणें | ३७ |
| ९ | भावी श्वशुराचें आगमन | ३९ |
| १० | कायदेशीर रीतीनें सज्ञान होणें. | ४१ |
| ११ | चुलत्याचें निधन | ४३ |
| १२ | राज्यपदारोहण | ४५ |
| १३ | राज्याभिषेक | ४९ |
| १४ | प्रिन्स आलबर्ट यांचें पत्र | ५२ |
| १५ | क्षमाशीलता | ५४ |
| १६ | प्रिन्स आलबर्ट ( राज्ञीपती ) ह्यांचें संक्षिप्त चरित्र | ६० |
| १७ | लग्न ठरलें | ६५ |
| १८ | लग्न | ७२ |
| १९ | अपत्यें | ७६ |
| २० | जीवितावर घाले | ८१ |
| २१ | राज्ञी व त्यांचे पति यांचा नित्यक्रम | ८६ |
| २२ | स्काटलंडदेशीं गमन | ८९ |
| २३ | महाराणीसरकारचा पुतळा | ९२ |

२४ श्वशुराचा परलोकवास .... .... .... .... .... ... ९४
२५ जंगी प्रदर्शन .... .... .... .... —... .... .... ९७
२६ महाराणीसरकारचा जाहिरनामा... ... —... .... .... १०१
२७ मातोश्रींचा कैलासवास .... .... .... —... .... .... १०८
२८ राज्ञीपतीचा मृत्यु .... .... .... .... .... .... .... १११
२९ ड्युक आफ् एडिनवरो ह्यांचें आगमन.... .... .... .... ११४
३० प्रिन्स आफ् वेल्स ह्यांचें दुखणें .... .... .... .... .... ११८
३१ ” ” ” हिंदुस्थानांतील आगमन .... .... .... १२०
३२ इ. स. १८७७तील दरबार.. .... .... .... .... .... १२५
३३ [illegible] .... .... .... .... १३२
३४ महाराज्ञीपुत्र ड्युक आफ् आल्बनी ह्यांचा मृत्यु. .... .... १३४
३५ पंचाशद्वार्षिकोत्सव .... .... .... .... .... .... .... १३६
३६ ड्युक आफ् कॅनाट ह्यांचें स्वदेशीं गमन .... .... .... १३९
३७ प्रिन्स व्हिक्टर ह्यांचा मृत्यु .... .... .... .... .... १४२
३८ महाराणीसरकारचा पणतु .... .... .... .... .... .... १४५
३९ जामातृनिधन. .... .... .... .... .... .... .... १४६
४० उपसंहार.... .... .... .... .... .... .... .... १४७



# महाराज्ञी व्हिक्टोरिआ ह्यांचें चरित्र.

भूपाला बहवोऽभवन्निह पुरा दक्षाः प्रजापालने ।
तेष्वेकाजनि लोकरक्षणरता राज्ञीलिझाबेथ् इति ।।
लोकस्तुष्टिमितो न तैर्नच परां कोटिं कलानां यथा ।।
रक्षन्ती खलु मेदिनीं जन इतो भद्रं हि विक्टोरिया ।।

इंग्लंड[1] देशाच्या आजपर्यंतच्या इतिहासाचें अवलोकन केलें तर ज्या राज्यकर्त्यांच्या कारकिर्दींत प्रजेस पुष्कळ सुख मिळून देशाची हरएक बाबतींत उन्नति झाली, अशा फक्त दोनच कारकिर्दी आहेत.

---

१ आमच्या प्रिय वाचकांपैकीं बहुतेकांस **इंग्लंड** ह्मणजे काय ह्याची कल्पना असेलच; तथापि, **महाराज्ञी** सरकारच्या बालप्रजेच्या हातीं सदरहू पुस्तक गेल्यास त्यांना **इंग्लंड**संबंधीं यथातथ्य कल्पना एकदम येणार नाहीं; ह्यास्तव, त्यासंबंधें थोडक्यांत स्पष्टीकरण करतों तें येणेंप्रमाणें:—**यूरोपखंडा**च्या वायव्येस **ग्रेटब्रिटन** नांवाचें एक बेट आहे. त्याचे तीन भाग आहेत; मोठा भाग तो **इंग्लंड** देश. आपल्या **भरतभूमी**पासून **इंग्लंड** देश सुमारें १२,००० मैल वायव्य दिशेस आहे. भूतलाच्या पाठीवर जे कांहीं सुधारलेले व उन्नतावस्थेंत असलेले देश आहेत त्यांत **इंग्लंड**ची गणना आहे.

ह्या दोन्हीही कारकिर्दींत राज्याधिकार स्त्रियांचें हातीं आहे. एक इलिझाबेथ्[१] राणीसरकारची कारकीर्द; व दुसरी हल्लींची दयाळू व भाग्यशालिनी **महाराज्ञी व्हिक्टोरिआ** ह्यांची होय. **नॉर्मन[२]** लोकांनीं **इंग्लंड** काबिज केल्यापासून **इंग्लंडचे** राज्यपदावर जे कांहीं राज्यकर्ते आरूढ झाले, त्या सर्व राजमंडळांत पांच सहाच राज्यकर्त्यांस जगन्नियंत्यानें **महाराज्ञी** सरकाराइतके आयुष्यकालक्रमणेचे दिवस इह लोकांत काढूं दिले. हे सहा राज्यकर्ते ह्मणजे **इलिझाबेथ्**, **जेम्स[३]**

---

१ **ट्यूडर** घराण्यांतील ज्या पांच व्यक्तींचे हातीं **इंग्लंडची** राज्यसत्ता होती त्यांतील **इलिझाबेथ्** राणीसरकार ह्या शेवटच्या होत. ह्यांचे कारकिर्दींत **प्रॉटेस्टन्ट** धर्माचें पुनरुज्जीवन झालें; व्यापाराला तेजी आली; **स्पेन** देशाहून "**इनव्हिनसिबल आरमेडा** नांवाचें" **इंग्लंडावर** आरमार आलें होतें, त्याचा समूळ नाश करून त्या लोकांस **इंग्लंडनें** दे माय धरणीठाय करावयास लावलें; सुप्रसिद्ध **सरफ्रान्सिस ड्रेक** ह्यांनीं पृथ्वीप्रदक्षिणा केली; आमच्या **भरतभूमिरूपी** कामधेनूचें प्रभुत्व दयाळू **इंग्लंडाकडे** जाण्यास जी कारणीभूत झाली अशी "**ईस्ट इंडिया कंपनी**" स्थापली गेली; व **शेक्सपीअर, बेकन** इत्यादि विद्वद्रत्नें प्रकाशित झालीं.

२ **नॉर्मन लोकांपूर्वी ॲंग्लो-सॅक्सन** घराण्यांतील राजे **इंग्लडचे** प्रभू होते; ह्या घराण्याच्या पूर्वी **इंग्लंडचें** प्रभुत्व **रोमन** लोकांकडे होतें. **ॲंग्लो-सॅक्सन** घराण्याचा शेवटचा पुरुष **हॅरोल्ड** हा **हेस्टिंग्ज** येथील झालेल्या लढाईत पराजित होऊन मृत्युमुखीं पडल्यावर **नॉर्मन लोक इंग्लडचे** राजे झाले. ह्या **नॉर्मन** घराण्याचा प्रथम पुरुष **वुईल्यम दि कॉंकरर** हा होय.

३ हे **स्टुअार्ट** घराण्याचे ४ थे पुरुष; ह्यांनीं १६८५ पासून १६८८ पर्यंत राज्य केलें.

(दुसरा), जॉर्ज (दुसरा), जॉर्ज (तिसरा), जॉर्ज (चवथा), व वुइल्यॅम् (चवथा) हे होत.

महाराणी व्हिक्टोरिआ ह्यांचे राज्यांत इतर कोणत्याही पूर्वीच्या राज्यापेक्षां शास्त्र व कला हीं उन्नति पावलीं आहेत. ज्या ज्या प्रदेशावर ह्यांचें साम्राज्य आहे त्या त्या प्रदेशांतील सामाजिक स्थितींत इष्ट असे बदल वेळोवेळीं होत गेल्यामुळें आजमितीला ह्यांचे छत्राखालीं असणारी प्रजा खऱ्या समाजसुखाचा पूर्ण उपभोग घेत आहे. न्यायदेवतेची सूक्ष्मदृष्टि चोहोंकडे सारखी पडत असल्यामुळें, कायद्याची रचना व बजावणी ह्या दोन्ही गोष्टी प्रजेला हितकर अशा रीतीनें होत आहेत. यापूर्वी समाजामधील फारच थोड्या लोकांचीं मनें विद्याविभूषित असल्यामुळें राजकीय गोष्टींसंबंधें बऱ्याच लोकांना अनभ्यस्त रहावें लागे. हल्लीं तशी स्थिति नाहीं. महाराणीच्या राज्यांत आह्मांस विद्यामृताचा अपरिमित लाभ होऊन सरस्वतीभांडाराच्या निरनिराळ्या भागांत आमचा प्रवेश

---

१ ह्यांनीं १७२७ पासून १७६० पर्यंत राज्य केलें; हे हॅनोव्हरिअन घराण्याचे दुसरे पुरुष होत.

२. १७६० पासून १८२० पर्यंत ह्यांची कारकीर्द होती. हे जॉर्ज दुसरे ह्यांचे नातू.

३ हे तिसरे जॉर्ज ह्यांचे चिरंजीव. ह्यांनीं १८२० पासून १८३० पर्यंत राज्य केलें. हे हॅनोव्हरिअन घराण्याचे चवथे पुरुष होत.

४ आपल्या महाराणी सरकारचे हे चुलते. ह्यांनीं १८३० पासून १८३७ पर्यंत राज्य केलें. तिसरे जॉर्ज राजांचे हे बंधू होत.

ी हल्लींची दयाळू व
झाला आहे. आह्मांपैकीं विद्वन्मंडळास ' होय. नॉर्मने लो-
राज्यकर्त्यांस आमची खरी स्थिति त्या म द्वावर जे कांहीं रा-
करून कळविली जात आहे. ज्याप्रमाणें ' राज्यकर्त्यांस
अम्मल आह्मांवर चालू लागल्यापासून नानान
पुष्कळ लोकांचीं मनें विद्याविभूषित होत गेलीं त्याचप्रमाणें इंग्लंडास
स्थिति झाली. सरस्वतीचा पूर्ण पगडा इंग्लंडांतही ह्याच राज्ञीच्या
एकछत्री अमलाखालीं बसला असें इंग्लं... ल इ. स. १८३७
सालचें "पिकविक पेपर्स" नांवाचें मासिक पुस्तक ... पाहिलें असतां सो-
सहज दिसून येतें. सदर मासिक पुस्तकांत त्यावेळीं वाचकांचे
ईसाठीं स्पष्टीकरणार्थ ह्मणून टीका जरूर द्यावी लागत असे. हल्लीं
लेख समजण्याकरितां तशी टीका द्यावी लागत नाहीं. तसेंच, आगगाडी, तारायंत्र, आगबोट इत्यादि व्यापारोपयोगी व अत्यंत देशहिताच्या अशा ज्या सुधारणेच्या अनंत गोष्टी आपणांस सांप्रत देशाच्या बहुतेक भागांत दिसत आहेत त्याही आपणांस **महाराज्ञी**च्या राज्यांतच प्राप्त झालेल्या आहेत. मुद्रणकला व वर्तमानपत्रें ह्यांचा दिवसेंदिवस उत्कर्ष होत चालला आहे, ही गोष्टही **महाराज्ञी**च्या एकछत्री राज्याचें फल होय. विचारस्वातंत्र्याचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा आपणांस योग्य तो उपयोग करण्याची मोकळीकही ह्यांचेच राज्यांत मिळाली आहे. जगाच्या निरनिराळ्या

१ **राष्ट्रीय सभा** व वर्तमानपत्रांची उन्नतावस्था ह्या व इतर गोष्टी सदर विधानाच्या स्पष्टीकरणार्थ पुरे आहेत.

(दुसरा), जॉर्ज (दुसरा) विचारांची आपणांस माहिती मिळत व वुइल्यॅम् (चवथा) हे चारविचारांत देशाच्या उन्नतीला अपाय-

महाराज्ञी व्हिक्टोरि आहेत त्या काढून टाकून त्यांत योग्य ते राज्यापेक्षां शकून देशोन्नति करण्याकडे आमचीं मनें ह्यांचेच प्रदेशांकिर्दीत लागलीं आहेत.

असो, ज्यांच्या राज्यांत वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें प्रजेला सुख होऊन दिवसेंदिवस देशाची उन्नति होत चालली आहे अशा भाग्यशाली, सद्गुणसंपन्न व दयाळू महाराज्ञी व्हिक्टोरिआ ह्यांचें चरित्र आह्मीं आपल्या वाचकांपुढें सादर करीत आहों.

# चरित्रनायिकेचें जनन, मातापितरें, पितृनिधन,
# व
# पूर्वपीठिका.

सुषुवे मेरि लुइसा कन्यकां सुमनोरमाम् ॥
सकलानन्ददां प्राची लेखां चान्द्रमसीमिव ॥

अलेकझांड्रिआ व्हिक्टोरिआ किन् ऑफ् ग्रेटब्रिटन् ऍन्ड आयर्लंड, एम्प्रेस ऑफ् इंडिया[1] ह्मणजे आपल्या दयाळू महाराज्ञी व्हिक्टोरिआ ह्यांचा जन्म ता. २४ मे सन १८१९ रोजीं "केनसिंगटन[2] प्यॅलेस" नांवाच्या राजवाड्यांत झाला.

---

१ एम्प्रेस ऑफ इंडिया-(केसर-इ-हिंद) हा किताब इ. स. १८७७ त महाराणी सरकारनीं धारण केला. आह्मां भारतीयांस हा किताब महशूर व्हावा ह्मणून दिल्ली येथें एक वडा दरबार भरला होता. ह्या दरबारासंबंधीं सविस्तर हकीकत ह्यापुढें एका स्वतंत्र प्रकरणांत वाचकांस सादर केली आहे.

२ हा फार प्राचीन काळचा राजवाडा आहे. हा बांधण्याचें काम अंशतः वुइल्यम् (तिसरे) ह्यांचे हातून झालें. वुइल्यम् (तिसरे) व त्यांच्या पत्नी ह्यांचा अंत ह्याच वाड्यांत झाला. तसेंच (दुसरे) जॉर्ज, ह्यांचेंही ह्याच वाड्यांत देहावसान झालें. आपल्या महाराणी सरकार ह्याच वाड्यांत बाळ-

ह्यांच्या वडिलांना **एडवर्डसाहेब** ह्मणत असत. मातोश्रींचें नांव **व्हिक्टोरिआ मेरी लुइसा** होतें. एडवर्डसाहेब हे इंग्लंडचे तिसरे जॉर्ज ह्यांचे चतुर्थ चिरंजीव. **सॅक्सोबर्ग** सालफेल्ड येथील ड्यूक **फ्रान्सिस साहेब** हे आपल्या **महाराणी** सरकारच्या मातोश्रींचे वडील. **व्हिक्टोरिआ मेरी लुइसा** यांचा प्रथम विवाह **लेनिन्जेनचे** युवराज **चार्लस् लुइस्** यांजबरोबर ता० २१ डिसेंबर सन १८०२ सालीं झाला. **चार्लस लुइस्** हे ता० ४ जुलै सन १८१४ रोजीं मृत्यु पावले. पुढें, तद्देशीय धर्म व रीति यांस अनुसरून **व्हिक्टोरिआ मेरी लुइसा** यांनीं ता० ११ जुलै सन १८१८ रोजीं **एडवर्डसाहेब** ह्मणजे चरित्रनायिकेचे जनक यांशीं द्वितीय संबंध केला. विवाह झाल्यापासून जी कांहीं कालक्रमणा **एडवर्डसाहेब** यांनीं केली तींतील बरीच मुख्यत्वेंकरून **क्लेरमाउन्ट** येथें केली.

इ. स. १८१९।२० सालचा हिंवाळा नेहमींपेक्षां जास्त त्रासदायक वाटल्यावरून आपली कन्या व पत्नी यांसह **एडवर्डसाहेब** **सिडमॉउथ** शहरीं गेले. तेथें गेल्यावर फार दिवस लोटले नाहींत

पणीं वाढल्या; व चवथे **वुइल्यम्** राजे निवर्तल्याची दुःखद वार्ता ह्याच ठिकाणीं त्यांस कळली. सदर राजवाड्यांत विशेषरीत्या पहाण्याजोगें असें कांहीं नाहीं. **महाराणी** सरकारच्या कन्या **प्रिन्सेस लुईस** व त्यांचे पति **मार्किस आफ लोर्न** हीं उभयतां **लंडन** शहरीं असतांना अगदीं परवांपर्यंत ह्याच राजवाड्यांत राहत असत. राजवाड्यांत राजवाड्याचें ह्मणून एक उपासनामंदीर आहे. त्या मंदिरांत दर रविवारीं उपासना होते.

तोंच ता० २३ जानेवारी सन १८२० रोजीं निर्दय काळानें **एडवर्ड साहेबांवर** धाड घातली. मृत्युसमयीं **एडवर्ड साहेबांचे** वय अवघें ५३ वर्षांचें होतें.

साधारणतः कोणत्याही साधारण मनुष्याला दुष्ट काळानें आपल्या जाळ्यांत धरून इह लोकांतून दूर नेलें ह्मणजे त्याचे पश्चात् त्याजबद्दल कांहीं विवक्षित लोकांस वाईट वाटतेंच. त्यांत जवळचे नातलगांस व दररोजच्या सहवासांतील मनुष्यांस जास्त वाईट वाटतें; व ज्याचा उदरनिर्वाह अगर जगांत मिळणारा मान मृत मनुष्याच्या अस्तित्वावरच केवळ अवलंबून असतो त्यास तर सर्वांपेक्षां अधिक वाईट वाटतें. ही साधारण मनुष्याची गोष्ट झाली. आतां, अर्थात्च ज्याचा नांवलौकिक जगांत पुष्कळ असतो, ज्याची वर्तणूक सर्व लोकांपाशीं समदृष्टीनें असते, ज्याचे अंगीं परोकारबुद्धि साक्षात् असते, जो न्यायी, स्वार्थत्यागी, नीतिमान्, बुद्धिमान् व ह्मणूनच लोकप्रिय होतो त्याचे मृत्यूनें तर त्याचे नातलगांसच काय परंतु तो ज्या जनसमूहास माहीत असतो त्या संपूर्ण जनसमूहास फार वाईट वाटल्यावांचून राहत नाहीं. **राणीसरकारचे** वडील हे वर नमूद केल्यापैकीं दुसऱ्या तऱ्हेचे होते; ह्मणून ते ज्याला ज्याला माहीत होते त्याला त्याला त्यांचे मृत्यूनें अत्यंत दुःख झालें. ही इतर लोकांची स्थिति झाली; आतां खुद्द **राणीसरकारचे** मातोश्रींवर तर ही एक आकाशाची कुऱ्हाडच पडली. त्या वेळीं त्यांची मनोवृत्ति कशी झाली असेल ह्याची कल्पना वाचकांनींच करावी.

राणीसरकारचे वडील मोठे धार्मिक व उपकारी असत. सार्वजनिक व धर्मार्थ अशा निरनिराळ्या ६२ संस्थांचे हे चालक अगर प्रतिचालक होते. स्वदेशप्रीति तर त्यांचे अंगीं जागत्या ज्योतीप्रमाणें वसत होती; आणि ह्मणूनच त्यांच्या स्वजातीयांकडून त्यांना बहुमान मिळत असे. एडवर्डसाहेबांचा स्वभाव फार दयाळू असे. ह्या त्यांच्या गुणांविषयीं एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. हे सिड्माउथ शहरीं आपल्या कन्येसह गेले हें वर सांगितलेंच आहे. ह्या शहरीं ते ज्या ठिकाणीं रहात होते त्या ठिकाणाजवळील एका वृक्षावर कांहीं पक्ष्यांचा समुदाय बसला आहे असें एका तरुण नवशिक्या मनुष्यानें पाहिल्यावरून त्याला त्या पक्ष्यांपैकीं कांहीं आपल्या भक्ष्यस्थानीं पडावे अशी इच्छा उत्पन्न झाली; व ह्मणून त्यानें त्या पक्ष्यांवर बार सोडिला. तो बार त्या पक्ष्यांच्या सुदैवानें त्यांजवर न जातां एडवर्डसाहेबांच्या वाड्याच्या तावदानांतून त्यांचे कन्येचे ( आपल्या दयाळू व्हिक्टोरिआ ह्यांचे ) अंगाजवळून पलीकडे गेला. ह्यावेळीं आपल्या राणीसरकार दाईच्या हस्तांत बालक्रीडा करीत होत्या. आपल्या आवडत्या कन्येवरील अशातऱ्हेचा अपघात टळला असें पाहून कोणत्याही मातापितरांस आनंद हा वाटणारच. ह्याचवेळीं उलटपक्षीं हेंही मनांत आणलें पाहिजे कीं, जो मनुष्य आडदांडपणाच्या वर्तनानें आपल्या तान्ह्यास गतप्राण करण्याच्या बेतांत होता, त्या मनुष्यावर आपल्या क्रोधाग्नीचे झळझळीत निखारे फेंकून त्याजला कांहीं कडक शासन करावें असें साधारण मातापितरांचे

मनांत आल्यावांचून राहणार नाहीं; परंतु **एडवर्डसाहेब** स्वभावतः दयाळू असल्यामुळें त्यांनीं त्या आडदांडपणानें वागणाऱ्या बांडास फक्त खरमरीत ताकीद देऊन सोडून दिलें.

**एडवर्डसाहेबांच्या** शरीराची ठेवण उंच, सुदृढ, व भव्य अशी होती. त्यांच्या खाजगी वर्तनाचा विचार करूं लागलें असतां नांव ठेवण्यासारखी एकही गोष्ट त्यांच्यामध्यें दिसत नाहीं. **एडवर्डसाहेबांनीं** युद्धकलेंत प्रावीण्य संपादिलें होतें.

**एडवर्डसाहेब** मृत्यू पावल्यावर दोन दिवसांनीं पतिवियोगाच्या दुःखानें विव्हळ झालेल्या आपल्या भगिनीस व आपल्या आवडत्या भाचीला घेऊन **लिओपोल्ड** साहेब **लंडन**[१] शहरीं आले. येथें आ-

---

१ **लंडन** शहर **इंग्लंडची** राजधानी आहे, ही गोष्ट बहुतेक वाचकांस माहीत असेलच. हें शहर **तेम्स** नदीच्या कांठीं आहे. ह्या शहरांत प्रथमतः **ब्रिटन** लोकांनीं वसाहत केली. ही वसाहत कधीं केली ह्याजबद्दल निश्चया--त्मक रीतीनें कोठें चांगलासा पुरावा मिळत नाहीं. **ब्रिटन** लोकांची वसाहत होती त्यावेळीं शहरांत कांहीं झोंपड्या होत्या. त्यावेळीं जमीन दलदलीची असून शहराचे आसपास जंगल असावें अशी कल्पना सांप्रत इमारतींचे खोल पाये खणतांना दृष्टिगोचर होणाऱ्या जमिनीच्या स्वरूपावरून करितां येते. **पुढें रोमन** लोकांची **ब्रिटन** मध्यें वसाहत ख्रिश्चन शकाच्या सुरवातीला झाली. इ. स. ६२ सालीं **निरो बादशहाचे** वेळीं शहरांत देशोदेशचे व्यापारी राहूं लागले. ह्यानंतर **अँग्लो-सॅक्सन** राजांनीं **लंडन** शहरास आपली राजधानी केली, व त्यावेळेपासून महत्वाच्या मानानें **लंडन** शहराची भरभराटी होत चालली. १३ व्या १४ व्या शतकांत **लंडनस्थांवर** परमेश्वराचा प्रकोप होऊन त्यांचें आगीमुळें फार नुकसान झालें. दुष्काळामुळें व पटकीमुळें लाखों

त्यावर पार्लमेन्ट सभेच्या दोन्ही शाखांनीं राणीसरकारचें मतो-

प्राणी मृत्युमुखीं पडले. सन १६६४–६६ पर्यंत सर्व शहरभर मृत्यूचें ठाणें बसल्यामुळें जिकडे तिकडे भयाण दिसूं लागलें. ह्या दोन सालांत अदमासें १००,००० नगरवासी मरण पावले. ह्या भयंकर प्रसंगांतून नागरिक निघाले तों १६६६ च्या सपटंबर महिन्यांतच १६,००० घरांची अग्निमुखांत आहुति पडल्यामुळें लोक हवालदील झाले, व बाहेरचा कांहीं भाग ओसाड पडला. पुढें कांहीं काळानें सुंदर व भव्य अशा इमारती उभारल्या जाऊन शहरास शोभा आली. ह्याच वेळीं **सेन्ट पॉलस क्याथेड्रेल** बांधलें. शहर ह्मणून **लंदन** शहरांत आज जी अद्वितीय शोभा दिसत आहे तिचा पाया सन. १७१४ चे सुमारास ह्मणजे **राज्ञी ॲनी** ह्यांचे कारकिर्दीत पडला. सन १७०३ सालीं **लंदन** शहरीं एक भयंकर वादळ झालें त्यावेळीं २,०००,००० पौंडांचें नुकसान झालें. १८ व्या शतकाच्या द्वितीयार्धभागामध्यें **लंदन** शहरीं पुष्कळ सुंदर रस्ते व मनोहर इमारती बांधल्या गेल्या. पुढें, १९ व्या शतकांत ज्या कांहीं हरएक बाबतींत सुधारणा झाल्या त्यांचें यथायोग्य वर्णन करूं लागल्यास प्रस्तुत पुस्तका एवढें दुसरें एक स्वतंत्रच पुस्तक होईल. सन १८९१ सालीं झालेल्या पाहणी अन्वयें त्या सालीं **लंदनांत** ४,२११,०५६ इतकी लोकसंख्या होती. सरासरीनें पाहतां दरसाल ७०,००० लोकवस्ती वाढते.

१ ही एक सभा आहे. ह्या सभेचे दोन पोट भाग आहेत. एक बडे लोकांची व दुसरी रयतेच्या प्रतिनिधिमंडळाची. देशासंबंधें कोणताही कायदा ठरवावयाचा असला तर राजा, बडे लोकांची सभा व प्रतिनिधींची सभा ह्या तिघांच्या संमतीशिवाय ठरत नाहीं; ह्मणजे तिघांपैकीं एकजरी प्रतिकूळ झाला तरी तो कायदा पसार होत नाहीं. बडे लोकांच्या सभेला **हाऊस् आफ् लॉर्डस्** व प्रतिनिधींच्या सभेला **हाऊस् आफ कॉमन्स्** अशा संज्ञा आहेत. ह्या बडे लोकांच्या सभेंत **ड्यूक, मार्किस, अर्ले, व्हैकाऊन्ट, बॅरन** असे किताब धारण करणारे, **आर्चबिशप** ( धर्माध्यक्ष,) **बिशप** ( ध[illegible] गचे हाताखालील ) ह्यांचाच प्रवेश होतो; तसेंच गादीवर असलेला

श्रीस सांत्वन पत्रिका सादर केल्या; पैकीं **कॉमन्स** शाखेची पत्रिका

राजा व त्याच्या पश्चात् राजा होण्याचा ज्याचा हक्क असतो अशांस ह्या सभेंत बसतां येत नाहीं. **ड्यूक, मार्किस, अर्ल, व्हैकाऊन्ट** व **बॅरन** ह्या सगळ्या पदव्यांच्या वडे लोकांस **लॉर्डांच्या** सभेंत बसण्याचा वंशपरंपरेनें अधिकार पोंचतो. प्रतिनिधींच्या सभेंत असणाऱ्या प्रतिनिधींची योजना प्रजेकडून केली जाते. जो आपल्या तर्फेनें **पार्लमेन्ट** सभेंत आपलें हित वाढविण्याचे इच्छेनें बोलेल व कळकळीनें वागेल असें प्रजेला वाटतें त्यासच प्रजा आपल्या तर्फे प्रतिनिधि नेमते. आपल्या तर्फे प्रतिनिधि नेमण्याचा हक्क सर्वच प्रजेस नाहीं; कांहीं एक विवक्षित स्थितींतील प्रजेसच ते नेमण्याचा हक्क आहे. **पार्लमेन्ट**च्या सभेंत जाऊन सभासद ह्या नात्यानें काम बजावणाऱ्यास कांहींच वेतन मिळत नाहीं. **पार्लमेन्ट**ची अंशभूत कल्पना **अँग्लोसॅक्सन** अम्मल **इंग्लडांत** होता तेव्हांपासूनच आहे असें दिसतें. **अँग्लो-सॅक्सन** अमलामागून **नॉर्मन** अमलांतही त्याची कल्पना लयास गेलेली दिसली नाहीं; व पुढें तर **एडवर्ड** (१ ला) ह्याच्या कारकिर्दीत **पार्लमेन्ट**चें हल्लीं जें स्वरूप दिसत आहे तें थोडथोडें दृष्टिगोचर होऊं लागलें. **एडवर्ड** (३ रा) ह्याच्या कारकिर्दीत पूर्वी जें **पार्लमेन्ट** कारणप्रसंगीं भरत असे तें जाऊन प्रतिवर्षी भरूं लागून त्यांत हल्लीं जे दोन पोट भाग आहेत ह्मणून वर लिहिलें आहे ते दोन पोटभाग झाले. पांचव्या **हेनरी**च्या कारकिर्दीपर्यंत राजसत्ता जोरावार होती; परंतु, साहव्या **हेनरी**चे वेळीं सर्व व्यवस्था सुरळीत चालूं लागली. तिसऱ्या **जॉर्जा**चे अंमलाखालीं **पार्लमेन्ट** मध्यें देशहितास इष्ट असे फेरफार होऊन संस्था महत्व पावली. नंतर सन १८३२ सालीं **रिफॉर्मबिल** होऊन **पार्लमेन्ट**च्या सुव्यवस्थेचा कळसच झाला. **प्रत्येक राष्ट्रांत जर अशा संस्था असत्या तर आज लयाला गेलेलीं जीं राष्ट्रें आपणास आढळतात त्यांतील बऱ्याच राष्ट्रांनीं बराच कालपर्यंत टिकाव धरला असता.**

लॉर्डमारपेथ व लॉर्डक्राइव्ह ह्यांनीं ... "केनसिंगटन् प्यॅलेस" नामक राजवाड्यांत राणीसरकारचे मातोश्रीस वाचून दाखविली.

कित्येक चरित्रकारांनीं राणीसरकारची पूर्वपीठिका फार प्राचीन काळापासून दिली आहे. त्या त्या पीठिकेवरून राणीसरकारचें जनन फार विख्यात कुलामध्यें झालें आहे, असें दिसतें. वस्तुतः, या पूर्वपीठिकेस प्रत्यंतरीं पुरावा नसून ती विशेषतः तर्क व अनुमान ह्यांच्याच साहाय्यानें वर्णिलेली आहे हें खरें आहे; तथापि तिच्या असत्यतेबद्दलही प्रमाणें अद्याप पुढें आलीं नाहींत; [illegible] ती येथें देणें अप्रशस्त होणार नाहीं.

खिस्तीशकाच्या ४७६ वे वर्षी हिरुलिचा बलाढ्य सरदार ओडोएसर यानें पश्चिमेकडील रोमन राज्याचा शेवटचा बादशहा रॉमलस आगस्त्युलस याला पादाक्रांत केल्यावर थिओडोरिक धि आस्ट्रोगाथ यांजवळ इटलीच्या राज्याबद्दल तंटा उपस्थित केला. बॉनिफेस ल्युकाचा काउन्ट आणि टस्कनीचा ड्यूक नवव्या शतकाचे प्रारंभीं होऊन गेला. बॉनिफेस हा ओडोएसर ह्याच्याच वंशांतील पुरुष होय. बॉनिफेसच्या मागून आलबर्ट ओझो दुसरा पुरुष झाला. आलबर्ट ओझो यानें अकराव्या शतकाच्या प्रथमार्धभागीं ग्वेलफ घराण्यांतील क्युनी गोंडा हिच्याशीं विवाह केला; व हिच्यापासून त्यास बव्हेरियाचा ड्यूक ग्वेलफ नामक पुत्र झाला. हाच ब्रन्सविक घराण्याचा ह्मणजे हल्लींच्या ग्रेटब्रिटनच्या राजघराण्याचा मूळपुरुष होय.

# बालपण.

अन्तःकरणतत्त्वस्य दम्पत्योः स्नेहसंश्रयात् ।
आनन्दग्रन्थिरेकोयमपत्यमिति बध्यते ॥ १ ॥

इहलोकच्या वस्तींत मनुष्यमात्राची जी कांहीं कालक्रमणा होते त्या कालक्रमणेचे सर्वसाधारणरीत्या तीन भाग कल्पिलेले आहेत. हे तीन भाग ह्मटले ह्मणजे बालपण, तारुण्यावस्था व वार्धक्य हे होत. ह्या तिहींपैकीं पहिला व सर्वांत लहान असा जो बालपणांत जाणारा भाग हा फारच रमणीय असतो; कारण या भागांत मनुष्यमात्रास साधारणतः जगांतील चालू असलेल्या व मनुष्यमात्रानें चालू ठेविले पाहिजेत अशा व्यवहारांची कल्पना नसते व तेणेंकरून मनुष्यास नेहमीं त्रास देणारी जी काळजी तिच्या तडाक्यांतून मानवी प्राणी आपोआपच सुटलेला असतो. शिवाय, बालपणांत जाणाऱ्या आयुष्याच्या भागाचें जें महत्व आहे तें अवर्णनीय आहे. मनुष्याच्या स्वभावाचें व आचारविचारांचें बाल्यावस्थेंत ज्या प्रमाणानें व ज्या प्रकारचें बीजारोपण होतें त्या प्रमाण व प्रकार ह्या दोहींस अनुरूप असे मनुष्याचे आचारविचारादिकरून त्याचे आयुष्याचे इतरभागीं त्याचे अंगीं

दृष्टिगोचर होतात. सारांश, मनुष्याची ह्या लोकची यात्रा सुखद अगर दुःखद होईल ह्याचें अनुमान बहुतेक उदाहरणांत बालपणावरूनच निघतें. बालपणांत मनुष्याचे मनावर जसजसे चांगले परिणाम घडतील तसतसें त्याचें मन चांगलें होऊन आयुष्याचे पुढील भागांत त्या मनुष्यास सुख प्राप्त होईल. आतां, ज्याअर्थीं बालपण हा आयुष्यापैकीं अत्यंत महत्वाचा भाग आहे त्या अर्थीं आमच्या **महाराज्ञी सरकार**च्या बालपणांतील हकीकत ऐकण्यास आमचे वाचकांचे मनांत उत्कट इच्छा उत्पन्न होईल यांत संशय नाहीं; व ह्मणूनच बालपणाच्या महतीबद्दल उगाच चऱ्हाट न लावतां वाचकांची ती उत्कट इच्छा तृप्त करतों.

**राणीसरकार**चा जन्म झाल्यानंतर पांच सहा महिन्यांनीं त्यांचे वडील त्यांना घेऊन **सिडमाऊथ** शहरीं गेले व तेथेंच त्यांचा अंत झाला हें मागें सांगितलेंच आहे. अर्थातच, **राणीसरकार**च्या पितृसुखोपभोगाची वाढ तेथेंच खुंटली; आणि, त्यांचेबद्दलची हरएक जबाबदारी त्यांचे मातोश्रीवर पडली. मातोश्रीनींही आलेल्या दुर्धर प्रसंगाला पाठ देऊन वेळोवेळीं दुःखद अशा घडणाऱ्या गोष्टी गट्ट करून आपलें तन मन धन आपल्या कन्येच्या शिक्षणाकडे लाविलें. लहानपणापासूनच व्यायाम व मिताहार ह्या दोन्ही गोष्टींनीं शरीरप्रकृति निरोगी असते असा उपदेश त्यांचे मातोश्रींकडून **राणीसरकारांस** होत गेल्यामुळें व **राणीसरकार** त्यांच्या उपदेशानुसार वागल्यामुळें **राणीसरकार**ची प्रकृति निरोगी व सुदृढ झाली. शिवाय,

चाकरमाणसें अगर आपल्यापेक्षां कमी दर्जाचीं माणसें ह्यांशीं न्यायी व संभावितपणाचें वर्तन ठेवण्याविषयीं व विधात्यानें ज्या स्थितींत आपणांस ठेविलें असेल त्या स्थित्यनुरूप वर्तनक्रम ठेविण्याविषयीं त्यांच्या मातोश्री त्यांना पढवीत असत. **राणीसरकारचें** बहुतेक बालपण त्यांची मावसबहीण **फिओडोर** हिच्या सहवासांत गेलें. बालपणांत, **महाराणीसरकारचें** खेळणें, वर्तन व शब्दवात्सल्य वगैरे पाहून पाहणारा हरएक मनुष्य त्यांच्या भावी राजैश्वर्याचें भाकित करी. लहानपणीं **महाराणीसरकार** ज्या ज्या वेळीं लोकांच्या दृष्टीस पडत त्या त्या वेळीं त्यांचेकडे पाहून पाहणारांस समाधान व आनंद होत असे. ज्या वेळीं **फिओडोर** त्यांस गाडींतून फिरावयास नेत त्या वेळीं जवळून जाणाऱ्या येणाऱ्या मनुष्याकडे **राणीसरकार** टक लावून पहात असत; व कोणी कोणताही प्रश्न विचारल्यास त्यास "बाई नमस्कार" असा ठरींव जबाब देत. हा जबाब ऐकून प्रत्येक ऐकणारांस आनंद वाटे. त्या वयानें एक वर्षाच्या असतांना त्यांचे तोंडून प्रश्नांचीं उत्तरें कशीं येणार?

**राणीसरकार** चार वर्षांच्या असतां त्यांचेवर दुसरा एक आकस्मिक प्रसंग त्या तट्टाच्या गाडींतून फिरत असतांना गाडीच्या उलटण्यानें आला. ह्या प्रसंगांतून त्या **जॉन मॅलनी** नांवाच्या मनुष्याचें साहाय्य मिळालें ह्मणूनच कांहीं इजा झाल्याशिवाय सुरक्षित अशा पार पडल्या. ज्यावेळीं **मॅलनीनें** हें साहाय्य केलें त्यावेळीं व त्यानंतर कांहीं दिवसांनीं **राणीसरकारच्या** मातोश्रीनीं त्यास चांगलें

बक्षिस दिलें. हा अनिष्टकारक प्रसंग टळल्यानंतर त्यांचे मातोश्रीस किती बरें आनंद झाला असेल? होणार तें कधीं चुकावयाचें नाहीं. त्या पुढें **सार्वभौमिनी** होणार होत्या ह्मणूनच **जगन्नियंत्यानें** त्या वेळीं **मॅलनीला** त्यांचें संरक्षण करण्याची बुद्धि व शक्ति दिली. **महाराणीसरकार**च्या मातोश्रींना आपल्या एकुलत्या एक व आवडत्या कन्येला घेऊन राजवाड्याजवळील बागांतील झाडांखालीं बसून उपहार करण्याची फार हौस असे. **महाराणीसरकार**चे बालपणांतील खेळगडी ह्मटले ह्मणजे त्यांच्या आवडत्या भगिनी **फिओडोर** व कांहीं कुत्रे असत. हे खेळगडी जर एक क्षणभर त्यांस दिसेनासे झाले तर त्यांना जेवणसुद्धां सुचत नसे. **राणीसरकार**च्या मातोश्री स्वतः सत्यप्रिय असल्यामुळें **राणीसरकार**चाही स्वभाव बालपणापासून अगदीं तसाच बनला. एके दिवशीं **राणीसरकार** आपल्या शिक्षकाजवळ शिकत असतां त्यांचे मनांत चालू असलेला पाठ लवकर बंद करावा असें आलें; व त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या शिक्षकाजवळ तो लवकर बंद ठेवण्याविषयीं दोनदां हट्टही केला. पुढें कांहीं वेळानें **राणीसरकार**च्या मातोश्रींनीं हें ऐकल्यावर पुढें येऊन आपली कन्या नीट वागते किंवा नाहीं असें विचारलें. तेव्हां शिक्षकानें "आपल्या कन्येनें मला एकवेळ त्रास दिला" असें सांगितलें. शिक्षकानें "एकवेळ त्रास दिला" हे शब्द उच्चारतांच **राणीसरकारांनीं** "एक वेळ कां? मी दोनदां त्रास दिला. तुह्मांस नाहीं का आठवत?" असे शब्द उच्चारले. मातोश्री

सत्यप्रिय असल्यामुळें त्यांना आपल्या कन्येच्या तोंडचे हे उद्गार ऐकून परमानंद झाला. परोपकारबुद्धि, त्यांच्या वडिलांप्रमाणेंच **राणीसरकार**चे अंगीं बालपणापासून वास्तव्य करीत आहे. त्या पंधरा वर्षांच्या असतांनाच त्यांची परोपकारबुद्धि प्रकट झाली ती अशीः—

**टनब्रिजवेल्स** शहरीं एका स्त्रीचा नवरा तिचे गर्भारपणाचे नऊ महिने भरण्याच्या बेताला मृत्यू पावला. नवऱ्याचा व तिचा आदा बाताबेताचाच असल्यामुळें व ती गर्भिणी असल्यामुळें कांहीं दिवस तरी स्वतःच्या निर्वाहाला लागणारें स्वतःच मिळविण्याची शक्ति तिचे अंगीं नसल्याकारणानें तिला अनिवार्य दुःख झालें. ही बातमी **राणीसरकार**ला कळली. **राणीसरकार**ला बातमी कळतांक्षणींच त्यांनीं आपल्या मातोश्रीपासून त्या स्त्रीला देण्याकरितां दहा पौंड मागून घेतले व त्यांत आपल्या स्वतःच्या खाजगी शिलकेंतील दहा पौंडांची भर घालून वीस पौंडांची रकम त्या दुःखानें विव्हळ झालेल्या, निराश्रित व दीन, स्त्रीला स्वतः नेऊन दिली. एवढेंच करून **राणीसरकार** थांबल्या नाहींत; तर, राज्यपदारूढ झाल्यावर त्यांनीं त्या स्त्रीला चाळीस पौंडांचें वर्षासन करून दिलें.

जगांमध्यें चालू असलेल्या व्यवहारांचें सूक्ष्मदृष्ट्या परीक्षण केलें तर असें दिसतें कीं, मनुष्यमात्रास पूर्वी कमी योग्यता असून कालमानानें मोठी योग्यता प्राप्त झाली कीं, सर्व साधारणरीत्या बोलावयाचें ह्मणजे, मनुष्यमात्र आपल्या पूर्वीच्या परिचित जनास विसरून त्याच्याशीं आपलें वर्तन बदलतो. अशा या सर्व साधारण

नियमास जो आपल्या वर्तणुकीनें आपणास अपवाद ठरवून घेतो तोच खरा मोठ्या योग्यतेचा मनुष्य ह्मणावा. आपल्या दयाळू **महाराज्ञी व्हिक्टोरिआ** ह्या अपवादांपैकींच एक व्यक्ती आहेत. ही एक अभिनंदनीय गोष्ट आहे. ह्यांचे अंगीं मोठेपणाचें लक्षण आहे ही गोष्ट त्यांचे वयाचे अवघे १८ वे वर्षींच व्यक्त झाली. आतां त्यांच्या हातून घडलेल्या ज्या कार्यावरून त्यांचे अंगीं मोठेपणाचें लक्षण आहे असें निवतें तें कार्य जरी त्यांचे १८ वे वर्षीं घडलें असें स्पष्ट होतें—व ह्मणूनच कित्येकांच्या मतें प्रस्तुत गोष्ट चरित्राच्या ह्या भागांत देणें अप्रशस्त आहे असें ठरतें—तरी ह्या कार्याचें कारण बालपणांत घडलेलें आहे ह्मणून आह्मांस ती गोष्ट येथें नमूद करण्यास वावगें न वाटल्यावरून आह्मीं तसें करितों. ती माहिती येणें प्रमाणेंः—

बाळपणांत, आपल्या मातोश्रीसमवेत **महाराणी सरकार रॅम्सगेट** येथें जात असत. **रॅम्सगेट** येथें **मि० मोझेस मॉन्टिफिओर** ह्या नांवाचा एक मनुष्य राहत असे. **मोझेस मॉन्टिफिओर** हा पराकाष्ठेचा जनहितैषी मनुष्य होता. त्याचें ह्या शहरीं एक सुंदर घर होतें घराच्या भोंवतालचे जागेवर गवत वाढून तें नीटनेटक्या रीतीनें कापलें असल्यामुळें, तें पाहून पाहणारांस आनंद होत असे. घराच्या संनिध असणारा बाग बराच पैसा खर्च केल्यामुळें व त्याची योग्य ती व्यवस्था ठेवीत असल्यामुळें व त्यांत नानाविध पुष्पवेलींचा व झाडांचा संग्रह होता ह्मणून **रॅम्सगेट** येथें नवीन जाणाऱ्या मनुष्यास त्या शहरांतील ज्या कांहीं गोष्टी पाहण्याजो-

ग्या होत्या त्यांपैकीं हा बाग पाहणें ही एक गोष्ट होती. मुलांना लहानपणीं इतर कांहीं व्यवसाय नसल्यामुळें मनोरंजनांतच त्यांचा काल जातो. **राणीसरकार** आपल्या मातोश्रीबरोबर **रॅम्सगेट** येथें गेल्यावर नेहमीं **मोझेस मॉन्टिफिओर** ह्यांच्या ह्या बागाकडे फिरावयास जात. बागेला व घराला भोंवतालीं कुंपण असून मधून मधून गजांचे दरवाजे होते. ज्या ज्या वेळीं **राणीसरकार** ह्या बागेजवळ जात, त्या त्या वेळीं त्यांच्या वयाला अनुरूप अशा रीतीनें ह्मणजे गजांतून डोकावून लक्षपूर्वक बागाची व त्याचे आसमंतांतील जमिनीची शोभा पहात बराच वेळ बसत. **राणीसरकार**ला बागेची व तेथील जागेची शोभा पाहण्याची इतकी उत्कट इच्छा आहे हें पाहून **मोझेस मॉन्टिफिओर** यांस आनंद झाला; व त्यांनीं लगेच एके दिवशीं बागाच्या दरवाज्याची किल्ली **राणीसरकार**चे मातोश्रींस देऊन त्यांस **राणीसरकार**ला वाटेल तेव्हां त्यांनीं ह्या किल्लीनें दरवाजा उघडून आंत जावें असें सांगितलें. पुढें इ. स. १८३७ सालच्या शरदृतूंत **राणीसरकार** **रॅम्सगेट** येथें गेल्या ह्या वेळीं त्यानीं जनहितैषी व आपल्या बालपणांत आपणाशीं दयार्द्र अंतःकरणानें वागलेल्या **मोझेस मॉन्टिफिओर** ह्यांस मोठ्या आनंदानें सरदार केलें; परंतु, बिचारा **मोझेस मॉन्टिफिओर** ह्याला जगदीशानें **राणीसरकार**चा पञ्चाशद्वार्षिकोत्सव सुद्धां पाहूं दिला नाहीं.

# शिक्षण.

हीयते हि मतिस्तात हीनैः सह समागमात्।
समैश्च समतामेति विशिष्टैश्च विशिष्टताम् ॥ १ ॥

आजपर्यंत कोणच्याही देशाचा इतिहास वाचला तर त्या देशांत जीं जीं माणसें निरनिराळ्या धंद्यांत मोठीं ह्मणून नांवाजलीं गेलीं आहेत तीं तीं तशीं नांवाजलीं जाण्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे त्या त्या धंद्यांतील त्यांना मिळालेलें सुशिक्षण हें होय. सर्व साधारण रीतीनें विचार केला तर हें सुशिक्षण वयाच्या अगदीं लहानपणापासूनच मिळालें पाहिजे असें असल्यामुळें या शिक्षणनदीचा झरा सुरुंग लावून फोडून काढण्याचें व वेळोवेळीं त्याची नीट रीतीनें बांधबंदस्ती करून त्याचें पाणी पिण्यास योग्य असें तयार करण्याचें काम मातापितरांचें आहे. बालपणांत मातापितरांच्या अगर त्यांचे अभावीं त्यांचे जागीं असणाऱ्या मनुष्याच्या हातून जर मुलाच्या शिक्षणाची हयगय झाली तर पुढें त्या मुलाला आपलें सर्व आयुष्य दुःखावस्थेमध्यें काढावें लागतें. मुलांना ज्या प्रमाणें वळण लावावें त्याप्रमाणें लागतें. जर बाळपणांत चांगल्या तऱ्हेचें वळण लागलें तर मुलांना हा भव-

सागर सुखद वाटून ते आपल्या आईबापांचे अगर पालकांचे आभार मानितात. जर बाळपणांत मुलांनीं केलेल्या वाईट गोष्टींकडे दुर्लक्ष केलें व त्यांस चांगलें वळण लाविलें नाहीं तर अशा प्रकारचीं आई-बापें अगर पालक हीं मुलांस जरी प्रथमारंभीं चांगलीं वाटलीं तरी परिणामीं तींच मुलें वाईट कृत्यांबद्दल दुःख सोसावें लागल्यानंतर पश्चात्ताप पावून आईबापांस अगर पालकांस वाईट ह्मणतील. ज्या-प्रमाणें आईबापांचें अगर पालकांचें वर्तन व वळण असेल त्याचप्र-माणें त्यांचीं मुलें प्रायः निपजतात. आतां, आईबापें अगर पालक यांचें वर्तन व वळण चांगलें असून त्यांचेजवळ द्रव्य नसलें तर मुलांना द्रव्य खर्चून प्राप्त होणारें शिक्षण मिळणें ही गोष्ट जरी असंभाव्य आहे, तरी सर्व साधारण समाजोपयोगी असें शिक्षण मिळण्यास अडचण नाहीं.

असो, मुलें चांगलीं निपजणें ह्मणजे अर्थातच त्यांचें वर्तन चांगलें असणें व त्यांस योग्य वळण लावणें ही गोष्ट मुख्यत्वेंकरून आईबाप अगर पालक यांचेवर अवलंबून आहे. **राणीसरकारच्या** स्थितीचा विचार केला तर त्यांच्या वडिलांच्या अकालिक मृत्यूमुळें **जगन्नियंत्यानें** आपणच होऊन त्यांचे शिक्षणासंबंधीं सर्व बोजा त्यांचे मातोश्रीवर पाडला. **राणीसरकारचे** वडील उदार व परो-पकारी असल्यामुळें मृत्यूसमयीं त्यांचे जवळ त्यांचे पत्नीच्या व कन्येच्या निवळ निर्वाहाला पुरे इतकें सुद्धां द्रव्य शिल्लक नव्हतें. ह्यावरून **महाराणीसरकारचे** लहानपणीं त्यांच्या राजैश्वर्यास शोभेल

अशा रीतीच्या डामडौलांत त्यांचा काळ गेला नाहीं असें उघडच होतें. ह्या प्रकारची पैशाची टंचाई असतां केवळ आपल्या शहाणपणाच्या वर्तनानें व भावाच्या मदतीनें **राणीसरकारच्या** मातोश्रींनीं आपल्या कन्येचा शिक्षणक्रम सुरू ठेवून त्यांत यश संपादिलें ही एक अत्यंत स्तुत्य गोष्ट होय. **राणीसरकार** सांप्रत लोकप्रिय, धूर्त, चतुर व सद्गुणी निघण्याचें कारण शोधूं गेलें तर त्यांचे मातोश्रींनीं त्यांचे शिक्षणाबद्दल योग्य वेळीं घेतलेले योग्य श्रम हेंच होय. लहानपणापासूनच जेवणाचा साधा बेत, वेळाचा नियमितपणा, आणि ज्या योगानें मनोवृत्ति क्षुब्ध होतील अशी कोणतीही गोष्ट न करणें ह्या तीन गोष्टींचें वळण मातोश्रींनीं त्यांना लाविलें. मिताहार व व्यायाम ह्या दोन गोष्टी मनुष्याला सशक्त करितात हें तत्व बालपणापासूनच त्यांच्या मातोश्रींनीं त्यांना वेळोवेळीं सांगून त्यांचे मनांत तें पूर्णपणें बिंबविलें होतें. ज्या तऱ्हेनें राहिलें असतां शरीर निरोगी व सशक्त राहील त्या तऱ्हेनें राहण्यांत कोणतीही काटकसर न करितां इतर बाबतींत काटकसर करून त्या काटकसरीचा उपयोग धर्मकृत्यांत करावा असा उपदेश त्यांच्या मातोश्री त्यांस वेळोवेळीं करीत गेल्यामुळें लहानपणापासूनच त्यांचे मनाची तशी स्थिति बनली. **राणीसरकार** सहा वर्षांच्या झाल्या तेव्हां त्यांचे शिक्षणाकरितां ह्मणून चवथ्या **जॉर्ज** राजानें त्यांचे मातोश्रींस दरसाल ६,००० पौंडांची नेमणूक करून दिली. चवथा **जॉर्ज** राजा निवर्तल्यानंतर त्याचे पाठीमागून चवथा **वुइल्यम्** रा-

ज्यपदारूढ झाला. ह्यांनीं **राणीसरकार**चे शिक्षणाकरितां आणखी दरसाल १०,००० पौंडांचें उत्पन्न दिलें व ह्यांचे सांगण्यावरून मातोश्रींनीं **नॉर्थम्बरलॅन्ड**च्या **डचेस** ह्यांस **राणीसरकार**च्या शिक्षक नेमिल्या. तसेंच **रेव्हरेन्ड डेव्हिज** व **बॅरोनेस लिझन** ह्यांस आणखी शिक्षक नेमिलें. **मि. ॲमास** नांवाच्या विद्वानानें **राणीसरकार**ला **इंग्लंड**च्या राज्यघटनेच्या इतिहासाची माहिती करून दिली. अगोदर जात्या हुशार व तशांत विद्वन्मंडळाकडून चांगलें शिक्षण मिळाल्यामुळें **राणीसरकार**ला लहान वयांतच **फ्रेंच** व **जर्मन** भाषा अडखळल्याशिवाय शुद्ध बोलतां येऊं लागल्या. **लॅटिन** भाषेवर व्यासंग झाल्यामुळें त्यांना **व्हरजिल** आणि **होरेस** हे ग्रंथ चांगले वाचतां येऊं लागले. गणितशास्त्रासारख्या कठिण विषयांतही त्यांची चांगली गति झाली. **वेस्टाल** नांवाचा एक प्रसिद्ध चित्रकलाभिज्ञ होता त्यानें **राणीसरकार**ला चित्रकला शिकविली. **राणीसरकार**च्या अंगीं गाण्याच्या संबंधें रसिकता असल्यामुळें त्यांत त्या लवकर प्रवीण झाल्या; व, हल्लीं या कलेंत त्या चांगल्याच निष्णात आहेत. तंतुवाद्य वाजविण्याच्या कामांत आपण कुशल व्हावें अशी **राणीसरकार**ला इच्छा होऊन तें त्या **लॅरो** नांवाच्या मनुष्याजवळ शिकूं लागल्या; व त्याही कलेंत त्यांचा लवकरच चांगला प्रवेश झाला. **राणीसरकार**चे मामा **लिओपोल्ड** यांना वनस्पतिशास्त्राची माहिती होती; व, ती त्यांनीं आपल्या आवडत्या भाचीला अतिसुलभ रीतीनें करून दिली. मा-

माचें **राणीसरकारवर** अद्वितीय प्रेम असल्यामुळें व त्यांनाही मामांचा लळा असल्यामुळें ते **राणीसरकारच्या** शिक्षणाबद्दल फार काळजी घेत असत. आपल्या भाचीचा दररोजचा शिक्षणक्रम कसा चालला आहे हें आपणांस कळावें ह्मणून **बॅरोनेस लिझन** (**राणी-सरकारच्या** शिक्षकांपैकीं एक) ह्यांस दर आठवड्याचे आठव-ड्यास झालेल्या अभ्यासाचें पत्रक करून आपणांस दाखविण्यावि-षयीं त्यांनीं विनंति केली. मामांचे विनंतीप्रमाणें **लिझन** तसें पत्रक करून त्यांस दाखवीत असत. लहानपणापासून **राणीसरकारला** घोड्यावर बसण्याची हौस असल्यामुळें त्या घोड्यावर बसण्यांतही तरबेद झाल्या आहेत. आपल्यापेक्षां योग्यतेनें कमी अशा मनुष्यां-जवळही सभ्य व दयाळूपणाचें वर्तन ठेवणें हें मनुष्यमात्राच्या क-र्तव्यापैकीं आदि कर्तव्य आहे असें **राणीसरकार** लहानपणापासून समजत आहेत; व तेव्हांपासून तों आजमितीपर्यंत त्यांचा वर्तनक्रम ह्या त्यांच्या समजाचे कधींही विरुद्ध नाहीं ही एक आनंदजनक गोष्ट आहे. कोणतीही कल्पनेची गोष्ट पाहिली तर तिजसंबंधें मा-हिती करून घेण्याची जिज्ञासा **राणीसरकारच्या** मनांत बालपणापा-सून आहे. त्या तेरा वर्षांच्या असतांना **डरबिशॅयर** मधील **बेल-फर** गांवीं गेल्या. बेलफर येथें **मेसर्स स्ट्रट** यांच्या कापसाच्या गिरण्या आहेत, त्यांपैकीं एका गिरणींत एके दिवशीं **राणीसरकार** सहज गेल्या. गिरणींत गेल्यावर त्यांच्या मनांत यंत्ररचनेची मा-हिती करून घ्यावी असें आल्यावर त्यांनीं **स्ट्रट** ह्यांस ती देण्या-

विषयीं विनंती केली. राणीसरकारच्या विनंतीवरून स्टूट ह्यांनीं त्यांना ती माहिती करून दिली. मि० स्टूट ह्यांना राणीसरकारच्या मनाची अशी प्रवृत्ति व माहिती देत असतां ती त्वरित ग्रहण करण्याची शक्ति पाहून फार समाधान वाटलें. पुढें ई. स. १८५६ सालीं राणीसरकारनीं मि० स्टूट ह्यांचे चिरंजीवास सरदार करून त्याला "बॅरन बेलफर" ही पदवी दिली. राणीसरकारला गायन व नृत्यकला ज्या शिक्षकांनीं शिकविल्या त्यांचीं नांवें अनुक्रमें डब्ल्यु. जे. बी. सेल व मॅडम बोर्डिन् हीं आहेत. मि. स्टीवॉर्ड हे त्यांचे गणिताचे शिक्षक होत.

# राणीसरकारचा दयाळूपणा.

भवन्ति नम्रास्तरवः फलागमैर्नवाम्बुभिर्दूरविलम्बिनो घनाः ॥
अनुद्धताः सत्पुरुषाः समृद्धिभिः स्वभाव एवैष परोपकारिणाम् ॥

दयाळूपणा व सद्गुणाविषयीं सहृदयता व त्यांचें चीज करण्याविषयीं तत्परता हे गुण प्रायः सर्व मोठ्या माणसांच्या अंगीं दिसतात; आणि ह्या गुणांचा लहानपणीं प्रादुर्भाव होणें हें भावी मोठेपणाचें द्योतक होय. हे गुण आमच्या **महाराणीसरकार**च्या अंगीं लहानपणींच व्यक्त झाले. ह्या त्यांच्या गुणांबद्दल एक गोष्ट सांगण्याजोगी आहे. ही गोष्ट ऐकल्यापासून मनाला आनंद होऊन **महाराणीसरकारा**विषयीं प्रेमभाव उत्पन्न होतो; व ह्मणूनच या संबंधाची माहिती आह्मीं आपल्या वाचकांस सादर करितों. ती येणेंप्रमाणें:—

**राणीसरकार**ला लहानपणीं गाडींत बसून बाजार वगैरे ज्या ठिकाणीं सर्व तऱ्हेचे, जातीचे व धंद्याचे लोक जातात अशा ठिकाणीं जाऊन निरनिराळ्या लोकांचे चालू असलेले निरनिराळे व्यवसाय पाहण्याची फार हौस असे; ह्मणून अशा स्थळीं त्या नेहमीं जात असत. एके दिवशीं असें घडलें कीं, त्या एका जवाहीर वगैरे

विकणाराच्या दुकानापासून थोड्या अंतरावर आपली गाडी थांबवून उभ्या राहिल्या व त्यांनीं त्या जवाहीरवाल्याच्या दुकानीं येणाऱ्या गिऱ्हाईकांकडे सारखें लक्ष ठेविलें. तेथें एक कुलीन स्त्री स्वतःसाठीं सोन्याच्या एका उत्कृष्ट सांखळीची किंमत ठरवीत होती असें त्यांच्या दृष्टीस पडलें. ही सांखळी त्या स्त्रीला मनापासून आवडली होती असें त्या वेळच्या तिच्या झालेल्या मुद्रेवरून सहजच दिसून येत होतें. वस्तूची किंमत ज्या कारणांनीं वाढते त्यांपैकीं तिची जरुरी हें एक मुख्य कारण आहे. या न्यायानुसार त्या स्त्रीला तीच सांखळी पाहिजे आहे असें त्या दुकानदाराला आढळल्याबरोबर त्या स्त्रीचा व दुकानदाराचा किंमतीसंबंधें मतभेद पडला. मतभेद पडल्याबरोबर "मला सांखळीकरितां एवढी रक्कम खर्च करण्याची शक्ति नाहीं" असें ह्मणून दुर्मुखलेल्या चेहऱ्यानें ती आपल्या वाटेला लागली. ती गेल्यानंतर **राणीसरकारनीं** त्या दुकानदाराजवळ त्या स्त्रीची त्यावेळीं झालेली सर्व हकीकत व पत्ता विचारून लगेच ती सांखळी खरेदी केली; व ती त्या कुलीन स्त्रीकडे पाठवून दिली. ज्या मनुष्याबरोबर ती सांखळी पाठवून दिली त्याच मनुष्याबरोबर त्या स्त्रीला एक पत्र दिलें व त्या पत्रांत तिनें आपल्या शक्तीबाहेर किंमत पडते ह्मणून प्रबल अशा इच्छेवर दाब ठेवून त्या सांखळीचा नाद सोडला याबद्दल आपणाला आनंद झाला असें दर्शविलें व त्या तिच्या अलौकिक गुणाबद्दल ती सांखळी तिला बक्षिस दिली असें लिहिलें.

# पितृभक्तीचें उदाहरण.

आश्रिते सहजं प्रेम वर्तते धनिनामिह ॥
पितृभिः सह संबद्धे वर्धते तच्च भक्तितः ॥ १ ॥

राणीसरकार पांच सहा महिन्यांच्या असतांना त्यांचे वडील इहलोकांतून गेले हें पूर्वी सांगितलेंच आहे. बाल्यावस्थेंत आपल्या पित्याचा अंत झाला ह्मणून त्यांना आपल्या वडिलांची योग्यता, सौजन्य इत्यादि गोष्टींची कल्पना येणें कठिण होतें. अशी जरी स्थिति होती तरी त्यांचे अंगीं स्वभावसिद्धच अशी पितृभक्ति वास्तव्य करीत होती. त्यांचे वडील **एडवर्ड साहेब जिब्रॉलटरवर** आपले फौजेसह असतां फौजेचे मनांत **एडवर्ड साहेबांच्या** विरुद्ध बंड करण्याची नीच कल्पना आली, त्या फौजेंत **हॅलिमन** नांवाचा एक स्वामिकार्यदक्ष व स्वामिभक्तिपरायण असा मनुष्य होता. **हॅलिमन** मात्र आपल्या स्वभावाला अनुसरून इमानाला जागला; व त्यानें **एडवर्ड साहेबांस** समयोचित अशी मदत केली. **हॅलिमनच्या** अशा या समयोचित मदतीवरून **एडवर्ड साहेबांना** फार संतोष वाटून त्यांच्या मनांत **हॅलिमन** विषयीं प्रेमभाव उत्पन्न झाला. पुढें **हॅलिमनला एडवर्ड साहेबांनीं** आपल्या "**केनसिंगटन्**" नांवाच्या प्रासादासमीप एक

घर बांधून देऊन त्याचा योग्य रीतीनें समाचार घेण्याची वहिवाट ठेविली. कांहीं दिवसांनीं **एडवर्ड साहेब** परलोकवासी झाले. अंतसमयीं **एडवर्ड साहेबांनीं** आपल्या कुटुंबास (चरित्र नायिकेच्या मातोश्रींस) **हॅलिमन**ची वेळोवेळीं योग्य रीतीनें विचारपूस करण्याविषयीं विनंति केली. भर्त्याचे सदहू विनंतीप्रमाणें **राणीसरकारच्या** मातोश्री आपल्या कन्येसह वेळोवेळीं **हॅलिमनच्या** भेटीस जात. कालगतीनें **हॅलिमनही** परलोकवासी झाला. **हॅलिमनचें** प्राणोत्क्रमण झालें त्यावेळीं त्याचा एकुलता एक मुलगा व एकुलती एक मुलगी अशीं दोन मुलें पोरकीं झालीं. **हॅलिमन** मृत्यू पावल्यावरही **राणी सरकार** त्याचे मुलांचे भेटीस जात. स्वभावसिद्ध चांगुलपणा व उत्कट पितृभक्ति या उभयतांचा **राणीसरकारच्या** मनांत संगम झाल्यामुळें राज्यपदारूढ झाल्यावरही **राणीसरकार** पूर्ववत् आपल्या बापाच्या इमानी नोकराच्या पोरक्या मुलांस भेटावयास जात. प्रत्यक्ष आपल्या खुद्द इमानी नोकराचे पश्चात् फारच थोडे लोक त्या नोकराचे मागें राहणाऱ्या मनुष्यांची काळजी घेतात. व त्यांतून जे कांहीं घेतात त्यांतील बरेच लोकांना कांहीं विशेष संबंधामुळें अथवा जनलज्जेमुळें तसें करावें लागतें. तर, आपल्या नव्हे ह्मणजे आपल्या वडिलांच्या इमानी नोकरांचे पश्चात् त्यांचे कुटुंबाची किती लोक काळजी घेतील बरें? साधारणपणें विचार केला तर, ज्यांचा व **हॅलिमनच्या** कुटुंबाचा प्रत्यक्ष असा कांहीं संबंध नव्हता, ज्यांना जनसमूहासंबंधें ह्या बाबतींत काडीची देखील पर्वा

करण्याचें कांहीं एक प्रयोजन नव्हतें, ज्या राजाधिराज झाल्या होत्या, अशा **महाराणी सरकारनीं** हॅलिमनच्या पश्चात्सुद्धां त्याच्या कुटुंबाची काळजी घेतली ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. केवळ चांगुलपणा व उत्कट पितृभक्ति हे दोन्ही गुण **राणीसरकारच्या** अंगीं होते ह्मणूनच ही व हिजसारख्या-स्थलसंकोचास्तव येथें देतां येत नाहींत अशा-गोष्टी घडल्या हें उघड आहे.

# राणीसरकार राज्यपदारूढ होण्यापूर्वींच्या लक्षांत ठेवण्याजोग्या गोष्टी.

महतां साधुवृत्तानां संवन्धः कस्य न प्रियः
येन यान्ति नरा लोके चातुर्यं व्यावहारिकम् ॥

**उत्तम**, मध्यम किंवा कनिष्ट कोणत्याही स्थितींतील मुलांना ल्हानपणापासून बेताबातानें खर्च करण्याची संवय असून आपणाजवळ पैसा असेल तरच आपण कोणतीही वस्तु खरेदी करावयाची असा त्यांचे मनाचा दृढनिश्चय असेल तरच आयुष्याच्या पुढील भागांत तीं मुलें आपले संसारांत निःसंशय सुखोपभोग घेतील. अशा तऱ्हेच्या वर्तनाचा कित्ता घालून देण्याचें काम आईबापांचें अगर पालकांचें असून तो वळविण्याचें काम मुलांचें आहे. **राणीसरकारच्या** मातोश्रींना स्वतः ल्हानपणापासून काटकसरीनें वागण्याचें शिक्षण मिळालें होतें; व ह्मणूनच त्यांनीं आपल्या कन्येला तशा तऱ्हेचें शिक्षण दिलें होतें. एके दिवशीं **राणीसरकार** "**टनब्रिजवेल्स**" शहरीं बाजारामध्यें कांहीं जिनसा खरेदी कर-

ण्याकरितां गेल्या होत्या. बऱ्याच वस्तु खरेदी केल्या, तेव्हां त्यांजवळील सर्व पैसा खर्च होऊन फक्त एकच शिलींग शिल्लक राहिला. इतक्यांत त्यांना आपल्या एका चुलतभावाची आठवण होऊन त्याच्याकरितां कांहींतरी वस्तु खरेदी करावी असें त्यांच्या मनांत आलें. त्याबरोबर त्यांनीं अर्धक्रौन किंमतीची एक पेटी आपल्या चुलतभावाकरितां पसंत केली; आणि पाहतात तों खिशांत त्या पेटीच्या किंमती इतके पैसे शिल्लक नाहींत असें त्यांस आढळलें. जवळ पैसे नाहींत असें आढळल्याबरोबर त्यांनीं ती पेटी नको ह्मणून दुकानदारास सांगितलें. त्या मोठ्या कुलांतील व मोठ्या योग्यतेच्या असल्यामुळें त्यांना अर्धक्रौन कःपदार्थ होता खरा;—आणि ह्मणूनच त्या दुकानदारानें ती पेटी तशीच देऊन किंमत मागाहून पाठवून देण्याविषयीं त्यांची विनंती केली—परंतु काटकसरीनें खर्च करावा व आपणाजवळ आपले पैसे असले तरच कोणतीही वस्तु खरेदी करावी असा उपदेश **राणीसरकार**ला त्यांच्या मातोश्रीकडून वेळोवेळीं मिळत जाऊन तो त्यांचे मनावर पूर्णपणें बिंबलेला असल्यामुळें त्यांनीं ती पेटी त्यावेळीं घेण्याचें नाकारून दुसरे दिवशीं रोख पैसे देऊन खरेदी केली.

* * *

( २ )

**राणीसरकार**ला त्यां... ...चे अकरा बारा वर्षांपर्यंत इंग्लंडचे राज्यपदावर आ... ...ळींच कल्पना न-व्हती, व ही व... ...ंचा व त्यांना शि-

३

कविणाऱ्या **बॅरोनेस लिझन** यांना जो संवाद झाला तो फारच मनोवेधक असून **राणीसरकार**च्या बालपणांतील सुशिक्षित विचारांचें प्रतिबिंबच आहे असें आह्मांस वाटल्यावरून तो वाचकांपुढें ठेवितों.

परंपरेचा विचार केला असतां आपण लवकरच राज्यपदारूढ होण्याचा समय झाला आहे, ही गोष्ट **राणीसरकारांस** कळवावी असा **बॅरोनेस लिझन** आणि **राणीसरकार**च्या मातोश्री यांचा संकेत झाल्यावर **बॅरोनेस लिझन** यांनीं **राणीसरकार**चे इतिहासाचे पुस्तकांत त्यांचे पूर्वजांची वंशावळ घालून ठेविली. वंशावळ **राणीसरकार**नीं पाहिल्यानंतर त्या **बॅरोनेस लिझन** यांस ह्मणाल्याः—

**राणीसरकार**—ही माझ्या पाहण्यांत आजपर्यंत कधींही आली नव्हती.

**बॅरोनेस लिझन**—ती आजपर्यंत आपल्या दृष्टीस पाडण्याचें कांहींच प्रयोजन नव्हतें.

**राणीसरकार**—माझा **इंग्लंड**च्या गादीवर बसण्याचा समय इतका समीप आहे असें माझ्या मनांत यापूर्वी कधीं आलें नाहीं.

**बॅरोनेस लिझन**—आलें नाहीं खरें परंतु वस्तुस्थिति आतां त्यांच्या उलट आहे.

(कांहीं वेळ थांबून.)

**राणीसरकार**—राज्यसंकटांच्या अज्ञानामुळें पुष्कळ मुलें ही स्थिति सुखावह आहे असें मानितात, याचें कारण अवाढव्य वै-

भवाबरोबर असणारी जबाबदारी त्यांच्या लक्षांत येत नाहीं हें होय. (हे उद्गार काढीत असतांना आपला मृदु हात **वॅरोनेस लिझन** यांच्या हातावर देऊन ह्मणाल्या) मी भलेपणानें वागेन. तुह्मीं मला **लॅटिन** भाषा शिकण्याचा आग्रह कां केला हें आतां माझ्या लक्षांत आलें. इंग्लिशभाषेंत निष्णात होण्याला **लॅटिन** भाषेची फारच जरूरी आहे असें जें वेळोवेळीं आपण मला सांगत होतां त्यांतल्या इंगिताची बरोबर कल्पना आज झाली.

**वॅरोनेस लिझन**—परंतु, आपली चुलती अद्याप तारुण्यावस्थेंत असून तिचे पोटीं अपत्य होण्याचा संभव आहे. तसें झालें तर आपल्या चुलत्याच्या पश्चात् राज्यपदाचा उपभोग घेण्याचा हक्क त्याच्याकडे जाईल.

**राणीसरकार**—तसें कां होईना, त्यांतही मला आनंदच आहे; कारण, ती मजला जीव कीं प्राण करते यावरून तिला मुलांची फार आवड आहे. तेव्हां, तिची ती आवड तरी पुरी होईल.

**राणीसरकार** अवघ्या अकरा बारा वर्षांच्या असतांना त्यांच्या तोंडून आलेले हे उद्गार ऐकून ऐकणारांस किती बरें समाधान व आनंद वाटला असेल.

यःकश्चित् पदवी प्राप्त होणें असून ती कोणातरी दोन व्यक्तींतून एकीलाच मिळणें असेल तर ज्या दोन व्यक्ती ती संपादण्याचे कामीं उमेदवारी करीत असतील त्या दोन व्यक्तींमध्यें परस्परांविषयींच्या स्पर्धेचें बीजारोपण होऊन तिच्या लांब लांब शाखा

विस्तृत होतात व उभय व्यक्तींमध्यें एकमेकांविषयीं असलेल्या पूर्वप्रेमभावाचा लोप होतो. ही यःकश्चित् पदवीची गोष्ट झाली. या उदाहरणांत तर सार्वभौमपदप्राप्तीचा संभव. तेव्हां, अशा या सार्वभौमपदप्राप्तीच्या समयींही **राणीसरकारनीं** तें पद आपल्या चुलतीच्या मुलांना मिळण्याच्या बाबतींत आपला यत्किंचित्‌ही असंतोष न दाखवितां उलटा मनःपूर्वक संतोष दाखविला ही गोष्ट साधारण काय?



# इ० सन १८३४ च्या आकस्मिक् प्रसंगांतून राणीसरकार निभावल्या.

आरुह्य वाजिशकटं जननीद्वितीया ।
राज्ञी यदा गतवती जलधेः प्रदेशम् ॥
अश्वैः सह भ्रमविशेषविसृष्टधैर्यैः ।
मग्नातिसंकटचये विधिनेव रक्षिता ॥ १ ॥

इ० सन १८३४ सालीं ह्मणजे राणीसरकारचे पंधरावे वर्षी त्यांच्या मातोश्री हिंवाळ्यामध्यें सेन्टलिओनार्ड्स येथें रहावयास गेल्या. या ठिकाणीं त्यांचा बरेच दिवस मुक्काम होता. नित्यक्रमाप्रमाणें एके दिवशीं त्या आपल्या कन्येसह गाडींतून फिरावयास निघाल्या त्या हेस्टिंग्ज व सेंटलिओनार्ड्स याचे दरम्यान ज्या ठिकाणीं एकीकडे विशाळ असे कडे व एकीकडे अफाट असा समुद्र होता त्या ठिकाणीं येऊन पोंचल्या. अशा या विकट वाटेवर गाडी येऊन पोंचते तोंच घोडे तुफान झाले. प्रसंग व स्थल हीं निःसंशय धोक्याचीं होतीं. परंतु, सुदैवानें पेक्याम मिकेल थ्वेट नांवाच्या मनुष्यानें इतर कांहीं लोकांचें साहाय्य घेऊन वायुगति

पळणारे घोडे धरून राणीसरकार व त्यांच्या मातोश्री यांची या प्राणसंकटांतून सुटका केली. पेक्याम मिकेल थ्वेट ह्यांच्या त्या मदतीबद्दल राणीसरकारनीं राज्यपदारूढ झाल्यावर त्यांस बॅरोनेट हा किताब दिला. मोठ्यांचें सर्वच मोठें!

# राणीसरकारच्या भावी श्वशुराचें सन १८३६ सालीं लंदन शहरीं आगमन.

प्रसन्नमभवत्तस्या मनो वीक्ष्य नरोत्तमम् ।।
कुसुमं विकसत्येव नलिन्याश्चन्द्रदर्शने ।। १ ।।

इ० सन १८३६ सालीं **राणीसरकारचे** भावी श्वशूर आपल्या उभय पुत्रांसमवेत **लंडन** शहरीं आले. **राणी सरकारच्या** मातोश्रींचा व त्यांचा बहिणभावंडाचा संबंध असल्यामुळें त्यांनीं त्यांना पाहुणचारास्तव महिना सव्वा महिना राहवून घेतलें. आपल्या दयाळू **राणीसरकारनीं** आपल्या भावी पतीला प्रथमतः असें याच वेळीं पाहिलें. ह्या वेळीं **इंग्लंडचे** राजे **वुइल्यम्** ( चवथे—**राणीसरकारचे** चुलते ) व त्यांच्या पत्नी या उभयतांनीं **राणीसरकारचे** भावी श्वशुरांचें व त्यांच्या उभय पुत्रांचें आदरातिथ्य केलें. ह्या सहवासापासून **आलबर्ट साहेब** ( भावी पती—वर नमुद केलेले श्वशुरांचे कनिष्ठ चिरंजीव ) व **राणीसरकार** या उभयतांमध्यें मित्रभाव दिसूं लागला व तो

मित्रभाव शेवटीं जगन्नियंत्याचे कृपेनें कांहीं एक विशेष संस्कारानें दृढीकरण पावला. ह्यावेळीं राणीसरकार वयानें सतरा वर्षांच्या होत्या.

# राणीसरकारचें कायदेशीर रीतीनें सज्ञान होणें.

वयसा सह वर्धेरन् राज्ञ्या अवयवा यथा ।
गुणास्तथा पदं कुर्युर्नित्यमेव नवं नवाः ॥ १ ॥

व्हिक्टोरिआ **राणीसरकार** ता० २४ मे सन १८३७ त ह्मणजे त्यांचे वयाचे अठरावे वर्षी कायदेशीर रीतीनें सज्ञान झाल्या. ह्मणून त्या दिवशीं प्रासादांत नृत्यगायनादि नाना तऱ्हेचे कर्मणुकीचे खेळ झाले. ह्या दिवशीं पुष्कळ बड्या बड्या लोकांकडून **राणीसरकार** व त्यांच्या मातोश्री यांना मौल्यवान् असे नजराणे आले; व त्यांचे चुलते चवथे **वुइल्यम्** ह्यांनींही त्यावेळीं शें दोनशें गिनी किंमतीची बाजाची पेटी **राणीसरकारास** नजराण्यादाखल पाठविली. असें ह्मणतात कीं, ही देणगी ज्या मनुष्याबरोबर आली त्याजबरोबर असा निरोप आला कीं, जर **राणीसरकार** आपल्या तैनातींतील त्यावेळच्या मनुष्यांची नेमणूक करण्याचा अधिकार आह्मांस देतील तर त्यांजला आह्मी आपल्या खाजगी तिजोरींतील दहा हजार पौंडांचें वर्षासन देऊं इच्छितों. **राणीसरकारनीं** ह्याच अटीवर दहा हजार पौंडांचें वर्षासन देणें असेल तर

नको असा उलट जबाब दिला. ह्या महोत्सवाचे दिवशीं सर्व **लंदन**नगरवासी जनांनीं आपला व्यापारधंदा बंद ठेविला होता. सर्व शहरभर आनंद होऊन गेला होता; व **पार्लमेन्ट** सभेच्या दोन्ही शाखांनीं आपलें काम बंद ठेविलें होतें. रात्रौ शहरामध्यें दीपोत्साहाची अद्वितीय मजा होती. ह्या प्रसंगीं **राणीसरकार**च्या मातोश्रींना व त्यांना **लंदन** नागरिकांनीं मानपत्रें दिलीं; व त्यांच्या उत्तरार्थ मातोश्रींनीं व **राणीसरकार**नीं समयोचित अशीं सुरस भाषणें केलीं. आपल्या भाषणामध्यें **राणीसरकार**च्या मातोश्रींनीं आपल्या कन्येस दिलेल्या शिक्षणाचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें, व प्रजेला सुख होईल अशा रीतीनें माझी कन्या आपलें वर्तन ठेवील अशा अर्थाचें आश्वासन दिलें. खुद्द **राणीसरकार**ही अतिशय गंभीर मुद्रेनें लोकांनीं दिलेल्या बहुमानाबद्दल त्यांचे आभार प्रदर्शित करून मातोश्री बोलल्या त्यापलीकडे मला कांहींएक बोलावयाचें नाहीं असें ह्मणाल्या. येणें प्रमाणें हा **लंदन**पौरसमुदायाचा दिवस अत्यानंदांत गेला. मानपत्रांचा वर्षाव यापुढेंही बरेच दिवस चालला होता.

# राणीसरकारच्या चुलत्यांचा आजारीपणा व त्यांचें निधन.

वनवासरता लोका वियोगे परिचायिनाम् ।
भवन्ति दुःखिनोऽत्यन्तं न रादित्यबला कथम् ॥ १ ॥

इ० सन १८३७ च्या मे महिन्यांत ह्मणजे **राणीसरकार** सज्ञान झाल्या त्यावेळेस त्यांचे चुलते (त्यावेळीं इंग्लंडच्या गादीवर असणारे राजे) हे आजारी होते; व त्यामुळें त्यांना **राणीसरकार** सज्ञान झाल्याप्रीत्यर्थ झालेल्या उत्सवास जातां आलें नाहीं. हाच त्यांचा आजार त्याच महिन्याचे अखेरीस अतिशय बळवत्तर झाला; व त्यामुळें त्यांची शक्ति क्षीण झाली. चार पावलें चालण्याचीही ताकद राहिली नव्हती. त्यांना हवा पालटण्यासाठीं **ब्रिटन** येथें नेण्याचेंही ठरविलें, परंतु तसें करतां आलें नाहीं. ता० ९ माहे जून रोजीं त्यांना जरासा आराम वाटला. ह्या दिवशीं त्यांनीं थोडेंसें कामही केलें. ता. ९ नंतर त्यांचा आजार वाढत चालला; जो जो त्यांजला पाही, तो तो आपल्या मनामध्यें त्यांच्या आजाराचा शेवट चांगल्या रीतीनें होणार नाहीं असें समजे. ता० १६ रोजीं प्रातःकाळीं ते आपल्या

आवडत्या पत्नीस जवळ बोलवून ह्मणाले—" मला थोडीशी चांगली झोंप लागली होती. तूं आतां **परमेश्वराचे** त्याबद्दल आभार मान," त्यानंतर त्यांच्या पत्नी ह्मणाल्या—" नुसती आपणास चांगली झोंप लागली होती एवढ्याबद्दलच का **परमेश्वराचे** आभार मानूं ! आणि आपल्याला चांगले दिवस आणण्याबद्दल प्रार्थना करूं नको काय?" त्यावर ते ह्मणाले "हो अलबत तसें कर. मी आपल्या देशाच्या हितासाठीं आणखी दहा वर्षेंही जगेन, असें वाटतें. माझ्यानें जितके दिवस बरेपणा राखवेल तितके दिवस तो राखण्याचें माझें कर्तव्य कर्म आहे, असें मी समजतों." ता० १८ चे सुमारास त्यांचे आजारीपणाचा कांहींतरी भयंकर परिणाम होणार अशी सर्वत्रांस भीति पडली. आणि त्या दिवशीं त्यांनीं गुन्हा केलेल्या कैदी लोकांस बंदीखान्यांतून मुक्त करण्याबद्दल परवानगी दिली. ता० १९ रोजीं प्रातःकाळीं आपल्या पत्नीस जवळ बोलावून ते ह्मणाले." देशसेवा अशी माझे हातून एकदांच घडणार." त्या दिवशीं त्यांचें बोलणें, कृति इत्यादिकांवरून कांहींतरी विपरीत होणार असें त्यांच्या पत्नीस वाटून फार दुःख झालें व मधून मधून त्यांच्या डोळ्यांनून अश्रु गळूं लागले. अशा तऱ्हेचें आपल्या पत्नीस दुःख झालेलें पाहून ते तिचें सांत्वन करीत होते. पुढें दुसऱ्या दिवशीं ह्मणजे ता० २० जून १८३७ रोजीं पहाटेस दोन वाजून बारा मिनिटांनीं दुष्ट कालानें त्यांना इहलोकांतून नेलें. ह्यांचे कारकिर्दीसंबंधें विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं ह्यांचे कारकिर्दींत परराष्ट्रांशीं युद्ध मुळींच झालें नाहीं.

# राणीसरकारचें राज्यपदारोहण.

प्राप्य सिंहासनं तेन शुशुभे सार्वभौमिनी ॥
शिवभालमधिष्ठाय यथा चान्द्रमसी कला ॥ ६ ॥

राजाचें प्राणोत्क्रमण झाल्यानंतर दहा पंधरा मिनिटांचे आंत **डॉक्टर हाऊले** ( त्या वेळचे **क्यानटरबरीचे** धर्माधिकारी ) आणि **लॉर्ड चेम्बरलेन** हे राजवाड्यांतून निघून **व्हिक्टोरिआ राणीसरकारला** राजाच्या मृत्यूचें दुःखकारक वर्तमान कळविण्याकरितां निघून गेले. ते पांच वाजण्याचे सुमारास त्यांच्या प्रासादांत येऊन पोंचले. आणि त्यांनीं रीतीप्रमाणें हुजऱ्यास बोलावून कळविलें कीं "आह्मांस कांहीं महत्वाचे कामीं **राणीसरकारची** भेट घ्यावयाची आहे" त्याजवर हुजऱ्यानें **राणीसरकारला** गाढ झोंप लागली आहे ह्मणून मला त्यांस उठवितां येत नाहीं" असें उत्तर दिलें. तेव्हां, "आह्मीं कांहीं राज्यकारणी कामीं आलों आहों, त्यांची झोंप मोडली तरी चालेल, त्यांची आह्मांस जरूर भेट पाहिजे, असें पुनः **डॉक्टर साहेबांनीं** सांगितलें. त्यामुळें लागलीच त्या हुजऱ्यानें आलेल्या मंडळीचे आगमनाबद्दल आंत वर्दी देऊन त्यांचा मनोदय कळविला. त्याजबरोबर **राणीसरकार** एक पळाचाही विलंब न करितां आपल्या रात्रीच्या पेहेरावानें

बाहेर आल्या आणि त्यांनीं आलेल्या मंडळीची गांठ घेतली. आलेल्या मंडळींनीं ती दुःखकारक वार्ता **राणीसरकार**ला कळविल्यानंतर त्यांचे डोळ्यांतून अश्रुधारा चालूं लागल्या. **राणीसरकार**वर त्यांचे चुलतीची अद्वितीय प्रीति असल्यामुळें आपल्याला राज्यपद मिळणार या लाभापेक्षां तिला झालेलें दुःख शतपटीनें असह्य व मोठें आहे असें त्यांना वाटून त्यांनीं एक सांत्वनाचें पत्र आपल्या चुलतीला लिहिलें. तद्देशीय रीतीप्रमाणें ह्या पत्रावरील पत्त्यांत आतां अर्थातच बदल झाला पाहिजे होता. परंतु **राणीसरकारांनीं** तसा कांहीं एक बदल न करितां नेहमीं प्रमाणेंच पत्ता लिहिला. हा पत्ता पाहून जवळ असणारा एक मनुष्य ह्मणाला "सरकार, त्यांचा पत्ता आतां असा लिहावयाचा नाहीं." त्यावर **राणीसरकार** ह्मणाल्या—"कसाही असो. मला सर्व कळत आहे. कांहीं झालें तरी मी ह्मणून प्रथमतः तिला पाठविण्याचे पत्रावरील पत्त्यांत बदल करून तिचे बदललेले स्थितीची तिला आठवण करणार नाहीं." या थोर मनाच्या कृत्याबद्दल **राणीसरकार**ची जेवढी ह्मणून तारिफ करावी, तेवढी थोडीच.

असो, नंतर दुसरे दिवशीं ह्मणजे ता० २१ जून रोजीं राजकार्यधुरंधर अशा प्रधान मंडळीची व **राणीसरकार**ची अशी गुप्त सभा **केनसिंगटन** प्रासादांत भरली. **राणीसरकार** तरूण, अनभ्यस्त व व्यवहारानभिज्ञ असल्यामुळें त्यांचे चुलत्याचे पश्चात् त्यांच्यावर पडलेलें राज्यशकट हांकण्याचें जबाबदारीचें काम त्यां-

चेहातून नीट तडीस जाणार नाहीं अशी लोकांना भीति होती. परंतु, ता० २१ रोजीं **केनसिंगट्न** प्रासादांत भरलेली सभा आटोपल्यानंतर लोकांचे हे निराधार उद्भवलेले तर्क नाहींसे झाले. या सभेचे प्रसंगीं **राणीसरकार**नीं लिहून आणिलेलें भाषण स्पष्ट, स्वच्छ व सर्वांस ऐकूं जाईल अशारीतीनें वाचलें. सभेंत कोणत्याही तऱ्हेचा लेख वाचण्याची किंवा भाषण करण्याची ही पहिलीच वेळ असून त्यांनीं न डगमतां हा लेख गंभीरपणानें वाचून दाखविला. नंतर रीतीप्रमाणें नवीन झालेल्या राजानें व त्याच्या मुत्सद्दी वगैरे मंडळीनें घेण्याच्या शपथा घेऊन झाल्यानंतर सभेचें काम संपलें. या सभेचे वेळीं **राणीसरकार**नीं जें भाषण वाचलें ह्मणून वर लिहिलें आहे त्याचा सारांश येणें प्रमाणेः—

"या गादीचे माजी मालक ह्मणजे माझे आवडते चुलते यांच्या मृत्यूनें ह्या देशांतील लोकांवर एक दुर्धर प्रसंग येऊन त्यांना दुःखसागरांत बुडाल्या प्रमाणें वाटत असेल. त्यांच्या मृत्यूमुळेंच या देशावर राज्य चालविण्याचें भयंकर ओझें एवढ्या लहानपणांत एकाएकीं **जगन्नियंत्या**नें मजवर टाकिलें आहे. हें ओझें माझ्यानें सहन करवणार नाहीं अशी जरी मला भीति आहे तरी ज्या अर्थीं **जगन्नियंता** दयाळू आहे त्या अर्थीं त्या सर्व साक्षी **प्रभू**नें हें ओझें मला सहन करतां यावें ह्मणून कांहींतरी तजवीज करून ठेविली असली पाहिजे; व तो मजवर कृपादृष्टी ठेवून मजला ह्या कामीं प्रजेस सुखद अशा गोष्टी करण्यास बुद्धि व शक्ति देईल अशी माझी पूर्ण खात्री आहे. जें मी करीन तें सर्व शहाणपणाचें व प्रजेस हितावह असें ठरणारच असा माझा पक्का समज आहे. माझी प्रजा राजनिष्ठ असून मजवर तिचा लोभ आहे.माझे चुलते प्रजेचे हक्क व स्वतंत्रता रक्षण करण्याचे कामीं दक्ष होते; व ह्मणूनच प्रजेचे मनांत त्यांचे विषयीं पूज्यबुद्धि व परम प्रीति वसत आहे. लहानपणापासून माझा विद्याभ्यास ह्या देशांत माझे सद्गुणी व परम दयाळू माते-

र्थांच्या देखरेखीखालीं झाला असल्यामुळें मला ह्या देशांतील राज्यपद्धतींची फार आवड असून तिजबद्दल माझे मनांत पूज्यभाव आहे. कायद्यानें संम्मत असा जो सुधारलेला धर्म त्याच्या प्रसारासाठीं मी अविश्रांत श्रम करीनच; परंतु, इतरही जे अनेक धर्मपंथ आहेत त्यांचेंही स्वातंत्र्य अव्याहत राहील असेंही करीन, आणि मी आपल्या प्रजेपैकीं सर्व वर्गांच्या व वर्णांच्या लोकांच्या हितसंपादनाविषयीं तत्पर असेन.''

ता० २१ जून रोजीं **राणीसरकार** राज्यपदावर यथाविधीनें आरूढ झाल्या. ह्या दिवशीं सन्मानार्थ बऱ्याच तोफांची सरबत्ती झाली. **लॉर्ड मेलबोर्न** व **ल्यॅन्सडौन** वगैरे मंडळी **राणीसरकार**च्या संनिध असून इतर मंत्रीजनही आपआपल्या दर्जाप्रमाणें आपआपल्या ठिकाणीं हजर होते सर्व प्रधानमंडळी बसल्यावर **सर वुइल्यम वुड्स्** यांनीं एक जाहीरनामा वाचून दाखविला. त्यांतील सारांश येणें प्रमाणें:—

''ज्याअर्थी **परमेश्वरा**नें आपल्या इच्छेनें आमचे सद्गुणी राजे **वुइल्यम्** (चवथे) यांजला आह्मांमधून काढून नेलें आहे त्याअर्थीं आमच्या या **ग्रेटब्रिटन्** आणि **आयर्लंड**च्या राज्याचा पूर्ण व कायदेशीर रीतीनें राजा होण्याचा हक्क थोर कुलांतील व प्रतापशाली अशा राजकुमारी **अलेक्झांड्रिया व्हिक्टोरिआ** यांजकडे आहे, व ह्मणून आह्मीं सर्व जातीचे, सर्व स्थितीचे, सर्व धर्मपंथांचे, सर्व रीतीचे या देशांतील सर्व लोक एकवाक्यतेनें व एकदिलानें असें प्रसिद्ध करितों कीं थोर कुलांतील व प्रतापशाली अशा राजकुमारी **अलेक्झांड्रिया व्हिक्टोरिआ** या आमच्या माजी राजाला अपत्य नसल्यामुळें आमच्या या **ग्रेटब्रिटन्** व **आयर्लंड** देशाच्या आजपासून **राणीसरकार** आहेत, व राज्ञी या नात्यानें यांचे हरएक हुकूम मनःपुरःसर व आनंदानें अवश्य पाळण्याचें आह्मीं सर्व लोक कबूल करितों; व सर्वशक्ति **परमेश्वरा**जवळ आह्मांवर **राणीसरकार**चें राज्य चिरायु होण्याविषयीं आनंदानें व प्रेमपुरःसर प्रार्थना करितों.''

# राज्याभिषेक.

वाचापि केचिन्मनसापि केचिद्दृशापि केचित्खलु नन्दयन्ति ॥
राज्ञी यथा सापि तथैव सर्वांस्तैस्तैरुपायैः परितोषयन्ती ॥ १ ॥

ता० २८ जून १८३८ रोजीं ह्मणजे सुमारें एक वर्ष राज्य केल्यानंतर पुढें मोठ्या थाटमाटानें व उल्हासानें राणीसरकारास राज्याभिषेक झाला. या दिवशीं सकाळचे सहावाजल्यापासून लंदन शहरभर जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला होता. वाटेनें हा राज्याभिषेक समारंभ पाहण्यास लोलुप झालेल्या हजारों पायानें जाणाऱ्या लोकांची गर्दी होऊन गेल्यामुळें गाड्या हांकण्याचें काम अतिशय कौशल्याचें व जोखमाचें बनून गेलें होतें. शहरभर गाड्यांतून, गच्यांवरून व जेथें जेथें घराच्या कोणत्याही भागावर बसावयास पुरेशी जागा होती तेथें तेथें लोकांची एकच गर्दी उडाली होती. ज्या ज्या लोकांचे घरावर बसतां येण्याजोग्या जागा होत्या त्या त्या लोकांनीं आपआपल्या जागा राजनिष्ठेनें ज्यांचीं अंतःकरणें ओतप्रोत भरून चाललीं होतीं व ज्यांना सदरहू समारंभ पाहण्याची उत्कट इच्छा असून बसावयास सोईची स्वतःची जागा

नव्हती, त्या लोकांपासून जबर भाडें घेऊन[1] त्यांस बसावयास जागा दिली. दहा वाजण्याचे सुमारास एकवीस तोफांची सलामी झाली. राणीसरकारची स्वारी रथांत बसून निघाली ती ११॥ वाजतां वेस्टमिन्स्टर ॲबे[2] येथें येऊन पोंचली. रथाला पांढरे सफेत असे आठ घोडे जुंपलेले होते. बरोबर इतर राजघराण्यांतील मानकरी, देशोदशचे वकील व वजनदार बडे बडे कामगारांच्या गाड्यांची रांगची रांगच लागली होती. वेस्ट मिन्स्टर ॲबे मध्यें हजारों लोकांना आपआपल्या दर्जाप्रमाणें बसतां येईल अशी सोय केली होती. नानातऱ्हेच्या चित्रविचित्र व मौल्यवान वस्तूंनीं ही जागा सुशोभित केली होती. एकामागून एक अशा बड्या मंडळींनीं प्रवेश केल्यानंतर **महाराज्ञी व्हिक्टोरिआ** यांनीं उच्च कुलांतील आठ स्त्रिया बरोबर घेऊन **वेस्टमिन्स्टर ॲबे** मधील सुशोभित केलेल्या भागांत प्रवेश केला. **महाराज्ञी सरकार** ज्या वेळीं सिंहासनारूढ झाल्या त्या वेळचा देखावा अतिशय मनोहर होता. **महाराज्ञी** सभास्थानीं गेल्यापासून तों आसनावर बसेपर्यंत **"ईश्वरा राज्ञीचें संरक्षण कर"**

१ प्रस्तुत प्रसंगीं समारंभ ज्या ठिकाणावरून पाहतां येण्याजोगा होता, त्या ठिकाणाच्या भाड्याबद्दल म्हणून प्रजेचे २००,००० पौंड खर्च झाले असें एका विश्वसनीय व मान्य अशा ग्रंथावरून समजतें.

२ हें एक **इंग्लंडांतील** अति जुनें व सुंदर असें **देवालय** असून **टेम्स** नदीच्या तीरावर आहे. प्राचीनकाळीं ह्या ठिकाणीं दाट झाडपें होतीं व म्हणूनच त्यावेळीं ह्या स्थळांना "**थॉर्निआईल** (कांटेरी बेट)" अशी संज्ञा होती. हल्लीं ह्याठिकाणीं बड्या लोकांच्या पुतळ्यांचा समुदाय आहे.

ह्या आवाजानें ती इमारत दणाणून गेली. तोफांची सरबत्ती चालूच होती, नंतर लागलीच **राणीसरकारनीं** गुडघे टेंकून सदरहू राज्य-शकट हांकण्याचे कामीं मदत मिळावी, ह्मणून परमेश्वराची प्रार्थना केली. पुढें **क्यान्टरबरीचे** त्या वेळचे मुख्य धर्माधिकारी यांनीं **लॉर्ड चान्सलर लॉर्ड ग्रेटचामरलेन**, वरिष्ठ कान्स्टेबल व **अर्लमार्शल** या मंडळीसह उठून जमलेल्या समूहास उद्देशून खालील अर्थाचें भाषण केलें.

" महाराज, ह्या राष्ट्राच्या **व्हिक्टोरिया** ह्या राज्ञी आहेत. यांत कांहीं संशय नाहीं. व ह्मणूनच त्यांना वंदन करण्याकरितां आपण सर्वजण येथें जमलों आहों तरी तसें करण्याची आपणा सर्वांस इच्छा आहेना ?" त्याजवर उत्तरादाखल ह्मणून जमलेल्या सर्वांनीं "ईश्वरा राज्ञीचें रक्षण कर" असे शब्द उच्चारले. **राणीसरकारास** घालण्याकरितां तयार केलेल्या रत्नजडित मुकुटाची किंमत एकलक्ष बाराहजार सातशें साठ पौंड होती. राज्यपद्धतीचे राज्याभिषेक संबंधीं जे कांहीं नियम आहेत त्या नियमानुसार शपथा वगैरे झाल्या. नंतर **महाराणी सरकार** सिंहासनारूढ झाल्या. सदरहू सिंहासनावर ह्यांच्या अगोदर ३३ राजे व ४ राण्या आरूढ झाल्या होत्या. जमलेल्या सर्व लोकांनीं **राणीसरकारास** मुजरे केले व मग समारंभ बर्खास्त झाला.

राज्याभिषेक झाल्यानंतर मेजवान्यांचा धडाका चालला होता. खुद्द **राणीसरकाराकडे** एक टोलेजंग मेजवानी झाली. **हाइड पार्क** मध्यें एक जंगी जत्रा भरली होती. वती पाहण्यास खुद्द **राणीसर-**

कार गेल्या होत्या. समारंभाचे रात्रीं शहरांतील सर्व नाटकगृहें व करमणुकीच्या इतर जागा यांत राणीसरकारच्या हुकुमावरून मुक्तद्वार ठेविलें होतें.

पार्लमेंट सभेच्या तयार झालेल्या खर्ड्यावरून पाहतां सदर्हू राज्याभिषेकाकरितां ६९८२१ पौंड १ शिलिंग आणि १० पेन्स ह्मणजे कमींत कमी ( आठ आणे शिलिंग धरला तर ) ६९८२१० रुपये १४ आणे ८ पै इतका खर्च झाला. राज्याभिषेकानंतर निरनिराळ्या लोकांस पदव्या देण्यांत आल्या.

# प्रिन्स आलबर्ट यांनीं महाराणीसरकारचें राज्यपदारोहणाचें वृत्त कळतांच त्यांना एक पत्र लिहिलें.

समारूढवर्ता श्रुत्वा राज्येऽत्रभवतीमहम् ॥
आशासे मनसा तुष्टः प्रजानां प्रेयसी भव ॥ १ ॥

महाराणी सरकारास राज्याभिषेक झाला त्या वेळीं आलबर्ट बॉन शहरीं विद्याभ्यास करीत होते; व तेथेंच त्यांना महाराणी सरकारच्या राज्यपदारोहणाचें वृत्त कळलें. हें वृत्त कळल्यावर त्यांनीं राणी-सरकारला एक पत्र लिहिलें. त्या पत्राचा भावार्थ येणें प्रमाणें:—

मुक्काम बॉन ता० २६ जून सन १८३७

आतां आपण यूरोपांतील बलाढ्य अशा राष्ट्राच्या राज्ञी झाल्या आहां, परमेश्वरकृपेनें आपणास हें जोखमाचें काम योग्यरीतीनें बजावण्यास बुद्धि व सामर्थ्य येवो. आपलें राज्य सुखाचें, चिरायु व वैभवाचें असें होऊन आपली प्रजा आपणाशीं कृतज्ञ असून प्रेमळ अंतःकरणानें वागेल अशी पूर्ण उमेद आहे.

आपला आज्ञाधारक व विश्वासू

"आलबर्ट"

# महाराणीसरकारची क्षमाशीलता.

महतामुदयोप्यत्र मुमूर्षु त्रायते ध्रुवम् ॥
उदयं यातवान् सूरो रक्षति क्लान्तपङ्कजम् ॥ १ ॥
उपकारिषु कुर्वन्ति दयां सर्वेपि सज्जनाः ॥
अपकारिजनं पाति राज्ञ्येका निधनात्खलु ॥ २ ॥

इहलोकांत मोठेपणाचें मुख्य लक्षण ह्मटलें ह्मणजे क्षमाशीलता अंगीं असणें हें होय. निरनिराळ्या देशांच्या इतिहासाचें अवलोकन केलें तरी देखील त्यांतही मोठ्या माणसांच्या अंगीं हा गुण असल्याचें आपणांस दिसून येतें. तेजस्वी कडक व क्रूर अशा तैमूरलंगाचेंही मत शत्रु दातीं तृण धरून आला तर त्याला त्याचे अपराधाबद्दल क्षमा करणें इष्ट आहे असें होतें.

---

**तार्तरी** देशामध्यें **समरकंद** नांवाचें शहर आहे. ह्या **समरकंद** शहराजवळील एका खेड्यांत **तैमूरलंगाचा** जन्म इ. स. १३३६ सालीं झाला. हा १३६९ त **राजा** झाला. राजा झाल्यानंतर आपलें राज्य वाढविण्याविषयीं याचे ठायीं उत्कट इच्छा उत्पन्न झाली. इ. स. १३९८ त ह्यानें आपल्या **हिंदुस्थानांत** प्रवेश करून **सरस्वती, फत्तेबाद** इत्यादि शहरांची नासाडी करून **दिल्लीवर** हल्ला केला. **दिल्लीपतीनें** ह्याचा मोड करण्यासाठीं बहुत यत्न केले; परंतु, दुर्दैवानें एकही यत्न सफल न होतां त्याला **गुजराथेंत**

तसेंच आपल्या शौर्यशालित्वी अहिल्याबाई होळकर ह्यांना ही कोणा

---

पळून जावें लागलें. तैमूरलंगाच्या मनांतून चीन देश हस्तगत करावा असें फार होतें; परंतु, ह्याचा अंत इ. स. १४०५ सालीं झाल्यामुळें ह्याची इच्छा जागच्या जागीं राहून ह्याला मृत्युलोकांतुन प्रयाण करावें लागलें. असें ह्मणतात कीं, ह्याचे मुलगे व नातू मिळून ३६ होते. हा पराकाष्ठेचा दुष्ट होता. ह्याच्या स्वभावांत वर्णन करावयाजोगी अशी एकच गोष्ट होती. ती ही कीं शत्रू दांतीं तृण धरून आल्यास त्याला क्षमा करणं हें तो आपलें कर्तव्य समजत असे.

१ **हिंदुस्थान**च्या इतिहासांत जीं कांहीं स्त्रीरत्नें प्रकाशमान झालेलीं आपणांस आढळतात त्यांपैकीं अग्रेसर जीं आहेत त्यांत **अहिल्याबाई होळकर** ह्या एक आहेत. इ. स. १७६६ त मयत झालेले प्रसिद्ध **मल्हारराव होळकर** हे **अहिल्याबाई साहेबां**चे श्वशुर होत. ह्यांच्या हातांत इ. स. १७९५ पर्यंत राज्यसूत्रें होतीं; व ह्याच सालीं ह्यांचा अंत झाला. **पेशवे सरकार**चे मतानें ह्यांनीं **तुकोजी**राव ह्यास दत्तक घेतलें होतें. ह्यांची वृत्ति क्षमाशील, उद्योगी व अतिशय उदार अशी होती. ह्या विद्याविभूषित होत्या. राज्यकर्ता ह्या नात्यानें आवश्यक लागणारे सर्व कांहीं गुण ह्यांचे अंगीं पूर्णावस्थेंत होते. **होळकरा**ची राजधानी जें **इंदूर** शहर तें ह्यांचे कारकिर्दीपूर्वीं निव्वळ खेडेगांवांत मोडत असे. ह्यांना खुषामत्त कर्शा ती मुळींच आवडत नसे. ज्या अतुल पराक्रमी व राजकार्यधुरंधर स्त्रीनें शूर **रघुनाथराव** पेशवे ह्यांस ते ह्या स्त्रिशीं लढाईच्या बेतांत असतां, एक पत्र लिहून त्यांत "मी स्त्री आहें, आपल्यासारख्या वीरसिंहाला माझ्यासारख्या अबलेबरोबर लढाई करून मला जिंकल्यानें मोठीशी कीर्ति मिळेल असें नाहीं; कदाचित् दैवदुर्विपाकानें माझ्या सैन्यानें जास्त पराक्रम करून आपल्या सैन्याचा थोडासा मोड केला तर आपली अपकीर्ति मात्र होईल तर ह्याबद्दल विचार करून जें योग्य दिसेल तें करावें." अशा अर्थाचा मजकूर निर्दिष्ट करून **राघोबादादां**स आपला लढाईचा बेत रहीत करावयास लावलें तीच ही **महाराणी अहिल्याबाई होळकरीण** होय.

एखाद्यास मृत्यूची शिक्षा देण्याचा प्रसंग आल्यास फार वाईट वाटत असे; व अशी शिक्षा नाइलाजास्तव देण्याची जरुरी पडल्यास शिक्षा दिल्यावर कित्येक दिवसपर्यंत त्यांना चैन पडत नसे. आपल्या सनातन अशा **हिंदुधर्मां**तील पुराणांतरीं असणाऱ्या गोष्टींवरूनही क्षमाशीलतेची खरी योग्यता आपणांस सहज कळून येते. पांडवांमध्यें[1] **धर्म**राजालाच[2] एवढा मान कां? त्याचेंच जास्त वर्णन कां

---

१ **संस्कृत** भाषेंत **महाभारत** म्हणून जो सुमारें ७००० वर्षांपूर्वी झालेला ऐतिहासिक व अत्यंत महत्वाचा ग्रंथ आहे त्यांत **पांडवां**ची हकिकत नमूद आहे. हे पंडूराजाचे मुलगे म्हणून यांना **पांडव** असें म्हणतात. **पंडु** राजाला दोन बायका होत्या. एकीचें नांव **कुंती** व एकीचें नांव **माद्री**. **धर्म**, **भीम**, **अर्जुन** व **कर्ण** हे चार कुंतीचे मुलगे होत. ह्यांपैकीं **कर्ण** हा **कुंतीला** कन्यकावस्थेंमध्यें झाल्यामुळें साहजिक लाज उत्पन्न होऊन तिनें त्याचा त्याग केला. **कर्णा**ला मी **कुंती**चा तनुज आहें ही गोष्ट माहीत नसल्यामुळें तो **भारतयुद्धांत कौरव** (**पांडवां**चे प्रतिस्पर्धी) पक्षाकडे मिळाला होता; व म्हणूनच सर्व साधारण रीला बोलतांना ह्याची **पांडवां**त गणना करीत नाहींत. **माद्री**ला दोन जुळे पुत्र होते; व तेच **नकुळ** व **सहदेव** ह्या संज्ञांनीं **भारतां**त प्रसिद्ध आहेत.

२ हा मोठा योद्धा असून सर्व **पांडवां**त वडील होता. सत्यवक्तेपणा व क्षमाशीलता हीं दोन्हीही ह्याचे अंगीं मूर्तिमंत होतीं. ह्या धर्मराजाला आपल्या सत्यवक्तेपणापासून किंचित् तरी पराङ्मुख होण्याचा जो एकदांच प्रसंग आला तो, **द्रोणाचार्यां**नीं ह्याला **अश्वत्थाम्या**च्या मृत्यूची वार्ता विचारली त्या वेळचा होय, त्यावेळीं **धर्म**राजानें "**नरो वा कुंजरो वा**" असें संशयात्मक उत्तर दिलें. ह्यावरूनच वरील म्हण प्रचारांत आली असावी असें वाटतें.

केलें आहे? ह्या दोन्ही गोष्टींना धर्मराजाच्या आंगची क्षमाशीलता कारणीभूत होय. फार काय प्रत्यक्ष सख्या भावानें धर्मराजास अनुलक्षून भरसभेंत.—

रे सहदेवा सत्वर पुष्कळसा अग्नि आण जाच कसा ॥
जाळूं याचे हे कर आह्मांला सोसवेल जाच कसा ॥

**मोरोपंत.**

असें ह्मटलें तरी देखील त्या महात्म्यानें तोंडावाटे ब्रसुद्धां काढला नाहीं. असें एक का अनेक उदाहरणें आहेत कीं, ज्यांच्यावरून धर्मराजाच्या आंगची क्षमाशीलता प्रकट होते.

असो, क्षमाशीलतेसंबंधें विस्तृत लिहितां येईल असें हें स्थल नाहीं. प्रस्तुत स्थलीं क्षमाशीलता हा एक अलौकिक व ज्याचें मोल कधींच करवणार नाहीं असा एक सद्गुण आहे एवढें ह्मटलें असतां पुरे होईल. हा अलौकिक व अमोल्य सद्गुण आपल्या दयाळू **महाराणी व्हिक्टोरिआ** ह्यांचे ठायीं जे अनेक सद्गुण आहेत त्यांतील एक आहे. **महाराणी सरकारनीं** हा सद्गुण कांहीं आजकाल संपादलेला आहे असें नाहीं; तर तो स्वभावसिद्धच त्यांचे अंगीं आहे. त्या सिंहासनारूढ होऊन थोडेच दिवसांचे आंत त्यांचे अंगची क्षमाशीलता लोकांच्या प्रत्ययास आली ती अशीः—

**महाराणीसरकार** सिंहासनारूढ होण्यापूर्वीपासूनच **इंग्लडांत** अशी चाल होती कीं, कोणाही मनुष्यास मृत्यूची शिक्षा द्यावयाची ठरल्यास त्या शिक्षेच्या हुकुमावर गादीवर असलेल्या राजाची अ-

गर राज्ञीची सही घ्यावी लागत असे. ही चाल आतां कायद्यानें बंद झाली आहे.—ह्या परिपाठानुरूप **महाराणीसरकार**कडे त्या वेळचे मुख्य प्रधान **ड्यूक आफ् वेलिंग्टन** ह्यांनीं एक मृत्यूच्या शिक्षेचा हुकुम सही करण्याकरतां आणला. अशा प्रकारच्या कागदावर सही करण्याचा **महाराणीसरकार**चा हा पहिलाच प्रसंग होता. सदरहू शिक्षा एका लष्करांतून पळून गेलेल्या मनुष्यावर अमलांत आणावयाची होती. **महाराणीसरकार**नीं हा हुकुमाचा कागद साद्यंत वाचून पाहिल्यावर त्या स्वभावसिद्धच क्षमाशील असल्यामुळें त्यांचे डोळे पाण्यानें भरून गेले व त्यांनीं **ड्यूक आफ् वेलिंग्टन** ह्यांस विचारलें, "ह्या मनुष्याच्या तर्फेनें अनुकूल असें तुह्मांला कांहीं कमजास्त सांगतां येत नाहीं काय ?" त्यावर **ड्यूक आफ् वेलिंग्टन** ह्मणाले "कांहीं नाहीं. सरकार, तो एकदां सोडून तीनदां पळून गेला आहे." त्यावर **महाराणीसरकार** ह्मणाल्या "विचार करा, पुन्हां विचार करून कांहीं बोलावयाचें असल्यास बोला." **ड्यूक साहेब** धूर्त असल्यामुळें त्यांचे मनांत आपले तोंडून थोडीतरी शिफारस ऐकून घेऊन त्याच मुद्यावर **महाराणीसरकार**ची इच्छा ह्या मनुष्यास सोडून द्यावयाची आहे असें आलें व ह्मणूनच ते ह्मणाले "सरकार जरी तो वाईट मनुष्य आहे असें ठरतें तरी कांहीं साक्षीदारांनीं त्याच्या तर्फेनें जबान्या दिल्या आहेत व त्याचे विरुद्ध असें माझ्या कांहींएक ऐकण्यांत नाहीं." **ड्यूक साहेबां**च्या तोंडचे हे उद्गार ऐकून **महाराणी**

सरकारला फार आनंद झाला व ड्यूक साहेबांच्या ह्या कृत्याबद्दल त्यांनीं आभार मानले व सहीला आणलेल्या कागदावर "क्षमा केली आहे" अशीं अक्षरें लिहून आपली सही करून कागद माघारा दिला.

कोणत्याही मनुष्याचे अंगीं क्षमाशीलता असणें जरूर आहे. हा सद्गुण संपादन करण्यास पैसा अगर विद्या लागत नाहीं; विवेकाचें अवलंबन करण्यापलीकडे दुसऱ्या कोणत्याही सामुग्रीची जरूरी नाहीं. क्षमाधारण हें मानवी प्राण्यास भूषणच होय. म्हणून, प्रत्येक मनुष्यानें हा सद्गुण संपादन करण्याच्या कामीं मनापासून झटावें हाच बोध चरित्राच्या ह्या लहानशा भागापासून घेण्याजोगा आहे.



# प्रिन्स आलबर्ट ह्यांचें संक्षिप्त चरित्र.

**जर्मनी**नामको देशो विद्यते प्रथितो भुवि ।
तस्मिन्विद्याकलाहेतुः प्रान्तः **कोबर्ग**संज्ञकः ॥ १ ॥
**अर्नेष्ट**संज्ञितो राजा तदर्धीशोभवत्पुरा ।
**आल्बर्टा**ख्यः सुतस्तस्य कनिष्ठः सकलेष्टकृत् ॥ २ ॥
विधिवच्छासतस्तस्य पृथिवीं पृथिवीपतेः ।
चरितं चानुकारार्हं यतनीयं सदा नरैः ॥ ३ ॥

राणीसरकारचें चरित्र लिहीत असतां त्यांच्या पतीबद्दल संक्षिप्त माहिती देणें हें कांहीं अप्रासंगिक होणार नाहीं असें समजून त्यांचें चरित्र संकलित अशा रीतीनें वाचकांपुढें ठेवितों.

**प्रिन्स् आलबर्ट** यांचा जन्म ता० २६ आगष्ट १८१९ रोजीं ह्मणजे **राणीसरकार**चा जन्म झाला त्याच सालीं **जर्मनीं**तील **कोबर्ग** शहरापासून चार मैलांवर **रोसेनु** नामक शहर आहे त्या शहरीं झाला. ह्यांचे वडील **सॅक्सोबर्ग सालफेल्ड** येथील **ड्यूक** होते. ह्यांना एक वडील भाऊ होता. या भावाचें नांव **अर्नेस्ट** होतें.

प्रिन्स आलबर्ट वयानें पांच वर्षांचे होते, तेव्हां त्यांची व त्यांच्या मातोश्रीची ताटातूट झाली. ह्या ताटातुटीचें कारण त्यांच्या मातोश्री व वडील ह्या उभयतांमधील आलेलें वैमनस्य होय. मातोश्रीची जरी ता[illegible] झाली तरी त्यांच्या आजीनें त्यांचें योग्य संगोपन केलें. यामुळें मात[illegible] उणीव त्यांना मुळींच भासली नाहीं. लहानपणांत हे नाजूक परतु सुंदर दिसत. आलबर्ट हे समजूं लागल्यापासून दिनवृत्त लिहीत असत. ह्यांना गाण्याचा नाद असून हे विद्याविभूषित असे होते. हे लहानपणीं आपल्या जेष्ठ बंधूजवळ राहत असत. इसवी सन १८३० सालीं हे बॉन शहरीं विद्याभ्यास करण्यासाठीं पाठशाळेंत गेले. हे लहानपणापासून तालमेचे शोकी असून तींत मर्मज्ञही होते. मातोश्रींनीं ह्यांना २९०० पौंड वार्षिक उत्पन्नाची मालमत्ता ठेविली होती; परंतु ईशकृपेनें यांचा व राणीसरकारचा विवाह झाल्यावर ही मालमत्ता ह्यांनीं आपल्या वडील बंधूस दिली.

लहानपणापासून ह्यांचें व राणीसरकारचें दळण वळण होतें इतकेंच नव्हे तर अगदीं जवळचा असा नात्याचा संबंध होता. राणीसरकारचा जन्म झाल्यानंतर पाठीमागून तीन महिन्यांनीं यांचा जन्म झाला. आतां भरतभूमींतील कांहीं वाचकांस [illegible] साहेब राणीसरकाराहून तीन महिन्यांनीं लहान होते [illegible] प्रत्येक मनुष्या[illegible] कारण आमचेकडे वरापेक्षां वधू लहान हें वाचून आश्चर्य वाटेल; [illegible] येथ[illegible] स्थिति नाहीं. ज्या उपाध्यायांनीं असते. परंतु, इंग्लंडांत तशी प[illegible]

**प्रिन्स् आलबर्ट** यांस **ख्रिस्ती** धर्मानुसार द्यावी लागते ती दीक्षा दिली होती त्याच उपाध्यायांनीं **राणीसरकार**चे वडील व मातोश्री यांचा विवाह लाविला होता हा एक विलक्षण योग घडून आला. **राणीसरकार**चा **प्रिन्स् आलबर्ट** यांशीं विवाह होणार अशी कल्पना त्यांचे नातलगांचे मनांत हीं दोघें लहान होतीं, तेव्हां पासूनच घोळत होती. बाळपणांत **प्रिन्स् आलबर्ट** फार द्वाड होते; परंतु पुढें फार सज्जन, दयाळु व लोकप्रिय असे निपजले. दहावर्षांचे होईपर्यंत हे बहुतेक आजारी असत. ह्यांचीं कृत्यें व भाषण हीं दोन्ही कडकडीत नीतितत्त्वानुसार असत.

इ०सन १८३८ सालीं **राणीसरकार** व **प्रिन्स् आलबर्ट** हीं दोघेंही वयानें १९ वर्षांचीं झालीं ह्मणून याच सालीं **लिओपोल्ड** ( **राणीसरकार**चे मातुल ) राजानें **राणीसरकार**ला लग्नाचा बेत पुढील सालीं ह्मणजे १८३९ सालीं करण्याविषयीं सूचना केली. ह्या वेळीं **राणीसरकार**नीं "लग्नाचा घाट लांबणीवर टाकला असतां बरें" अशा अर्थाचें कांहीं सयुक्तिक व सप्रमाण कारणें दाखवून उत्तर दिलें. यापुढें एक वर्षानें **राणीसरकार**नीं **लिओपोल्ड** यांस आपण होऊनच लग्नाची घाई दर्शविली; व पुढें लवकरच ह्मणजे ता० १० फेब्रुआरी सन १८४० रोजीं एकमेकांचे मनांत उभयतांचा परस्परांशीं विवाह व्हावा असें फार दिवस घोळत असणाऱ्या ह्या वधूवरांचा विवाह ह्यांच्या ऐश्वर्यानुरूप झाला.

**प्रिन्स आलबर्ट** ह्यांच्या जेष्ठ रंजीवाना **आलबर्ट प्रिन्स् ऑफ**

वेलस असें ह्मणतात. ह्या दोन नांवांचा घोंटाळा होऊं नये ह्मणून प्रिन्स् आलबर्ट ह्यांस "प्रिन्स् कन्सार्ट" ह्मणण्याचा प्रघात पडला ह्मणूनच इतिहासांत ते "प्रिन्स् कन्सार्ट" ह्या संज्ञेनें आढळ. "कन्सार्ट" ह्या शब्दाचा खरा अर्थ पाहूं गेलेंतर पति असा. इ. लग्न झाल्यापासून तों ह्यांची इहलोकची यात्रा संपेपर्यंत ह्यांनीं आपला सर्व काल इंग्लंडांतील लोक कसे आहेत, इंग्लंडची राजनीति कोणत्या प्रकारची आहे, इंग्लंडमध्यें प्रचारांत असलेल्या कायद्याचें स्वरूप काय आहे व त्यांची अम्मलबजावणी कितपत व कशी घडते वगैरेसंबंधानें यथातथ्य माहिती मिळविण्यांत घालविला. सुप्रसिद्ध कायदेपंडित (बॅरिस्टर) मि. सेलबिन ह्यांजपाशीं प्रिन्स् आलबर्ट हे दररोज कांहीं वेळ कायद्यांचा अभ्यास करीत असत. हॅलम साहेबांचा इंग्लडच्या इतिहासाचा जो बहुमान्य व सर्वप्रसिद्ध इंग्रजी भाषेमध्यें ग्रंथ आहे तो प्रिन्स् आलबर्ट व आपल्या दयाळू राणीसरकार हीं दोघें कांहीं दिवसपर्यंत बरोबर वाचीत असत.

प्रिन्स आलबर्ट ह्यांस व्याख्यान देण्याची फार हौस असे. ह्यांचें इंग्रजी भाषेंत जें प्रथमतःच व्याख्यान झालें तें इ. स. १८४० सालीं "गुलामगिरी" ह्या विषयावर झालें. शास्त्रीय विषयांचें अध्ययन प्रत्येक मनुष्यानें केलेंच पाहिजे असा ह्यांचा ग्रह होता व ह्मणूनच ह्यांनीं "केम्ब्रिज" येथील विश्वविद्यालयाचे (युनिव्हरसिटिचे) चान्सेलर झाल्यावर पदवी धारण करूं इच्छिणाऱ्या

हरएक उमेदवारानें कायदे, पदार्थविज्ञानशास्त्र, नीतिशास्त्र, रसायनशास्त्र अथवा वनस्पतिशास्त्र ह्या विषयांच्या अध्ययनांत निदान कांहींएक दिवस तरी घालविले पाहिजेत असा नियम केला.

सार्वजनिक कृत्यांत पुढाकार घेण्याची ह्यांना फार आवड असे. इ. स. १८५१ सालीं भरलेल्या जंगी प्रदर्शनावरून ह्यांचे अंगीं असलेला सार्वजनिक कामांमधील पुढारीपणा व्यक्त होत आहे. ह्यांचा अंत इ. स. १८६२ सालीं झाला.



# प्रिन्स् आलबर्ट व राणीसरकार या उभयतां-मध्यें लग्न ठरलें.

ईहादिभिः स्वप्रभवान्समागमान् । दिवानिशं चिन्तयतोश्च कामिनोः ॥
अपि दृष्टिपथं प्रपन्नयोः । निर्विविश्वास चिरं मनस्तयोः ॥ १ ॥

प्रस्तुत भागांत राणीसरकारचें लग्न राणीसरकारनीं स्वतःच ठरविलें असें वाचून ज्यांना आंग्लभौमांच्या रीतिरिवाजांची कल्पना नाहीं अशा आमच्या भरतभूमींतील वाचकांस जरा तरी आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. परंतु, त्यांना तसें वाटावयास नको. आपणामध्यें जे विवाह होतात त्यांपैकीं बहुतेक विवाह वधूवरें सज्ञान होण्यापूर्वींच होतात; आणि या वधूवरांच्या अज्ञानावस्थेमुळें लग्नसंबंधीं हरएक गोष्टींच्या बरेवाईटपणाबद्दल विचार करण्याची शक्ति त्यांच्या अंगीं आलेली नसते. शिवाय, आपलेकडील लग्नाचे करार व देशकालवर्तमान यांजकडे लक्ष दिलें तर लग्न ही एक अतिशय जबाबदारीची गोष्ट असून तींत यत्किंचितही चूक झाली तर तिजबद्दल अनर्थकारक असे परिणाम वधूवरांना जन्मभर सोसावे लागतात असें ह्मटल्यावांचून कोणीही राहणार नाहीं. या कारणास्तव, आप-

णांमध्यें ज्या अर्थी लग्न ही एक जोखमाची बाब असून वधूवरांना अमुक एक लग्नाच्या इष्टानिष्टतेचा निर्णय करण्याची शक्ति नसते त्या अर्थी लग्नसंबंधीं हरएक बाबींचा ठराव, वधूवरांच्या योग्यायोग्यपणाचा विचार वगैरे गोष्टींचा निर्णय वधूवरांच्या आईबापांकडून अगर नात्यानें श्रेष्ठ व अनुभविक अशा नातलगांकडून केला जातो. ह्याच्या अगदीं उलट अशी स्थिति आंग्लभौमांचे लग्नसंबधीं नियम आहेत त्यांची आहे. त्यांच्यांतील बहुतेक विवाह वधूवर सज्ञान झाल्याशिवाय होत नाहींत; व सज्ञान झालीं तरी त्यांच्यांतील लग्नें आईबाप, वडील, अगर शिष्ट संभावित माणसें ह्यांच्या निवडणुकीनें अगर आग्रहानें न होतां वधूवरांच्या प्रत्यक्ष व परस्पर संमतीनें होतात. लिओपोल्डनीं आलबर्ट यांजपाशीं विवाहाचा बेत लवकरच करावा अशी राणीसरकारास सूचना केली व त्या सूचनेवर राणीसरकारनीं बेत लांबणीवर टाकिला असतां बरें असें उत्तर दिलें हें वाचकांस यामागें निवेदन झालेंच आहे. असें उत्तर राणीसरकारनीं देतांना दिलें खरें; परंतु कांहीं कालानें राणीसरकारच्या विचारांत फरक पडून आपला विवाह प्रिन्स् आलबर्ट यांच्याशीं लवकर व्हावा अशी उत्कट इच्छा त्यांचे मनांत उत्पन्न होऊन ती दिवसेंदिवस बलवत्तर होत चालली. शेवटीं, त्यांनीं आपली एक तसबीर काढवून ती प्रिन्स् आलबर्ट यांजकडे इ० सन. १८३९ सालचे आक्टोबर महिन्याचे पूर्वी पाठविली. ज्या वेळीं ही तसबीर प्रिन्स् आलबर्ट यांचे घरीं येऊन

[ति]चली त्यावेळीं ते घरीं नसून प्रवासांत होते. प्रवासांतून परत आल्यावर ते आपल्या नेहमींच्या बसावयाच्या जागेंत गेले तों सकृद्दर्शनीं त्यांस **राणीसरकार**ची मनोहर व हस्तमुख अशी तसबीर दृष्टीस पडली; व, त्या वेळीं त्यांना जो आनंद झाला तो अवर्णनीय होता. नंतर याच वर्षाचे ह्मणजे इ० सन १८३९ सालचे आक्टोबर महिन्यांत **प्रिन्स् आलबर्ट** आपल्या ज्येष्ठ बांधवासह **आंग्लभूमींत** दाखल झाले. **आंग्लभूमींत** येण्याची ही त्यांची तिसरी पाळी होती. आल्याबरोबर हे **बकिंगहॅम** प्रासादांत उतरले, व तेथून त्यांना **राणीसरकार**च्या तैनातींतील गाड्यांमधून **वुइन्डसरकॅसल** मध्यें आणिलें. **प्रिन्स् आलबर्ट** तेथें आल्यावर **राणीसरकार**चा नित्यक्रम ह्मटला ह्मणजे प्रातःकाळीं उठून नऊ वाजण्याचे सुमारास भोजन करून सदरहू राजपुत्राला भेटीस पाचारण करणें हा होता. राजपुत्रही त्या त्यांच्या पाचारणाला दररोज मान देत असत. प्रातःकाळीं गेल्यापासून तों दोनप्रहरचे दोन वाजतांचा उपहार होईपर्यंत हे, राणीसरकार व त्यांच्या मातोश्री हीं बोलत बसत. उपहारानंतर **प्रिन्स्आलबर्ट, राणीसरकार, राणीसरकार**च्या मातोश्री व **प्रिन्सआलबर्ट** ह्यांचे बंधु असा हा राजघराण्यांतील चौकडा घोड्यावर बसून बरोबर बऱ्याच परिवारानिशीं रपेटीस निघे. दररोज **बॉल** (**इंग्रजी**रीतीचें एक प्रकारचें नृत्य) होत असेच. अशा तऱ्हेनें कांहीं दिवस गेल्यानंतर **राणीसरकार**नीं **प्रिन्स् आलबर्ट** यांस आपण

माझें पाणिग्रहण करावें अशी प्रत्यक्ष विनंती न करितां पर्यायानें आडवे तिडवे प्रश्न घालण्यास सुरवात केली. एके वेळीं **राणी-सरकारनीं प्रिन्स्आलबर्ट** यांस "आपणाला इंग्लंड कितपत आवडतें" असा हंसत हंसत प्रश्न केला. त्या वेळीं **प्रिन्स्आलबर्ट** यांणीं "मला **इंग्लंड** फार आवडतें" असें उत्तर दिलें. दुसरे-दिवशीं **राणीसरकारनीं** ह्याच प्रश्नाची पुनरावृत्ति केली; व **प्रि-न्स्आलबर्ट** यांनींही जबाबाची पुनरावृत्तिच केली. तिसरे दिवशीं **राणीसरकारनीं** प्रश्नाच्या शब्दरचनेंत फेरफार करून लाजाळूप-णानें परंतु प्रफुल्लित मुद्रेनें **आलबर्ट** यांस "आपली **इंग्लंडांत** राहण्याची इच्छा आहे काय?" असा प्रश्न केला. हा प्रश्न झा-ल्याबरोबर **प्रिन्स्आलबर्ट** यांणीं त्यांच्या **इंग्लंड**मधील पहिल्या सफरीपासूनचें **राणीसरकार**संबंधीं त्यांचे मनांत आलेले तर्क व गुप्त विचार प्रकट करून **राणीसरकारच्या** इच्छेला आपली पूर्ण मान्यता दाखविली.

पुढें कांहीं दिवसांनीं **राणीसरकारनीं प्रिन्स्आलबर्ट** ह्यांस आपल्या बसावयाचें जागेंत बोलावून आणून आपला मनोदय उ-घड रीतीनें कळविला. **प्रिन्स्आलबर्ट** यांणींही कांकूं न करितां **राणीसरकारचा** मनोदय पूर्ण करण्याबद्दल आश्वासन दिलें.

यापूर्वीं कांहीं दिवस **राणीसरकारनीं बॅरनस्टॉकमार** यांना मी बराच कालपर्यंत अविवाहित राहणार अशा आशयाचें पत्र लिहिलें होतें. परंतु, आतां **आलबर्ट** यांजपाशीं विवाह करण्याचें ठरल्या-

ळें मशारनिल्हे बॅरनस्टॉकमार यांस राणीसरकारनीं आपल्या विवाहासंबंधीं पुनः पत्र लिहिलें. त्या पत्रावरून राणीसरकारचे मनांत प्रिन्स्आलबर्ट ह्यांचीच आपण सहधर्मचारिणी व्हावें अशी उत्कट इच्छा होती हें स्पष्ट होत आहे; ह्मणून, वाचकांच्या माहितीसाठीं त्या पत्राचा सारांश देतों. तो येणें प्रमाणें:—

"मी कांहीं दिवसांपूर्वीं जें काय बोललें होतें त्याचे विरुद्ध गोष्ट आज प्रातःकाळीं माझे हातून घडली हें कळविण्यास मला फार भीति वाटते. परंतु जो मजकूर मी लिहीत आहें तो पाहिल्यानंतर मला भिण्याचें कांहीं एक कारण नाहीं असें आपणांस वाटेल अशी माझी पक्की खात्री आहे.

प्रिन्स्आलबर्ट व मी ह्या उभयतांमध्यें लग्नसंबंधीं हरएक गोष्ट ठरली. त्यानें माझ्या हृदयसंपुटांत पूर्णपणें वास्तव्य केलें आहे. तो मला सुख देईल व मीही त्याला सुखी ठेवीन. इत्यादि, इत्यादि."

या प्रमाणेंच प्रिन्स्आलबर्ट यांणीं आपल्या आजीबाईस पत्र लिहिलें, तेंही वाचण्यालायक असून त्या उभयतांची परस्परांचा लग्नसंबंध होण्याविषयीं किती उत्कट इच्छा होती ह्याचें द्योतक आहे असें वाटल्यावरून त्याचाही सारांश देतों तो येणेंप्रमाणें:—

"परवां नुकतेच राज्ञी व्हिक्टोरिआ ह्यांनीं मला एकट्यालाच बोलावून नेलें; व, प्रेमभरित अशा अंतःकरणानें मला वरण्याविषयीं आपली इच्छा दर्शविली. मी त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें लग्न करण्यास प्रवृत्त झालों तर त्यांच्या सुखाची परमावधि होईल, असेही उद्गार त्यांनीं काढिले. सरते शेवटीं, माझ्याशीं विवाह करण्यास आपण योग्य स्त्री नाहीं असेंही ह्मटल्यावा-

चून त्यांच्यानें राहवलें नाहीं. या त्यांच्या प्रेमपुरःसर व उघड अशा भाष णांनीं माझें मन मोहून गेलें."

राणीसरकार व प्रिन्स् आलबर्ट या उभयतांमध्यें लग्नाचें कायम ठरल्यावर राणीसरकारनीं राजा लिओपोल्ड व राज घराण्यांतील इतर कांहीं लोकांस आपल्या इच्छित विवाहाच्या कायमपणाचें वृत्त कळविलें. इतर लोकांस मात्र ही गोष्ट प्रसिद्ध रीतीनें ता० २३ नोव्हेंबर १८३९ पर्यंत कळली नव्हती.

ता० २३ नोव्हेंबर १८३९ रोजीं राणीसरकार गुप्त सभा भरवून आपला विवाहसंबंधीं मनोदय खालीं शब्दांनीं कळविला. ते शब्द येणें प्रमाणें:—

"ज्या माझ्या विश्वासाचा माझ्या आनी सुखाशीं व माझ्या प्रजेच्या कल्याणाशीं अतिनिकट असा संबंध आहे असा माझा निश्चय आपणांस कळविण्याकरितां आज आपणांस येथे पाचारण केलें आहे. जगन्नियंत्याच्या मनांत आणलेली गोष्ट केली तर मला व प्रजेला सुख देईल अशा भरपूर आशेनें व मी ठरविलेली गोष्ट यथायोग्य आहे अशी माझ्या मनाची बराच वेळ सर्व दृष्टींनीं पाहून खात्री झाल्यावर मी प्रिन्स् ऑलबर्ट यांशीं विवाह करण्याचें योजिलें आहे." इ०

ह्या प्रमाणें निश्चय कळविल्यानंतर ता० १६ जानेवारी १८४० रोजीं पार्लमेन्ट भरल्यावर पार्लमेन्टला लग्नसंबंधीं सदरहू हकीकत राणीसरकारनीं कळविली व पार्लमेन्ट सभेनें प्रिन्स् आलबर्ट यांस त्यांचे योग्यतेस शोभेल असा किताब द्यावा अशाबद्दल सूचना केली.

अशी सूचना खुद्द राणीसरकारनीं केल्यावरून ह्या सूचनेचा खर्डा पार्लमेन्ट सभेच्या शाखांनीं पसंत केला; व ह्मणून, राणी-सरकारच्या हस्तें प्रिन्स् आलबर्ट यांस "हिज रॉयल हायनेस्" हा किताब व ब्रिटिश सैन्यांत "फिल्डमार्शल" असा हुद्दा देण्यांत आला. याशिवाय, दरसाल ३०००० पौंडांची नेमणूक प्रिन्स् आलबर्ट यांस मिळावी असेंही पार्लमेन्ट सभेनें ठरविलें.

लग्नाचा मुहूर्त ता० १० फेब्रुआरी १८४० ठरला.



# लग्न.

मनसा मन आश्लिष्टं पूर्वमेव द्वयोस्तयोः ॥
धर्माचारविधानेनाद्वैतानन्दं समन्वभूत् ॥ १ ॥

लग्नाचा मुहूर्त ता० १० फेब्रुआरी १८४० ठरल्या प्रमाणें ता० ८ फेब्रुआरी रोजीं प्रिन्स्आलबर्ट यांचे वडील आपल्या पुत्रद्वयासह "बकिंगहॅम पॅलेस" नामक राजवाड्यांत आले. तारीख ९ माहे फेब्रुआरी रोजीं **प्रिन्स्आलबर्ट** यांनीं राजघराण्यांतील [illegible] व इतर वडेलोकांच्या भेटी घेतल्या. ता० १० रोजीं प्रभातकालपासून सर्व शहरभर "ईश्वरा राज्ञीचें रक्षण कर" अशा शब्दांचा राजनिष्ठ प्रजेकडून जयघोष चालला होता. शंभर वर्षांत राज्यकर्त्या राज्ञीचा असा विवाहसंबंध होण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें व **राणीसरकार** लोकप्रिय असल्यामुळें संपूर्ण प्रजाजनांचीं अंतःकरणें प्रेमभरित होऊन त्यांचे चेहऱ्यावर फारच रमणीय अशी प्रफुल्लता दृष्टिगोचर होत होती. वधूवरें ज्या मार्गानें समारंभाच्या स्थळीं ह्मणजे **सेंन्ट जेम्स पॅलेस** मध्यें जावयाचीं होतीं त्या मार्गानें प्रेक्षकसमुदाय हा आनंदजनक समारंभ पाहण्यासाठीं जागोजाग थवेच्या थवे करून तटस्थ बसला होता. कोणी माड्यांवर, कोणी गच्चयांवर, कोणी घरांच्या पाळ्यांवर, फार तर काय वाटेनें असणाऱ्या तरुशाखांवर सुद्धां

हजारों लोक बसून तरूंच्या अस्तित्वाची नष्टता कांहीं कालपर्यंत भासमान करीत होते. या दिवशीं सकाळीं बरीच थंडी पडली असून आकाश मेघाच्छादित होतें तरी संपूर्ण प्रजेच्या मनांत राज्ञीचा विवाहसमारंभ डोळे भरून पाहण्याची इच्छा वास्तव्य करीत असल्यामुळें थंडीचा कडाका इत्यादिकांकडे लक्ष न देतां नागरिकांनीं **सेन्ट जेम्सकडे** जाणारे मार्ग फुलविलेले होते. प्रत्यक्ष राज्याभिषेक समयीं सुद्धां एवढा समाज एकवटला नव्हता. समारंभ ज्या माड्यांवरून, गच्चया वगैरे ठिकाणांवरून दृष्टिगोचर होणें शक्य होता त्या ठिकाणाच्या मालकांनीं समारंभ पाहण्यास उत्सुक असून ज्यांचीं स्वतःचीं ठिकाणें नव्हतीं, परंतु अल्प स्वल्प भाडें देण्याची शक्ति होती अशा जनसमुदायाकडून मोबदला घेऊन त्यांस समारंभ पाहण्यास आपल्या जाग्यांत बसण्याची परवानगी दिली; व अशा रीतीनें आपणांस गबर करून घेतलें.

दोन प्रहरचे पावणे बारा वाजतां **प्रिन्स् आलबर्ट** हे कांहीं **बड्या** ग्रामस्थमंडळीसह **सेन्ट जेम्स** पॅलेसमध्यें जावयास निघाले. ह्या वेळेस त्यांचे बरोबर त्यांचे वडीलही होते. खुद्द **राणीकार** बारा वाजून वीस मिनिटांनीं आपल्या मातोश्री व **सन्दरढच्या** डचेस वगैरे मंडळीसह **सेन्ट जेम्स** पॅलेसमध्यें जावयास निघाल्या. निश्चित स्थळीं जाऊन पोहोंचेपर्यंत वाटेनें उत्सुकतेनें उभ्या असणाऱ्या प्रजाजनांचे मुजरे घेतां घेतां **राणीसरकार** व **प्रिन्स्आलबर्ट** यांस पुरेसें झालें. **सेन्ट जेम्स** पॅलेसमध्यें गेल्यावर

शास्त्रोक्त व कालदेशवर्तमानानुसार हा विवाहविधि **आर्चबिशप् ऑफ् क्यान्टरबरी** व **बिशप ऑफ् लंडन** यांच्या हस्तें यथासांग झाला. प्रत्यक्ष राज्ञीचा विवाह तेव्हां ज्या दिवाणखान्यांत समारंभ झाला त्या दिवाणखान्याची शोभा, समारंभाचे वेळची व्यवस्था, समारंभाला झालेला खर्च, समारंभाला जमलेल्या मंडळीची संख्या, इष्टमित्रांच्या पाहुणचाराची रीत वगैरे गोष्टींचें जेवढें वर्णन करावें तेवढें अपूर्णच होणार आहे. विवाहविधि आटोपल्यानंतर **राणीसरकार** व **प्रिन्स्आलबर्ट** अशीं एका रथांत बसून इतर रथ व मंडळीसह **बकिंगहॅम पॅलेसमध्यें** आलीं. लग्नसमारंभ झाल्यानंतर तत्संबंधीं होणारी मेजवानी **बकिंगहॅम पॅलेसमध्यें** झाली. या मेजवानीला सर्व लहान थोर कामदार, बडेबडे मुत्सद्दी, व प्रधानमंडळ वगैरे लोकांस निमंत्रण होतें. मेजवानी आटोपल्यानंतर **राणीसरकार** **वुइंडसर** येथें जावयाच्या ठरल्यावरून सर्व व्यवस्था झाली; व ३॥। वाजतां **प्रिन्स्आलबर्ट** व **राणीसरकार** परिवारमंडळीच्या अग्रभागीं असणाऱ्या रथांत बसून **वुइंडसर** येथें जावयास निघालीं. **वुइंडसर** येथें जाण्याचे पूर्वी कांहीं कालपासून आकाशांत त्या दिवशीं असणारे ढग नाहींसे व्हावयास लागले. **सूर्यनारायणाचें** तेजही वृद्धिंगत होत चाललें. ह्या सर्व गोष्टींवरून पुढील काल फारच आनंदांत जाईल व **राज्ञी व्हिक्टोरिआ** ह्यांच्या राज्यांत पंचमहाभूतांचेंही नियमन होईल असें लोकांस वाटलें. जातांना वाटेनें लागणाऱ्या खेड्या पाड्यांतील ठळक ठळक घरंदाजांनीं दिपवाळीप्रमाणें दीपोत्सव केला असल्यामुळें दुरून त्या खेड्यापाड्यांची एक

विलक्षण तऱ्हेची मजा दिसून डोळ्यांचें समाधान होत होतें. खेड्यांतील लोकांच्या झुंडीच्या झुंडी ज्या मार्गानें हे राजदंपती चालले होते त्या राजमार्गावर येऊन आनंद प्रदर्शित करीत होत्या. ईटन येथील विश्वविद्यालय व त्याचा गगनचुंबित असा कळस ह्यांवर दिवे लावले असून निशाणें फडकत होतीं. वाटेंतील रम्य शोभा अवलोकन करीत वुइंडसर जवळ येऊन ठेपण्यास दोन घटका रात्र झाली. शहरांत शिरण्याचे पूर्वी लांबून वुइंडसर येथील दीपोत्सवाची मजा पाहून राणीसरकार व इतर मंडळी फार खुष झाली; व शहरांतील राजमार्गावर राणीसरकारचा रथ आल्याबरोबर सारख्या आनंदाच्या टाळ्या व उद्गार सुरू झाले. ज्याला ज्या रीतीनें आपल्या आनंदमय अंतःकरणवृत्ती प्रकट करतां आल्या त्यांनीं त्या रीतीनें प्रकट केल्या. राणीसरकार व प्रिन्स् आलबर्ट या उभयतांनीं नागरिकांकडून झालेले मुजरे मोठ्या अदबीनें व आपल्या योग्यतेस शोभतील अशा रीतीनें परत केले. वुइंडसर येथें किन डावेजर, व्हायकाउन्ट मेलबोर्न, लार्ड जॉन रसेल, व लार्ड पामर्स्टन ह्यांनीं राणीसरकार व प्रिन्स् आलबर्ट यांस मेजवान्या दिल्या.

वुइंडसर येथें राणीसरकार व प्रिन्स् आलबर्ट हीं एकत्र होऊन एक दिवस झाला नाहीं तोंच राणीसरकारनीं आपले जिवश्च कंठश्च दोस्त बॅरन स्टाकमार यांजला "मला प्रिन्स् आलबर्ट सारखा आवडता, सद्गुणी व उदार असा पुरूष दुसरा कोणीही दिसत नाहीं" असें लिहिलें. प्रीति ही कांहीं एक अजब चीज आहे.

# महाराणी सरकारचीं अपत्यें.

आनन्दस्नुतिरात्मनो नयनयोरन्तः सुधाभ्यञ्जनम् ।
प्रस्तारः प्रणयस्य मन्मथतरोः पुष्पं प्रसादो रतेः ॥
आलानं हृदयद्विपस्य विषयारण्येषु संचारिणः ।
दंपत्योरिह लभ्यते सुकृततः संसारसारः सुतः ॥ १ ॥

इहलोकांत जन्मास आलेले प्राणी संसारसागरांत तरंगत असतात; यांतच ते नानाविध सुखदुःखांचा हरघडी अनुभव घेतात. ज्यांना दुःखापेक्षां सुख जास्त अनुभवास येतें त्यांना हा संसारसागर फारच रमणीय वाटून ते या रमणीयतेचा बराच काळपर्यंत आपणांस अनुभव असावा अशी इच्छा करितात. आतां अर्थातच ज्यांना सुखापेक्षां दुःखाचा अनुभव जास्त त्यांना हा संसारसागर विषतुल्य भासून त्यांतून लवकरच आपली सुटका व्हावी अशी इच्छा त्यांचे ठायीं साहजिकच उत्पन्न होते. जगाच्या नित्य चाललेल्या घडामोडींकडे, राहटीकडे व मनुष्यमात्राच्या नैसर्गिक प्रवृत्तीकडे जर लक्षपूर्वक व शोधक दृष्टीनें अवलोकन केलें तर-

मनुष्यमात्र वर नमुद केलेल्या पहिल्या स्थितीची इच्छा करितो. सदरहू पहिली स्थिति ह्मणजे दुःखापेक्षां सुख जास्त अनुभवास येणें ही हो आतां ही पहिली स्थिति प्राप्त होणें किंवा न होणें हें आपल्या हातीं नसून केवळ जगच्चालकाच्या इच्छेवर व इच्छेनुसार त्याचे हातून होणाऱ्या कृपेवर अवलंबून असते. **जगच्चालकाच्या** प्रसादविषादानुरूप वर निर्दिष्ट केलेल्या दोन स्थितींपैकीं पहिली अगर दुसरी स्थिती प्राप्त होते, ह्मणजे सुखस्थिति अगर दुःखस्थिति प्राप्त होते. सुखस्थितीचीं जीं अनेक साधनें आहेत त्यांपैकीं सदपत्यप्राप्ति हें एक मोठें साधन होय. **महाराणी सरकार** सार्वभौमिनी असून त्यांना जन्मापासून आजपर्यंत दुःखापेक्षां सुखच जास्ती अनुभवास आलें आहे. त्यांच्या नांवाचा सर्वत्र ठिकाणीं जयघोष चालला आहे. त्यांचें राज्य एवढें विस्तीर्ण आहे कीं त्यांच्या राज्यांत सूर्य प्रकाशमान नाहीं असें कधींही होत नाहीं. राज्याच्या एवढ्या अफाट विस्तीर्णतेबरोबर बरेच उदाहरणांत दृष्टिगोचर होणारी न्यायाची ढिलाई त्यांचे राज्यांत अणुमात्रही अस्तित्वांत नसल्यामुळें राज्यास अत्यंत भूषणास्पद अशी जी प्रजेची राजाविषयीं प्रेमबुद्धि ती आमच्या **महाराणी सरकारच्या** सर्व प्रजाजनाच्या ठायीं उत्कटतेनें वास्तव्य करीत आहे. विस्तीर्ण राज्य आणि राजनिष्ठ प्रजा या दोन गोष्टी सुखावह तर खऱ्याच; तथापि, ह्या दोन्ही गोष्टी असून ज्यांस सदपत्यलाभ नसेल त्यांची लोकयात्रा अंशतः **दशरथ** राजाप्रमाणें कष्ट-

मय झाल्याशिवाय राहणार नाहीं. सारांश, कोणत्याही राजास पूर्ण सुख प्राप्त होण्यास वरील तिन्हीही गोष्टी आवश्यक आहेत. आणि या तिन्हीही गोष्टी आमच्या **महाराणी सरकारास** विपुलतेनें प्राप्त झालेल्या आहेत. **महाराणी सरकारास** त्यांच्या अनुरूप अशीं नऊ अपत्यें झालीं. ह्या नवांपैकीं पांच कन्या व चार पुत्र झाले सदरहू नऊ अपत्यांसंबंधीं माझ्या प्रिय वाचकांस संक्षिप्त माहिती देतों ती येणें प्रमाणेः—

### प्रथमापत्य.

(कन्यारत्न) **व्हिक्टोरिआ एडिलेड मेरी लुइसा** यांचा जन्म ता० २१ **नोव्हेंबर** १८४० रोजीं दोनप्रहरीं एक वाजून चाळीस मिनिटांनीं **बॅकिंगहॅम पॅलेस**मध्यें झाला. ह्या वयानें अठरा वर्षांच्या झाल्यावर यांचा विवाह ता० २५ **जानेवारी** १८५८ रोजीं **प्रशियाचे** राजपुत्र **वुइल्यम्** यांजबरोबर झाला. ह्यांना ४ पुत्र व चार कन्या अशीं आठ अपत्यें झाल्यावर ह्यांचे पती ता० **१५ जून** १८८८ रोजीं गतप्राण झाले.

### द्वितीयापत्य.

( पुत्ररत्न ) **आलबर्ट एडवर्ड प्रिन्स आफ् वेल्स** हे ता० ९ माहे **नोव्हेंबर** १८४१ रोजीं दोनप्रहरीं ११ वाजण्याचे सुमारास **बकिंगहॅम पॅलेस** मध्यें जन्मले. इ० स० १८६३ सालीं मार्च महिन्याचे १० वे तारखेस ह्यांचा विवाह **डेनमार्क**च्या राजकुमारी **अलेक्झांड्रिआ** यांजबरोबर झाला. ह्यांना आजपर्यंत तीन कन्या व तीन पुत्र झाले; परंतु, त्यांपैकीं जेष्ठ व कनिष्ठ अशा पुत्रद्वयांच्या अकालिक मृत्यूनें यांना अपरिहार्य दुःख झालें. लहानपणीं, ह्यांचा विद्याभ्यास **एडिन्बरो** येथील हायस्कूलांत झाला; व नंतर हे **ऑक्सफोर्ड** व **केम्ब्रिज** येथील पाठशाळांत गेले. इ. स. १८७५-७६ सालीं हे आपल्या **भरतभूमींत** आले होते. **सॅन्ड्रिंगहॅम**

येथें ह्यांनीं जमीन खरेदी करून त्या ठिकाणीं एक शेत तयार केलें आहे. ह्या शेतांत **प्रिन्स् आफ वेल्स** स्वतः काम करतात. ह्यांचे जेष्ठ चिरंजीव **प्रिन्स आलबर्ट व्हिक्टर** हे इ. स. १८९० त **हिंदुस्थानदेश** पाहण्यास आले होते.

## तृतीयापत्य.

( कन्यारत्न ) **अलीस मॉड मेरी** यांचा जन्म ता० २५ एप्रील सन १८४३ मध्यें होऊन पुढें इ०स० १८६२ सालीं **जुलै** महिन्याचे पहिले तारखेस त्यांचा विवाह राजकुमार **फ्रेडरिक लुई** यांजबरोबर झाला ह्यांनीं ता० १४ डिसेंबर १८७८ रोजीं आपल्या एकुलत्या एक पुत्रास व चौघी कन्यांस मागें टाकून इहलोकांतून प्रयाण केलें.

## चतुर्थापत्य.

(पुत्ररत्न) **आलफ्रेड् अर्नेस्ट आलबर्ट ड्यूक ऑफ एडिनबरो** हे ता० ६ आगष्ट सन १८४४ सालीं **वुईंडसर कॅसल** येथें जन्मले. इ० स० १८७४ सालीं जानेवारीचे नववे तारखेस यांचा विवाह **प्रशियाच्या ग्रँड डचेस मेरी** यांजबरोबर झाला. ह्यांना एक पुत्र व चार कन्या असें अपत्यपंचक आहे. ह्यांनीं इ. स. १८६९–७० सालीं **हिंदुस्थानां**तील कांहीं शहरें पाहिलीं. ह्यांच्या विवाहामुळें **इंग्लंद** व रशिआ येथील राजघराण्याचा अतिनिकट असा आप्त संबंध जडला. तो असाः–ह्यांच्या वडील भावजईची बहिण ती **रशिआच्या झार** साहेबांची पत्नी; व ह्यांच्या कुटुंबाचा व झार साहेबांचा वहिणभावंडाचा संबंध आहे.

## पंचमापत्य.

( कन्यारत्न ) **हेलिना आगस्टा व्हिक्टोरिआ प्रिन्सेस्ख्रिश्चियन** ता० २५ मे सन १८४६ रोजीं **बकिंगहॅम पॅलेस**मध्यें जन्मल्या. ह्यांचा विवाह इ० स० १८६६ चे जुलई महिन्यांत झाल्या. ह्यांना दोन पुत्र व दोन कन्या अशीं चार अपत्यें आहेत.

## षष्ठापत्य.

(कन्यारत्न) इ० सन १८४८ त **लुईस क्यारोलाइन आलबेटा** या ता० २१ मार्च रोजीं जन्मल्या; व यांचा विवाह **मार्किस आफ् लार्न** यांजबरोबर ता० २१ **मार्च** इ० स० १८७१ रोजीं झाला.

## सप्तमापत्य,

(पुत्ररत्न) **आर्थर वुइल्यम् पॅट्रिक आलबर्ट ड्यूक ऑफ कर्य-नाट** हे इ० स० १८५०'चे मे महिन्यांत १ ले तारखेस जन्मले. इ० स० १८७९ तील मार्च महिन्याचे १३ वे तारखेस यांचा विवाह **प्रशियाच्या** राजकुमारी **लुईसा मारगारेट** ह्यांजबरोबर झाला. यांस एक पुत्र व दोन कन्या अशीं तीन अपत्यें आहेत. त्यांचा बाणा शिपाइगिरीचा आहे. हे कांहीं दिवस हिंदुस्थानांत येऊन राहिले होते. येथें असतांना **मुंबई** इलाख्यांतील सैन्याचे हे कांहीं कालपर्यंत मुख्य अधिकारी (**कमान्डर-इन-चीफ**) होते.

## अष्टमापत्य.

(पुत्ररत्न) **लिओपोल्ड जॉर्ज डंकन आलबर्ट ड्यूक ऑफ आ-लबनी** यांचा जन्म इ० सन १८५३ सालीं एप्रील महिन्याचे ७ वे तारखेस झाला. **वाल्डकच्या प्रिन्सेस हेलिना** ह्या त्यांच्या पत्नी होत. हे इ० सन १८८४ सालीं मार्च महिन्याचे २९ वे तारखेस आपल्या मातोश्रींना व प्रियपत्नीला दुःखसागरांत ढकलून परलोकवासी झाले. यांची एक कन्या व एक पुत्र अशीं दोन अपत्यें आहेत.

## नवमापत्य.

(कन्यारत्न) **बिट्रिस मेरी व्हिक्टोरिआ फिओडोर** ह्या ता० १४ एप्रील इ०स० १८५७रोजीं जन्मल्या; व यांचा विवाह इ० सन १८८५ च्या जुलै महिन्यांत झाला. यांना तीन पुत्र व एक कन्या अशीं चार अपत्यें आहेत.

# महाराणी सरकारच्या जीवितावर आलेले घाले.

अनुकूलो विधिर्यस्य वर्तते भुवि सर्वतः ।

न तस्य नाशने शक्तो भवेन्मृत्युरपि स्वयम् ॥ १ ॥

इहलोकांत चांगुलपणा अगर वाईटपणा ह्या दोहोंपैकीं कोणत्याही एका गुणाची जेव्हां परमावधि होते तेव्हांच मनुष्य चांगल्या अगर वाईट रीतीनें पुढें येतो. विद्वान, तत्त्ववेत्ते, ज्ञाते व मुत्सद्दी अशीं, व अशासारखीं थोर माणसें त्यांच्या अंगीं असणाऱ्या चांगुलपणानें प्रसिद्धीस येतात. चोर, दुष्ट, नीच, राजद्रोही अशीं व अशासारखीं नीच माणसें आपल्या दुष्ट व नीच कृत्यांनीं प्रसिद्धीस येतात. पहिल्या वर्गांत प्रसिद्धीस येणें हें दुसऱ्या वर्गांतल्या प्रसिद्धीस येण्यापेक्षां चांगलें आहे हें कोणीही कबूल करील. या शेवटच्या ह्मणजे दुसऱ्या वर्गांत जे प्रसिद्धीस आले आहेत त्यांत **एडवर्ड आक्सफोर्ड, फ्रॅन्सिस,** व **बीन** प्रभृति मंडळीस गोंविलें पाहिजे. हीं नीच माणसें कशी प्रसिद्धीस आलीं हें वाचकांस निवेदन करण्यास एक वाक्यापेक्षां जास्त जागा व्यापण्याची जरूर नाहीं. या नीच माणसांनीं जर

असलीं राक्षसी कृत्यें करण्याचें मनांत आणून तदनुसार कृति केली नसती तर सद्गुणसंपन्न व दयाळू अशा **महाराज्ञी व्हिक्टोरिआ** यांच्या शुद्ध व निर्मळ चरित्रलेखांत यांच्या दुष्ट कृत्यांच्या वर्णनांनीं लेखणी विटाळवावी लागली नसती.

इ० स० १८४० सालच्या जून महिन्याचे १० वे तारखेस सायंकाळचे सहावाजण्याचे सुमारास **राणीसरकार** आपल्या भर्त्यासह रथांत बसून फिरावयास निघाल्या. रथाला चार घोडे जुंपलेले असून बरोबर अश्वशाळेचे अधिकारी व स्वारही होते. रथ "**कॉन्स्टिटयूशन हिल**" नामक टेंकडीवर गेला तों **एडवर्ड आक्सफोर्ड** नांवाच्या एका तरुणानें बंदुकीचा नेम धरून **राणीसरकारा**वर बार सोडिला. बार सुटतां क्षणींच अर्थातच आवाज निघाला. आवाज **प्रिन्स् आलबर्ट** यांचे कर्णरंध्रांत येऊन आदळल्या बरोबर त्यांनीं ज्या दिशेनें आवाज निघाला असें वाटलें त्या दिशेकडे पाहिलें. ते तिकडे पाहतात तों **राणीसरकार** उठूं लागल्या. परंतु **प्रिन्स् आलबर्ट** यांचे अंगीं प्रसंगावधान मूर्तिमंत असल्यामुळें त्यांनीं **राणीसरकारास** खालीं बसविलें. **प्रिन्स् आलबर्ट** यांनीं **राणीसरकारास** त्यावेळीं वर उठूं दिलें नाहीं ह्मणूनच त्या नीच व राक्षसी कृत्य करणाऱ्या **एडवर्ड आक्सफर्ड**च्या बाराच्या तडाक्यांतून त्या निभावल्या. एक बार फुकट गेला असें पाहून **एडवर्ड आक्सफोर्डनें** इकडे तिकडे पाहून पुनः दुसरा बार सोडिला; परंतु, हा दुसरा बारही संपूर्ण **आंग्लभौमस्थां**च्या व **राणी**-

**सरकार**च्या इतर ठिकाणीं असणाऱ्य सर्व प्रजेच्या सुदैवानें त्यांच्या परमपूज्य अशा राज्ञीला अगर राज्ञीच्या परमप्रिय अशा भर्त्याला अगर बरोबरच्या इतर कोणालाही यत्किंचित इजा न होतां फुकट गेला. दुसरा आवाज ऐकूं येतांक्षणींच जिकडून तिकडून लोक धांवून आले; व त्यांनीं हुषार व चपल अशा पोलीस अधिकाऱ्यांच्या साहाय्यानें **एडवर्ड** ह्यास पकडिलें.

पुढें, ता० ८ जुलई रोजीं "**सेन्ट्रल क्रिमिनल कोर्ट**" नामक न्यायकचेरींत **एडवर्ड** याची चवकशी होऊन त्यास कारागृहवासाची शिक्षा झाली. त्यास कांहीं दिवस **बेडाम** येथें व नंतर **डार्टमूर** येथें बंदीखान्यांत ठेविलें.

आपल्या राजनिष्ठ प्रजेस आपण सुरक्षित आहों असें कळविणें **राणीसरकारास** इष्ट वाटल्यावरून ज्या दिवशीं **आक्सफर्डनें** हें राक्षसीकृत्य केलें त्या दिवशीं फिरून परत येतांना **राणीसरकार** आपल्या रथांत एकसारख्या उभ्या होत्या.

* * *

ता० ३० मे १८४२ रोजीं सायंकाळचे सहा वाजण्याचे सुमारास **राणीसरकार** आपल्या परिवाराच्या मंडळीसह फिरून परत येत असतांना त्यांचा रथ "**कान्स्टिटयूशन हिल्**" नामक टेंकडीवरून खालीं उतरत होता तेव्हां **फ्रॅन्सिस** नांवाच्या एका मनुष्यानें **राणीसरकारावर** बार सोडिला. **राणीसरकारावर** साक्षात् परमेश्वरछत्र असल्यामुळें हा बार **राणीसरकार** अगर इतर कोणासही

न लागतां फुकट गेला. दोन वर्षीपूर्वी **एडवर्ड आक्सफोर्ड** नांवाच्या मनुष्यानें **राणीसरकारावर** बार सोडिल्यामुळें त्यास यथासांग प्रायश्चित्त मिळाल्याचें वाचकांनीं मागें वाचलेंच आहे. विशेष गोष्ट ही कीं, ज्या जागेवरून **एडवर्ड आक्सफोर्डनें** बार सोडला होता त्या जागेपासून पांच सात पावलांचे अंतरावरून मशारनिल्हे **फ्रॅन्सिसनें** बार सोडला. बार सुटतां क्षणींच पोलिसांनीं **फ्रॅन्सिसला** फार चपलतेनें पकडलें. **फ्रॅन्सिसचें** वय यावेळीं २२ वर्षाचें होतें. ता० १७ जून १८४२ रोजीं **फ्रॅन्सिस** याची न्यायाधीशापुढें चौकशी होऊन त्यास फांशी देण्याचा हुकूम झाला. हुकूम ऐकतांक्षणींच **फॅन्सिस** बेशुद्ध पडल्यामुळें न्यायकचेरींतील नोकरांनीं त्यास बाहेर नेलें.

**फ्रॅन्सिसला** न्यायाधीशांनीं फांशीची शिक्षा दिली असें ऐकून **राणीसरकारास** जरी **फ्रॅन्सिसला** दिलेली शिक्षा कमी करा असें ह्मणणें ह्मणजे असे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांस गुन्हा करण्याविषयीं उत्तेजन देण्यासारखें आहे असें वाटत होतें तरीं त्यांनीं आपल्या स्वभावसिद्ध दयाळूपणानुसार **फ्रॅन्सिसला** झालेली शिक्षा कांहीं तरी कमी व्हावी अशी इच्छा दर्शविली; व ह्मणून, **फ्रॅन्सिसला** फांशी देण्याचा जो हुकूम झाला होता तो रद्द होऊन ता० २ जुलै सन १८४२ रोजीं त्यास काळेपाण्याची सजा देण्यांत आली.

* * *

ता० ३ जुलै १८४२ रोजीं सायंकाळीं **राणीसरकार** आ-

पत्न्या प्रियपति व पूज्य अशा मामासहवर्तमान "**चॅपेल रॉयल सेन्ट जेम्स**" मध्यें जावयास निघाल्या. वाटेनें रथ भरधांव चालत असतां **जॉन वुइल्यम्‌बीन** नांवाच्या मनुष्यानें **राणीसरकारावर** बार सोडिला. परंतु तारत्यापुढें मारत्याचें कांहीं चालत नाहीं ह्या जगप्रसिद्ध ह्मणीप्रमाणे **राणीसरकारावर** सदोदित फिरत असलेल्या ईश्वरीकृपेच्या चक्रामुळें **बीन**चा इच्छित हेतु साध्य न होतां उलटा न्यायदेवतेचे नियोगानुसार त्यास १८ महिने कारागृहवास काढावा लागला. **बीन** हा एका रसायन द्रव्यें विकणाऱ्या दुकानदाराचा नोकर असून एका सुवर्णकाराच्या कलेंत निपुण अशा मनुष्याच्या तोंडाला काळोखी लावणारा कुपुत्र होता.

ह्याशिवाय, दयाळू **राणीसरकारच्या** अस्तित्वावर आणखीही घाले आले होते; परंतु जगदीशाच्या कृपेनें त्या सर्वांतून **राणीसरकार** पार पडून आजमितीला खरोखर सुखावह अशा स्थितींत त्या आपली इहलोकची यात्रा करीत आहेत हें लिहिण्यास आह्मांस फार संतोष व आनंद वाटतो.



# महाराणीसरकार व प्रिन्स्‌आलबर्ट यांच्या नित्यक्रमाचें दिग्दर्शन.

येन येन प्रकारेण प्रियस्तुष्टिमियात्सदा ॥
तं तं व्ययासितुं सम्यग् राज्ञी प्रयतते तदा ॥ १ ॥

मनुष्यमात्राच्या प्रकृतीचा सर्वसाधारणरीत्या विचार केला तर असें निर्विवाद ठरवितां येतें कीं, आपल्या प्रियवस्तूच्या समागमें करून हरएक मनुष्यमात्रास सुख प्राप्त होतें. एकाला दुसऱ्याचा प्यारा बनण्यास अमुकच एक नियमित गुण त्याचे अंगीं असले पाहिजेत असें जरी निश्चयात्मक विधान कधींच करितां येणार नाहीं तरी एकंदरीनें असें ह्मणतां येईल कीं एकाला दुसऱ्याचा प्यारा बनण्याला त्या उभयतांतील शीलव्यसनादिकांची समता आवश्यक आहे. ही समता ज्या ज्या दोनव्यक्तींचे ठायीं आपणास आढळते त्या त्या दोन व्यक्तींमध्यें प्रेमभाव असतो. **राणीसरकार** व **प्रिन्स् आलबर्ट** ह्यांच्यासंबंधानें विचार केला तर ह्या दंपत्यांत शीलव्यसनादिकांची समता होती हें स्पष्ट सांगण्यास नको. कारण, जर तशी स्थिति नसती तर **राणीसरकारनीं** आपणच होऊन **प्रिन्स् आलबर्ट** याशीं

विवाह केला नसता. अशा तऱ्हेची समता या उभयतांमध्यें होती ह्मणूनच या उभयतांमध्यें एकमेकांसंबंधीं पूर्ण प्रेम वात्सल्य करीत होतें; व त्यांस एकमेकांच्या सहवासानें सुख होत असे. ह्या राजदंपत्याच्या दीनचर्येचें थोडक्यांत दिग्दर्शन करितों तें येणेंप्रमाणें:-

हीं उभयतां दररोज प्रातःकाळीं नऊ वाजतां प्रातर्भोजन करून तशींच फिरावयास निघत. **लंडन** शहरांत ज्यावेळीं मुक्काम असे त्या वेळीं ह्यांची फिरावयास जाण्याची जागा मुख्यत्वेंकरून ह्मटली ह्मणजे **"बकिंगहॅम प्यॅलेस गार्डन"** नामक उद्यान ही होती. सदरहू उद्यानांत **प्रिन्स् आलबर्ट** यांनीं हजारों जलचर पक्षी इत्यादिकांचा संग्रह करून ठेविला होता. ह्या बागेंत ते ज्यावेळीं फिरावयास जात त्यावेळीं पक्ष्यांस आपल्या हातानें दाणा घालण्याची त्यांना मोठी हौस वाटे; व, ती आपली हौस फेडण्यास ते कधींही चुकत नसत. उद्यानांतील पक्ष्यांचे मधुर व कोमल असे सुस्वर ऐकून त्यांचें मन शांत होई. पक्षीही आपल्या धन्याच्या तोंडची ठरींव खूण ओळखण्यांत व ती ओळख्यानंतर आपले धनी जवळ आले-असतां त्यांशीं लाडीगोडी करण्यांत तरबेज झाले होते. फिरून परत आल्यानंतर लागलेंच दररोजचें जडभारी काम करण्यास सुरवात होत असे. दोनप्रहरीं दोन वाजण्याचे सुमारास उपहार वगैरे झाल्यावर राज्यकारणीं बाबतींत सभानायकाचा सल्ला घेऊन [illegible]काळचे पांच सहा वाजण्याचे सुमारास **राणीसरकार** आपल्या प्रियपतीसह रथांत विराजमान होऊन सायंकाळची शीतल व

सुखकारक अशी हवा घेण्यास बाहेर पडत. एखादे दिवशीं राणीसरकार आपल्या प्रियमातोश्रीसह फिरावयास जात. ह्या दिवशीं प्रिन्स् आलबर्ट घोड्यावरची रपेट करीत असत. रात्रीचें भोजन रात्रौ आठ वाजतां होई. बहुतेक दररोज सायंकाळीं प्रिन्स् आलबर्ट आपल्या आवडीचा बुद्धिबळांचा खेळ खेळत. बुद्धिबळांचा खेळ खेळण्यांत हे पटु होते. ज्या वेळीं हे एकटेच घोड्यावरून फिरावयास जात असत त्या वेळीं त्यांचा फिरून परत आल्यावरचा नित्यक्रम ह्मटला ह्मणजे आपली प्रियपत्नी ज्या दिवाणखान्यांत निजली असेल त्या दिवाणखान्यांत जाऊन हंसत हंसत व प्रेमानें वाटेनें पाहिलेल्या व आढळलेल्या गोष्टींचें तिला निवेदन करणें हा होता. आंग्लभौमांच्या सर्वसाधारण वहिवाटीनुसार जेवण आटोपल्यानंतर कांहीं वेळ पर्यंत मद्यपानांत निमग्न असण्याचा प्रकार प्रिन्स् आलबर्ट ह्यांस आवडत नसे. राणीसरकारासही हा प्रकार आवडत नाहीं. एखादे वेळीं प्रिन्स् आलबर्ट तपकिरीच्या चिमटीचा उपयोग करीत असत.

# महाराणीसरकारचें प्रथमतः स्कॉटलन्ड देशीं गमन.

स्वं स्वं नियोगमास्थाय वर्तन्ते राजपूरुषाः ॥
न वेति तान्परिज्ञातुं प्रवासं स्वीचकार सा ॥ १ ॥

ता० २९ आगष्ट सन १८४२ रोजीं **राणीसरकार** व त्यांचे प्रियपति **प्रिन्स्आलबर्ट** हीं उभयतां आपल्या लवाजम्यासह **वुलउईच** येथें **लॉर्ड एडालपस् फीडझ क्लेरन्स** हे ज्या जहाजावरील मुख्य होते त्या "**रॉयल जार्ज**" नामक जहाजांत बसून **स्कॉटलन्डास** जावयास निघाल्या. ता० १ सपटंबर १८४२ रोजीं **राणीसरकार** "**ग्रान्टनपायर**" येथें येऊन "**डालकेथ प्यॅलेस**" कडे गेल्या. **एडिनबर्ग** येथील पौरजनांनीं आपल्या पूज्य अशा राज्ञीच्या आगमनाप्रीत्यर्थ रात्रौ दीपोत्सव केला. प्रवासाच्या उत्तर भागांत **राणीसरकारला** समुद्र लागल्यामुळें त्यांची प्रकृति बरी नव्हती. परंतु ता० २ रोजीं त्यांची प्रकृति पूर्ववत् बरी झाली. **एडिनबर्ग** येथें आल्यावर तेथील नागरिक व अधिकारी मंडळाच्या इच्छेनुसार ता० ३ रोजीं **राणीसरकारच्या**

आदरातिथ्यादाखल ह्मणून अपूर्व असा एक समारंभ करण्यांत आला. समारंभ गोरगरिबांस पहावयास मिळावा ह्मणून कित्येक धनिकांनीं अतोनात खर्च करून त्याजकरितां बसावयास जागा तयार केल्या होत्या. समारंभ पहावयास आतूर झालेल्या लोकांचा जमाव एवढा मोठा होता कीं त्यांस बसावयास केलेलीं लांकडी आसनें भंग होण्यापर्यंत सुद्धां पाळी आली. ता० ४ रोजीं **राणी-सरकार "डालकेथ प्यॅलेस"** मधील देवालयांत ईश्वरोपासनेस गेल्या. ता० ५ रोजीं **राणीसरकारनीं** शिष्ट व कुलीन लोकांचा दरबार भरविला. **एडिनबर्ग, ग्लासगो, सेन्ट अन्ड्र्यूज** आणि **अबर्डीन** येथील युनिव्हर्सिट्यांनीं **राणीसरकारास** मानपत्रें दिलीं व **डॉक्टर ली** ( **एडिनबर्ग** येथील युनिव्हर्सिटीचे मुख्य-अधिकारी ) यांनीं **प्रिन्स आलबर्ट** यांस **एल. एल. डी.** ची पदवी दिली. ता० १५ रोजीं **राणीसरकार स्काटलन्डाहून** परत यावयास निघाल्या.

**स्काटलंडांतील** सर्व स्थितींच्या व सर्व जातींच्या प्रजेनें **राणी-सरकारचा** अकृत्रिम असा केलेला सत्कार त्यांचे मनावर दृढपणें मुद्रित होऊन त्यांजला संतोष झाला. **राणीसरकारला** झालेला संतोष प्रजेला विदित व्हावा ह्मणून त्यांनीं **अबर्डीनचे अर्ल** यांस खालील अर्थाचें पत्र लिहावयास सांगितलें.

" या वेळीं **राणीसरकारला** येथें आणखी कांहीं दिवस राहतां येत नाहीं याजबद्दल त्यांना आपल्या राजनिष्ठ अशा **स्काटलन्डस्थ** प्रजेला

सोडून जातांना फार दुःख वाटत आहे. **राणीसरकार**ची आपली **स्काट-लन्डस्थ** प्रजा राजनिष्ठ व प्रेमळ असावी अशी येथें येण्यापूर्वीपासूनच अटकळ होती; व ती त्यांची अटकळ यथार्थ ठरली. देशाच्या प्रत्येक भागांतील प्रत्येक स्थितीच्या लोकांत आढळून आलेली राजनिष्ठा **राणीसरकार**चे मनांतून कधींही नाहींशी होणार नाहीं.

ता० १९ रोजीं **राणीसरकार** परत यावयास निघाल्या त्या ता० १७ रोजीं प्रातःकाळीं १० वाजतां **वुलउईच** येथें परत आल्या. **प्रिन्स्‌आलबर्ट** यांसही ही सफर मौजेची वाटली व ह्मणून त्यांनीं तेथून परत आल्यावर ता० १८ रोजीं **सॅक्सगोथा** येथील **डचेस** यांस ज्यांत **स्काटलंन्ड** देशासंबंधें त्यांचे विचार त्यांनीं गोंविले आहेत असें पत्र पाठविलें. त्या पत्राचा सारांश येणेंप्रमाणें:—

**स्काटलन्ड** देश पाहून आह्मां उभयतांस फार आनंद झाला. **स्काट-लन्ड** देश एक विशेष अशा तऱ्हेचा सुंदर असून आमच्या येथल्यापेक्षां हवा पाण्यासंबंधेंही सरस आहे. शहरापासून लांब अशा डोंगराळ खेड्यापाड्यांत राहणाऱ्या लोकांत शहरांत राहणारे लोकांपेक्षां प्रामाणिकपणा व प्रेमभाव जास्त दृष्टीस पडतो. या नियमानुसार तद्देशीय लोक प्रामाणिक व प्रेमळ असून ह्या प्रामाणिक व प्रेमळपणांत काडीमात्र कृत्रिम भाव नाहीं. मला तरी असें वाटतें कीं ज्या देशांत असंख्य ऐतिहासिक कथा भक्तिपुरस्सर पिढ्यानपिढ्या रक्षण केल्या आहेत असा ह्याच्याशीं तुलना करण्यास हाच एक देश आहे. प्रत्येक स्थळासंबंधें विचार केला असतां कांहींना कांहीं तरी ऐतिहासिक गोष्टींचा ह्याच्याशीं संबंध आढळतो; व अशातऱ्हेचा संबंध आढळण्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे **सर वॉल्टर स्कॉट** यांचीं यथार्थ व सूक्ष्म अशीं वर्णनें होत.

# महाराणीसरकारचा पुतळा.

सर्व प्रजा प्रेम बुद्धया राज्ञ्याश्चक्रे प्रतिकृतिम् ॥
दृष्टया द्रष्टुं सदा मूर्तिमीश्वरस्येव भक्तिमान् ॥ १ ॥

कोणताही मनुष्य मग तो राव असो किं रंक असो जगांत प्रिय झाला ह्मणजे ज्या जगाला तो प्रिय होतो त्या जगाला त्याचे प्रत्यक्ष सान्निध्याची जरूरी आवश्यक वाटते; व ह्मणून लोक त्यांचें तसें सान्निध्य संपादण्याविषयीं होईल तितका यत्न करितात. अशा तऱ्हेच्या प्रत्यक्ष सान्निध्याविषयीं केलेला यत्न अशक्य व दुरापास्त वाटला तर त्याचे उलट तऱ्हेचें ह्मणजे अप्रत्यक्ष सान्निध्य संपादण्याविषयीं लोक यत्न करितात. अप्रत्यक्ष सान्निध्य संपादण्याचे जे मार्ग आहेत त्या मार्गांपैकीं प्रियवस्तूचा पुतळा तयार करून किंवा करवून त्याचें मनःपूर्वक रक्षण करून मनाला समाधान मानून घेणें हा एक आहे. आतां ज्या व्यक्तीचे सांन्निध्या विषयींची इच्छा इतर व्यक्तींचे ठायीं प्रादुर्भाव पावते त्या व्यक्तीचे ठायीं ज्यांना सांन्निध्य पाहिजे आहे अशा व्यक्तिंना आवडणारा कांहीं तरी विशेष तऱ्हेचा अलौकिक गुण अगर गुणसमुच्चय असणें अवश्य

आहे. **राणीसरकार**चे अंगीं अलौकिक गुण आहेत हें आतां उघडपणें सांगावयास पाहिजे असें नाहीं. कारण, जर तसे गुण त्यांच्या अंगीं नसते तर त्यांच्या प्रजेच्या मनांत त्यांचें नेहमींचें प्रत्यक्ष सान्निध्य मिळणें अशक्य, सबब उरलेलें अप्रत्यक्ष सान्निध्य संपादण्याची इच्छा उत्पन्न होऊन तदनुसार पुतळा उभा करण्याची कृति तिचेकडूनघडली नसती.

दयाळू **राणीसरकार**चा त्यांच्या राष्ट्रांत प्रथम असा जो पुतळा उभा करण्यांत आला तो ता० २४ जानेवारी १८४४ रोजीं **एडिनबरो** येथें उभारलेला पुतळा होय. हा अतिभव्य पुतळा **सरजॉन स्टील** नांवाच्या एका सुप्रसिद्ध कारागिरानें तयार केला. पुतळा उंचावर उभा केला असल्यामुळें जरी तो एकंदरीनें मोठा आहे तरी तो ज्या "**रायल इन्स्टिटयूशन**" नामक भव्य इमारतीवर उभा केला आहे त्या भव्य इमारतीस एक तऱ्हेची शोभा देत आहे. पुतळे तयार करण्याच्या कलेचें **ग्रीस** देश माहेरघर असल्यामुळें ती कला त्या देशामध्यें पूर्णावस्थेंत आहे हें सर्वविश्रुत आहेच. ह्याच नमुन्यावर सदर पुतळा **सर जॉन स्टील** यानें केलेला आहे. पुतळ्यांत, **राणीसरकार** एका सिंहासनावर मस्तकीं मुकुट धारण करून स्थित झालेल्या दाखविलेल्या आहेत. उजव्या हातांत राजवेत्र असून डावा हात राज्याच्या अफाट प्रस्ततेचें लाक्षणिक चिन्ह ह्मणून एका वर्तुलाकार चक्रावर ठेविलेला आहे.

# महाराणी सरकारचे श्वशूर परलोकवासी झाले

जातस्य हि ध्रुवं मृत्युर्विधिना यदि निश्चितः ।
गुरूणांच तथापीह मृत्युः शोकप्रदायकः ॥ १ ॥

**काल** आजा गेला. आज वडील गेले. उद्यां तिसराच कोणी जाणार. सारांश, मृत्यूचे तडाक्यांतून कोणाही व कोणच्याही स्थितींतील मनुष्याला सुटतां येत नाहीं. जो जो ह्मणून ह्या भूतलावर जन्मास आला तो तो कधींना कधींतरी ह्या मिथ्या क्षणभंगूर भूल घालणाऱ्या जगांतील व्यापारांस सोडून जाणारच. या सर्वव्यापी सिद्धांताच्या यथार्थतेबद्दल जरी आमची पदोपदीं खात्री झाली आहे व होतही आहे व यापुढेंही होणारच व जरी देहाला सोडून गेलेला आत्मा आमच्या कोणाच्या व कोणच्याही कृतीनें व किती्ही अव्याहत व अविश्रांत श्रमांनीं अगर प्रयत्नांनीं परत येऊन देहाला मिळून देहाचे चलनवलनादि व्यापार पूर्ववत् चालू ठेवणें हें कालत्रयीं अशक्य आहे अशी आमची पक्की खात्री आहे तरी आपण मृताबद्दल निष्फळ असा शोक करितों.

अशिक्षित मनुष्यांनीं मृतमनुष्याबद्दल केलेला शोक बहुतेक उदाहरणांत इतरांना सहज कळतो. परंतु विद्याविभूषित व विचारी मनुष्यांनीं केलेला हा शोक एकाएकीं दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. सारांश मृतमनुष्याबद्दल शोक करणें हा मृताच्या प्रियमनुष्यांचे अंगचा एक नैसर्गिक धर्मच बनला आहे. ह्या धर्माप्रमाणें ता० २९ जानेवारी सन १८४४ रोजीं **प्रिन्स् आलबर्ट** यांचे वडील मृत झाले ही बातमी **प्रिन्स्आलबर्ट** यांस कळतांच त्यांचा कंठ दाटून आला. तसेंच त्यांच्या प्रियपत्नी ह्मणजे आपल्या दयाळू **राणीसरकार** यांस श्वशूराची शोचनीय वार्ता ऐकून दुःख झालें. पतीचें सुख तेंच आपलें सुख व पतीचें दुःख तेंच आपलें दुःख असें नित्य व दृढ अशा रीतीनें सुविचारी, शुभाचारी व सुशील अशा पत्नीचे मनांत वागत असतें. याच न्यायाचें अवलंबन **राणीसरकारनीं** केल्यामुळें त्यांनीं आपल्या पतीच्या दुःखाचा वांटा उचलला. **प्रिन्स् आलबर्ट** यांची आपल्या वडिलांचा कधींना कधींतरी आकस्मिक रीतीनें लवकरच शेवट होणार अशी पूर्वींपासूनच कल्पना होती; व ह्मणूनच त्यांचें मन ही दुःखजनक वार्ता ऐकण्यास कांहींसें तयार झालें होतें. कांहीं झालें तरी व मन कितीही तयार असलें तरी ज्यांचे अंगीं पितृप्रेम कडकडीत जागृत आहे त्यांचे अंतःकरणांत पित्याची निधनवार्ता ऐकून दुःखाचे उमाळे येऊं लागणार नाहींत काय? पित्याचा आकस्मिक रीतीनें शेवट होईल ही कल्पना **प्रिन्स् आलबर्ट** यांचे मनांत घोळण्याचें कारण त्यासंबंधानें

त्यांच्या वैद्यानें केलेलें भाकीत होय. या व अशा सारख्या प्रसंगीं मनुष्यांचे मनाची शांति नाहींशी होते. व ती मनाची बदललेली स्थिति पूर्ववत् होण्यास जीं कांहीं साधनें उपलब्ध असावीं लागतात त्यांपैकीं **राणीसरकार**सारख्या सुशील, शुभाचारी, व सुविचारी पत्नीचा सहवास व **बॅरन स्टाकमार**प्रमाणें ज्याचें मन निष्कलंक आहे अशा मित्राचा समागम हीं दोन्हीही **प्रिन्स् आलबर्ट** यांस उपलब्ध असल्या कारणानें त्यांच्या मनाच्या स्थितींत झालेल्या फेरफारामुळें नाहींशी झालेली शांतता हळु हळु लवकरच आली; ही एक दुःखांत सुख मानण्याजोगी गोष्ट आहे. पुढें कांहीं दिवसांनीं **प्रिन्स्आलबर्ट** हे आपल्या प्रियबंधूला भेटण्यासाठीं **गोथा** येथें गेले. **प्रिन्स् आलबर्ट** व **राणीसरकार** या उभयतांपैकीं प्रत्येकाला कांहीं दिवस तरी एकमेकांना सोडून दूर राहण्याचा लग्न झाल्यापासून हा पहिलाच प्रसंग होता. यास्तव; अनुक्रमें तीर्थरूप व श्वशूर परलोकवासी झाल्यानें झालेल्या दुःखांत या वियोगदुःखाची भर पडली.

# जंगी प्रदर्शन.

देशे देशे सन्ति भावा अनेके ।
एकस्मिंस्तानीक्षितुं कोपि शक्तः ॥
नो लोकेस्मिन्मन्यमानेति चित्ते ।
चक्रे राज्ञी सर्ववस्तूत्करं प्राक् ॥ १ ॥

कोणत्याही देशाचा उत्कर्ष होण्यास त्याची सांपत्तिक स्थिती सुधारणें फार जरूरीचें आहे; आणि, देशाची सांपत्तिक स्थिती सुधारण्यास त्यांतील व्यापाराची वृद्धि झाली पाहिजे. व्यापाराच्या वृद्धीस ठिकठिकाणीं उत्पन्न होणारे व लागणारे पदार्थ आणि ठिकठिकाणच्या कलाविज्ञानादि गोष्टी ह्यांची माहिती होणें हें अत्यंत अगत्याचें आहे. ही माहिती होण्यास निरनिराळ्या स्थलीं उत्पन्न होणारे पदार्थ आणि उदयास आलेलें कलाविज्ञान यांचा विवक्षित समयीं समुच्चय होऊन त्याचें प्रदर्शन होणें ह्या सारखें केव्हांही व विशेषतः हल्लींच्या सारख्या सुधारणेच्या काळांत दुसरें साधन नाहीं. सारांश, अशीं प्रदर्शनें होणें हें देशहिताच्या व राष्ट्रीय उत्कर्षाच्या

दृष्टीनें अत्यंत इष्ट व आवश्यक होय. अशाप्रकारचें अत्यंत उपयुक्त असें जंगी प्रदर्शन इंग्लंडमध्यें सन १८५१ सालीं झालें. प्रिन्स् आलबर्ट यांनीं परिश्रम करून हें जंगी प्रदर्शन भरविलें ही एक स्तुत्य व राष्ट्रीय उपयुक्ततेची गोष्ट केली असें कोणीही ह्मणेलच ह्मणेल. प्रस्तुत प्रदर्शनाची कल्पना प्रिन्स् आलबर्ट यांच्या मनांत इ. स. १८४८ पासूनच खेळत होती; व त्याप्रमाणें त्यांनीं निरनिराळ्या मुलखांत तयार होणाऱ्या वस्तूंचें वार्षिक प्रदर्शन चिरकाल चालेल अशाबद्दल कांहीं तरी व्यवस्था सरकारांतून व्हावी अशी सरकारांत सूचना केली. ती सूचना राष्ट्राच्या दुर्दैवानें अमान्य झाली. प्रिन्स् आलबर्ट हे स्वभावतः दृढ निश्चयी असल्यामुळें त्यांनीं आपला स्तुत्य उद्योग न सोडतां ज्या गोष्टींत सरकार शिवाय अडेलच अशा ह्मणजे पोलीस, परराष्ट्रांशीं पत्रव्यवहार वगैरे गोष्टी खेरीज करून सरकारची यत्किंचितही मदत घेतल्याशिवाय आपला हेतु तडीस नेला. हा हेतु तडीस नेण्याचे कामीं सर रॉबर्ट पील ह्यांचें प्रिन्स् आलबर्ट यांस पुरें साह्य होतें; परंतु, कोणत्याही गोष्टीला एकदाकां अडथळे येऊं लागले कीं ते अडथळे ती गोष्ट करणाराची वेळोवेळीं पिच्छा पुरवून त्याच्या उद्योगासक्तीची कसोटी पाहतात. या नियमानुसार पील ह्यांस प्रदर्शनाचें काम पुरें होण्यापूर्वीच अकालिक मृत्यूनें गांठलें. कांहींही झालें तरी प्रिन्स् आलबर्ट यांणीं आपला दृढनिश्चय न सोडतां प्रदर्शनाचें काम पुरें केलें. प्रदर्शन "हाईड

पार्क" नामक स्थळाचे दक्षिण भागीं **महाराणीसरकारनीं** त्या कामाकरितां दिलेल्या जागेंत ता. १ मे १८९१ रोजीं **महाराणी सरकार**चे हस्तें उघडण्यांत आलें. आदित्यवार खेरीज करून इतर सर्व वारीं प्रदर्शन खुलें असे. प्रदर्शन पाहण्यास प्रेक्षकांची संख्या किती होती ह्याची बरोबर कल्पना करण्याचें काम कठीण होतें; कारण, खुद्द **महाराणीसरकार**नींही "माझ्या पाहण्यांत यासारखा जनसमूह कधींही आला नव्हता. फारतर काय, प्रत्यक्ष राज्याभिषेक समयीं देखील एवढा समाज एकवटला नव्हता "असे उद्गार काढले.

**लॉर्ड ग्रेनव्हील** हे ह्या प्रदर्शनाचे चिटणीस असून **प्रिन्स् ऑलबर्ट** हे अध्यक्ष होते. ता० १९ अक्टोबर रोजीं सर्व काम पुरें होऊन शेवटीं जमलेल्या मंडळींनीं ईश्वरोपासना करून **महाराज्ञीचें** अभिष्टचिंतन केलें; व तसेंच तिला उदंड आयुष्य असावें अशा विषयीं **जगन्नियंत्या**पाशीं मागणें केलें.

प्रदर्शन पाहूं इच्छिणाऱ्या लोकांस माफक पैसे घेऊन तिकिटें दिलीं होतीं. इंग्रजी भाषेंत, या प्रदर्शनासंबंधीं, एका लेखनपटूनें एक वडा ग्रंथ तयार केला आहे, त्यावरून पाहतां या प्रदर्शनांत खर्च वजा जातां २१४९८० पौंड संस्थेस शिल्लक राहिली.

मनुष्यानें आपल्या हरएक स्तुत्य उद्योगांत जरी नाना प्रकारचे अडथळे आले तरी आपला दृढ निश्चय सोडूं नये व दृढ

निश्चय सोडला नाहीं कीं त्यांत यश यावयाचेंच हा बोध या उदाहरणापासून घेण्यासारखा आहे.

ज्या गृहस्थानें सदर प्रदर्शनाचे सुंदर स्थळाची रचना दाखवून दिली त्याचें नांव **सरजोसेफ प्यॅक्सटन** असें होतें.

ह्या प्रमाणेंच आणखी निरनिराळ्या रूपांचीं कांहीं प्रदर्शनें **महाराज्ञीच्या** कारकिर्दींत झालीं आहेत; परंतु, त्या सर्वांच्या महत्वाचा विचार करितां हेंच प्राधान्य ठरतें. ह्मणूनच, ह्या चरित्र लेखांत त्यांचें वर्णन केलें नाहीं.

# महाराणीसरकारचा जाहीरनामा.

प्रजानां रञ्जनार्थं सा राज्ञी नियममातनोत् ॥
स्वं स्वं धर्ममधिष्ठाय वर्तन्तां मे प्रजा इति ॥ १ ॥

आमचा देश आंग्लभौमांनीं काबीज करून त्याचें आधिपत्य ज्या वेळीं त्यांनीं मिळविलें त्या वेळीं आमच्या देशाची राज्यव्यवस्था करण्याचा अधिकार ऑनरेबल ईस्ट इंडिया कंपनीचे हातीं होता. सदर कंपनी ज्या वेळीं इंग्लंडच्या तर्फे आपला राज्याधिकार आह्मांवर चालवीत होती त्यावेळीं तो अधिकार चालविण्याबद्दल वेळोवेळीं तिजला पार्लमेन्ट सभेकडून सनदा मिळत असत. अशा तऱ्हेनें कंपनी राज्याधिकार चालवीत असतां इ० सन १८५७ सालीं आपले येथें बंड झालें ही गोष्ट हिंदुस्थानच्या प्रसिद्ध झालेल्या बारीक सारीक इतिहासाच्या अवलोकनानें साहजिक कळते; व ती वाचकांपैकीं बऱ्याच लोकांस माहीतही आहे असें धरून त्याची भाकडकथा यांत सादर करीत नाहीं. बंडाचा मोड होऊन सर्वत्र शांतता झाल्यावर ह्मणजे इ० स० १८५८ सालीं पार्लमेन्ट सभेला हिंदुस्थानचा राज्याधिकार कंपनीसर-

कारचे हातून चालण्यापेक्षां खुद्द **महाराणीसरकारनीं** स्वतः आपले नांवानें **ग्रेटब्रिटनप्रमाणें** चालविणें जास्त इष्ट आहे असें वाटल्यावरून त्या सभेनें एक कायदा करून त्या अन्वयें **हिंदुस्थानचा** राज्याधिकार **कंपनीनें** न चालवितां **महाराणीसरकारच्या** नांवानें चालवावा असें ठरविलें. इतउत्तर **पार्लमेन्टच्या** सदर कायद्याप्रमाणें **महाराणीसरकारच्या** नांवानें राज्यव्यवस्था सुरू झाली. अशातऱ्हेनें राज्यकारभार चालूं लागल्यावर **महाराणीसरकारनीं हिंदुस्थानसंबंधीं** एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. जाहीरनामा अथपासून इतिपर्यंत वाचला तर त्यावरून **महाराणीसरसरकार** न्यायी असून खरा राज्यधर्म ज्याला ह्मणतात तो पाळण्याच्या कामीं पुऱ्या दक्ष आहेत असें सहज दिसून येतें. या जाहीरनाम्याचा सरकारनें मराठींत तर्जुमा करून जिकडे तिकडे वांटलाच आहे; व हा तर्जुमा **महाराणी सरकारच्या** चरित्रांतील अतिशय महत्वाचा भाग असल्यामुळें ह्याचा अक्षरशः उतारा वाचकांचे माहितीसाठीं आम्हीं देत आहों. तो येणें प्रमाणें :—

मुक्काम अलाहाबाद, सोमवार, तारीख १ ली माहे नवेंबर सन १८५८ इसवी.

**मलिका माआझमा इंग्लिस्तान यांजकडून हिंदुस्थानांतील राजे रजवाडे, व सरदार, व इतर लोक यांस खालीं लिहिलेला मेहेरबानीचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्याविषयीं नवाब गवरनर जनरल बाहादूर यांस हुकूम सादर झाला आहे.**

**हिंदुस्थानांतील राजे रजवाडे, व सरदार, व इतर लोक यांस मलिका माआझमा दर इजलास कौन्सिल यांजकडून जाहिरनामा.**

**विक्टोरिया**—ईश्वरकृपेनें **ग्रेटब्रिटन व अयरलंड** या संयुक्त राज्याची व या राज्याच्या ताब्यांत **युरप, एशिया, आफ्रिका, अमेरिका,** आणि **आस्ट्रेलेशिया** या खंडांमध्यें ज्या वसाहती व उपराज्यें आहेत त्यां सर्वांची **मलिका माआझमा** व धर्मसंरक्षक.

आज पर्यंत हिंदुस्थानांतील मुलखांचा राज्यकारभार आमच्या वतीनें **आनरावल ईस्ट इंडिया कंपनी** चालवीत होती तो आपणच चालवावा, असें कितीएक महत्वाच्या कारणांवरून **पार्लमेंट** सभेंत जमलेले **स्पिरिच्युअल व टेंपरल लार्ड** आणि **कामन** यांच्या सल्यानें, व अनुमतानें आम्ही ठरविलें आहे.

यास्तव आह्मी आतां या जाहिरनाम्याच्या द्वारें कळवितों व प्रसिद्ध करितों कीं, वर लिहिल्याप्रमाणें सला व अनुमत घेऊन; सदर्हू राजकारभार आह्मी आपले हातीं घेतला आहे; आणि सदर्हू मुलखांतील आमच्या सर्व रयतेस फर्मावितों कीं, आमच्याशीं, आमच्या वारसांशीं, आणि आमच्या जायनिशीनांशीं तुह्मीं इमानानें, व खरोखर रयतेच्या नात्यानें वागावें; आणि यापुढें सदर्हू मुलखांचा राज्यकारभार आमच्या नांवें व तर्फे चालविण्यासाठीं, ज्या ज्या वेळीं ज्यांची ज्यांची नेमणूक आह्मी करूं त्या त्या अधिकाऱ्यांचा हुकूम तुह्मी मानीत जावा.

आमचे मोठे विश्वासू आणि फार प्रीतींतले मंत्री **नबाब चार्लेस जान वैकौन्ट क्यानिंग साहेब** यांचें इमान, व योग्यता, व शहाणपणा यांवर आह्मी पूर्ण विश्वास आणि भरंवसा ठेवून, त्यांस ह्मणजे मशारनिल्हे **वैकौन्ट क्यानिंग साहेब** यांस सदर्हू मुलखांत आमचे पहिले **वैसराय** व **गव्हरनर-जनरल** ठरवितों व नेमतों; आणि आमच्या नांवें सदर्हू मुलखांचा राज्य-

कारभार चालविण्यास, तसेंच एका मुख्य **स्टेट सेक्रेटारीच्या** मारफत जे जे हुकूम, व कायदे त्यांस वेळोवेळीं आह्मांकडून पोंचतील त्यांस अनुसरून हरएक बाबतींत आमच्या नांवें, व तर्फे वहिवाट करण्यास, त्यांस अधिकार देतों.

**आनरावल ईस्ट इंडिया कंपनी** यांणीं हल्लीं ज्या ज्या मुलकी व लश्करी कामावर जे जे असामी नेमिलेले आहेत त्या सर्वांस, त्या त्या कामावर आह्मी काईम करितों; पुढें जशी आमची मर्जी होईल, व जे कायदे व कानू आह्मी ठरवूं, त्याप्रमाणें फेरफार होतील.

हिंदुस्थानांतील राजे रजवाडे यांस आह्मी जाहीर करितों कीं, त्यां बरोबर **आनरावल ईस्ट इंडिया कंपनीनें** जे तहनामे, व करारनामे केले असतील, किंवा जे सदहू **कंपनीच्या** हुकमानें झाले असतील, ते सर्व आ-ह्मांस मान्य आहेत, व आह्मी लक्षपूर्वक पाळूं; याचप्रमाणें राजे रजवाडे यांणींही आपआपले तर्फेनें ते तहनामें, व करारनामे पाळले पाहिजेत.

आमचें जें हल्लींचें राज्य आहे तें वाढविण्याची आह्मांस अगदीं इच्छा नाहीं; आमचें राज्य, व राजाधिकार यांस धक्का पोंचविण्यास कोणीं यत्न केला असतां आह्मी त्यास शिक्षा केल्यावांचून राहणार नाहीं; आणि त्याचप्रमाणें इतरांच्या मुलखांस व हकांस धक्का पोंचेल असी गोष्ट आह्मी कधीं मंजूर करणार नाहीं. ज्याप्रमाणें आह्मी आपला अधिकार, आपला दर्जा, व आपला मर्तबा राखतों त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील राजे रजवाडे यांचा अधिकार व दर्जा व मर्तबा आह्मी राखूं. राजे रजवाड्यांची, तशीच आमच्या रयतेची आबादानी, व बढती असावी असें आह्मी इच्छितों; व हें देशांत स्वस्थता, व चांगले प्रकारची राज्यव्यवस्था असेल तरच घडेल.

आमच्या इतर सर्व रयतेविषयीं जे राजधर्म आह्मी अवश्य मानितों तेच राजधर्म हिंदुस्थानांतील आमच्या मुलखांतल्या रयतेविषयीं आह्मांस पाळिले पाहिजेत असें आह्मीं समजतों; आणि ईश्वराच्या कृपेनें ते सर्व वास्तविक रीतीनें व मन:पूर्वक पाळूं.

ख्रिस्ती धर्माच्या खरेपणावर आमचा पूर्ण विश्वास आहे, व धर्माच्या योगानें जें समाधान होतें तें स्मरून आह्मी ईश्वराचे उपकार मानितों असें आहे तरी, धर्मसंबंधी जे आमचे विचार आहेत ते आमच्या रयतेनें स्वीकारण्याविषयीं सक्ती करण्यास आह्मांस अधिकार नाहीं, व तशी इच्छाही नाहीं. धर्मसंबंधी विचाराच्या, किंवा आचरणाच्या सबबीनें कोणाची तरफदारी होऊं नये, व कोणास इजा होऊं नये, व कोणास दुःख होऊं नये, तसेंच कायद्यांचा आश्रय सर्वांस समान रीतीनें, व निःपक्षपातानें मिळावा अशी आमची आज्ञा आहे. आमच्या सर्व अधिकाऱ्यांस आमची सक्त ताकीद आहे कीं, आमच्या रयत लोकांची धर्मसंबंधी समजूत, किंवा भक्ति या प्रकरणीं त्यांणीं कोणतेही प्रकारें हात घालूं नये; घालतील तर त्यांवर आमची मोठी इतराजी होईल.

आणखी आमची अशी आज्ञा आहे कीं आमच्या रयतलोकां पैकीं जे कोणी विद्येनें, हुशारीनें, व प्रामाणिकपणानें जीं जीं सरकारी कामें यथास्थित चालविण्यास लायक असतील तीं तीं कामें, सवड असेल त्याप्रमाणें, बिनदिक्कत व निःपक्षपातानें त्या लोकांस ज्ञात, किंवा धर्म मनांत न आणितां द्यावीं.

वडिलांपासून चालत आलेल्या जमिनींवर हिंदुस्थानांतील लोकांची आसक्ति आहे ती आह्मांस माहित असून आमच्या लक्षांत आहे. सरकारचें वाजवी घेणें असेल तें घेऊन लोकांचे जमिनीसंबंधी जे जे हक्क असतील ते ते त्यांकडे सुरक्षित ठेवावे, व हरएक बाबतींत कायदे ठरवितांना, व ते अमलांत आणतांना, हिंदुस्थानांत जे प्राचीन हक्क, व वहिवाटी, व रिवाज चालत आले असतील त्यांवर योग्य नजर द्यावी, अशी आमची आज्ञा आहे.

राज्यलोभी मनुष्यांनीं स्वदेशीय लोकांस खोटे मजकूर समजावून फसविलें, आणि दंगा करण्यास प्रवृत्त केलें; अशा त्यांच्या कृत्यांनीं हिंदु-

स्थानांतील लोकांस इजा, आणि दुःखें प्राप्त झालीं येणेंकरून आम्हांस फार दुःख झालें आहे. दंगा करणारांचा पराजय करून दंग्याचा मोड केला, यावरून आमचें सामर्थ्य सर्वांस जाहीर झालें आहे.

परंतु सदर्हूप्रमाणें फसलेल्या लोकांपैकीं जे पुनः योग्य रीतीनें चालू इच्छितात त्यांवर दया करून, त्यांच्या अपराधांची क्षमा करावी अशी आमची मर्जी आहे.

अधिक रक्तस्राव न व्हावा व हिंदुस्थानांतील आमच्या मुलखांत स्वस्थता लवकर व्हावी या उद्देशानें एका प्रांतांत तर आमचे वैसराय व गवरनर जनरल यांणीं मागें जे दुःखकारक दंगे झाले त्यांत ज्या लोकांनीं सरकारच्या विरुद्ध गुन्हे केले त्या बहुतेक लोकांस, कांहीं अटी ठरवून अपराधांची क्षमा होईल अशी आशा दाखविली आहे; आणि ज्यांचे अपराध क्षमेस पात्र नाहींत अशा गुन्हेगारांस काय काय शिक्षा होईल हेंही त्यांणीं ठरविलें आहे. सदर्हू तजवीज आमचे वैसराय आणि गवरनर जनरल यांणीं केली ती आम्हांस मंजूर व कबूल आहे; व याशिवाय आम्ही आणखी जाहीर करतों तें येणें प्रमाणें:—

इंग्रज सरकारच्या रयतेचे खून करण्यांत प्रत्यक्ष संबंध असल्याची ज्यांवर शाबिती झाली असेल, किंवा होईल त्या गुन्हेगारांवर दया करणें न्यायविरुद्ध आहे; परंतु त्यांखेरीज बाकीच्या सर्व गुन्हेगारांवर दया केली जाईल.

खुनी गुन्हेगारांस ज्या लोकांनीं समजून उमजून आश्रय दिला असेल, किंवा जे दंग्यास पुढारी अथवा प्रवर्तक झाले असतील त्यांस जीवदानाखेरीज दुसरें कांहीं आश्वासन देववत नाहीं. परंतु अशा मनुष्यांस शिक्षा ठरवितांना, ते सरकाराशीं बेइमान होण्यास कोणत्या कारणावरून प्रवृत्त झाले, याचा पूर्ण विचार केला जाईल; आणि मतलबी मनुष्यांनीं उठविलेल्या खोट्या बातम्या केवळ अविचारानें खऱ्या समजून ज्या

लोकांनीं गुन्हे केले असें दिसून येईल त्या लोकांविषयीं पुष्कळ मेहेरबानीची नजर ठेविली जाईल.

सदहू मनुष्यांखेरीज जे लोक दंग्यांत असून लढाई करीत असतील ते जर आपआपल्या घरास परत येऊन स्वस्थ आपआपले कामधंदे करूं लागतील तर त्यांणीं आमच्या विरुद्ध व आमच्या राज्याविरुद्ध, व आमच्या दर्ज्याविरुद्ध केलेले सर्व गुन्हे विसरून कोणतीही अट न लागतां त्यांस माफी, व क्षमा मिळेल असें आह्मीं या जाहीरनाम्याच्या द्वारें आश्वासन देतों.

अपराधांची क्षमा, व मेहेरबानी करण्याप्रकरणीं जे नियम वर लिहिले आहेत. त्यां अन्वयें पुढील जानुआरी महिन्याच्या १ ले तारिखेपूर्वीं जे वर्तणूक करतील त्या सर्वांस माफीचे, व मेहेरबानीचे सदहू ठराव लागू करावे अशी आमची आज्ञा आहे.

ईश्वरकृपेनें जेव्हां हिंदुस्थानांत स्वस्थता होईल तेव्हां त्या देशांतील व्यापारधंद्यांस उत्तेजन द्यावें, लोकोपयोगी आणि लोककल्याणाच्या कृत्यांची वृद्धि करावी, व त्या देशांत राहणाऱ्या आमच्या सर्व रयतेचें हित होईल अशा रीतीनें राज्यकारभार चालवावा, अशी आमची मनापासून इच्छा आहे. आमच्या रयतेची आबादानी तेंच आमचें सामर्थ्य, त्यांचा संतोष तीच आमच्या राज्याची मजबुती व त्यांची कृतज्ञता तेंच अह्मांस उत्तम फळ, असें आह्मी समजतों. रयेतेच्या कल्याणाविषयीं आमच्या ज्या इच्छा आहेत त्या सिद्धीस नेण्यास सर्व शक्तिमान जो परमेश्वर तो आह्मांस व आमच्या अधिकाऱ्यांस सामर्थ्य देवो अशी प्रार्थना आहे.

# महाराणी सरकाच्या मातोश्रींचा कैलासवास

सर्वदेवमयी माता सुखानामादिकारणम् ।
सा नष्टा चेत्कुतः सौख्यं दुःखं प्रत्युत जीवनम् ॥ १ ॥

मुलांना आई हें एक दैवत आहे. जगांत आल्याव
ज्या कांहीं गोष्टींचें मुलांना ज्ञान होतें त्यांत आ
ईचें ज्ञान प्रथमतः होतें. व बापापेक्षांही आईच
आवश्यकता मुलांना फार असते. बालपणीं, दुर्दै
वानें बाप मेला व आई जर जिवंत असली तर मुलांना दिवस क
ढण्यास फारसें जड नाहीं; परंतु ह्याच्या उलट स्थिति झाली त
मात्र मुलांचें फार नुकसान होतें. कोणत्याही मनुष्याला आई
देवापेक्षांही प्रिय आहे. आपण दुखणाईत असलों अगर आपण
यःकश्चित ठेंच लागली तरी देखील देवाचें नांव जितके वेळां आ
घेतों त्यापेक्षां आपोआपच "अयाई" "आईग" असे शब्द
मुखावाटे जास्त वेळां निघतात. आई ह्मणून ज्या व्यक्तीला ह्मणाव-
याचें ती व्यक्तिच जर स्वभावतः मनुष्यमात्रास प्रिय असते तर
जी नुसती आई नव्हे परंतु सद्गुणसंपन्न आई आहे ती आपल्या

मुलाला किती बरें प्रिय असेल ? निःसंशय, तिच्या इतकी दुसरी कोणतीच वस्तू मुलाला प्रिय वाटत नसेल. अशा तऱ्हेच्या प्रिय मातोश्रीचा कैलासवास तिच्या मुलाला अत्यंत दुःखद व्हावा ह्यांत वावगें तें काय आहे ?

आपल्या दयाळू **महाराणीसरकारच्या** मातोश्री **व्हिक्टोरिआ मेरि लुईसा** ह्या सद्गुणसंपन्न होत्या ह्या गोष्टींची आमच्या वाचकांस ह्या ठिकाणीं स्पष्ट ओळख करून दिली पाहिजे असें नाहीं. त्यांनीं आपल्या पतींच्या पश्चात् आपल्या भावाखेरीज कोणाचीही मदत न घेतां आपल्या कन्येला उत्तम मुलगी व उत्कृष्ट राज्ञी केली ह्यावरूनच त्यांच्या सद्गुणसंपन्नतेबद्दलचें अनुमान आमच्या वाचकांस ह्या पूर्वींच करितां आलें असेल.

**महाराणीसरकार** सहा महिन्यांच्या होण्यापूर्वींच त्यांचे वडील मृत्यु पावले. ह्यामुळें, विवाह होऊन **महाराणीसरकार** व त्यांचे पति हीं उभयतां एकेठिकाणीं राहूं लागेपर्यंत त्या नेहमीं आपल्या मातोश्रींजवळच राहत असत. त्यांना लळा कायतो मातोश्रींचा. मामा व मातोश्री ह्या दोघांशिवाय त्यांच्या जिव्हाळ्याचें कोणीच नव्हतें; ह्मणून, मातोश्री मृत्यू पावल्यावर त्यांना आपल्यावर एक दुःखाचा डोंगर कोसळला असें वाटलें.

**महाराणीसरकारचें** लग्न होऊन त्या आपल्या पतिबरोबर राहूं लागल्यापासून त्यांच्या मातोश्री **फ्रागमूर** येथें राहत असत.

ता. १२ मार्च १८६१ रोजीं **महाराणी सरकारास** त्यांच्या मातोश्रींच्या आजारीपणाचें वृत्त कळलें. वृत्त कळतां क्षणींच

**महाराणीसरकार प्रिन्स् आलबर्टसह फ्रागमूर** येथें गेल्या. राजकुमारी **अलीस** ह्याही आपल्या वडिलांबरोबर आजीच्या समाचारास गेल्या. समाचार घेतल्यावर **महाराणी सरकार** आपल्या नेहमींच्या राहण्याच्या ठिकाणीं परत आल्या. पुढें शुक्रवारीं ह्मणजे ता. १५ रोजीं **डॉ० ब्राऊन** ह्यांनीं **महाराणीसरकारास** त्यांच्या मातोश्रीच्या दुखण्याचा चढ असल्याबद्दल तारेनें कळविलें. तार आल्याबरोबर **महाराणीसरकार प्रिन्स् आलबर्टसह** अग्निरथानें **फ्रागमूर** येथें गेल्या. शनवार ता. १६ मार्च १८६१ रोजीं सकाळीं ९॥ वाजतां **महाराणीसरकार**च्या मातोश्रीनीं परलोकीं प्रयाण केलें. ज्या दुखण्यानें ह्यांचा अंत झाला तें अवघें एका आठवड्याचें होतें. मृत्युसमयीं ह्यांचें वय जवळ जवळ ७५ वर्षांचें होतें.

राज्ञीच्या अलौकिक व सद्गुणसंपन्न अशा मातोश्री इहलोकाला सोडून गेल्याची वार्ता ऐकून संपूर्ण प्रजेस अपरिहार्य दुःख झालें. **महाराणीसरकारास** किती दुःख झालें असेल व त्यांच्या मनाला केवढा मोठा धक्का बसला असेल याची बरोबर कल्पना वर्णनानें वाचकांचे मनावर पूर्णपणें व स्पष्टपणें उमटविण्याचें सामर्थ्य विधात्यानें या वेळीं माझ्या अंगीं ठेविलें नसल्यामुळें ती बरोबर कल्पना फक्त अशा तऱ्हेचें दुःख झालें असेल त्यांनाच येईल एवढें ह्मणून हा चरित्राचे दुःखजनक भागांपैकीं एक भाग येथेंच पुरा करण्याची परवानगी घेतों.

# प्रिन्स् ऑलबर्ट यांची इहलोकची यात्रा संपली.

आल्बर्टो मृत्युमापन्नः कृतवान्मूर्च्छितां प्रियाम् ॥
गृहिणीनां जगत्यस्मिन्प्रियाधीनं हि जीवितम् ॥ १ ॥

दयाळू महाराणीसरकारांवर इ० स० १८६१ सालांत सर्वशक्ति परमेश्वराचा दोनवेळां भयंकर असा कोप झाला. ह्यांतील पहिला ह्मणजे त्यांच्या मातोश्रीनीं इहलोकांतून प्रयाण केलें हा होय. दुसरा त्यांच्या प्रिय पतीचा व त्यांचा या जगांतील अक्षयींचा समागम सुटला तो. या पतिवियोगाच्या दुर्धर अशा प्रसंगाची माहिती देणेचें अमंगल काम माझ्यावर पडलें ह्याबद्दल मी फार दुःखी आहें; परंतु, ज्या अर्थी महाराणीसरकारचें संपूर्ण चरित्र लिहिण्याचा संकल्प केला आहे, त्या अर्थी चरित्राच्या पूर्णतेविषयीं मी जबाबदार असल्यामुळें ह्या प्रसंगाची अगदीं जरूर तेवढीच माहिती देतों.

इ०सन १८६१ सालीं नोव्हेंबर महिन्यांत पोर्तुगॉल देशामध्यें नवज्वराच्या सांथीनें राजघराण्यांत मोठा कहर उडवून दिला होता. पोर्तुगॉल देशाच्या राजाचा बंधू फर्डीनांड ह्यांचाही ह्याच वेळीं

ह्याच तापानें अंत झाला. फर्डीनांड याचे बंधूवर प्रिन्स् ऑलबर्ट याचें अद्वितीय प्रेम असल्यामुळें फर्डीनांड हा कोणी परका आहे असें त्यांस वाटत नसे; व ह्मणून फर्डीनांडच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून प्रिन्स् ऑलबर्ट यांस फार दुःख झालें. याच सुमारास प्रिन्स् ऑलबर्ट यांस आपले डोक्याची स्थिती बिघडून एकंदरीनें शक्तिही दिवसें दिवस कमी होत चालली आहे असें वाटूं लागलें होतें. ह्या नंतर अगदीं थोडक्याच दिवसांनीं प्रिन्स् आलबर्ट हे नवज्वरानें आजारी पडले. ज्वराचें मुख्य कारण कोणतें याचें काय-मचें निदान कोणासच करतां आलें नाहीं. किती एक जण तापाचें कारण ते सॅन्डर्स्ट येथें स्टॅफ कॉलेजची इमारत पहावयास गेले होते. त्या पंधरा दिवसांच्या सफरींत झालेला खाण्यापिण्याचा अनियमितपणा व अव्यवस्था आणि हवा पाण्याचा बदल हें असावें असें ह्मणतात. कारणें कांहीं असोत त्यांजबद्दल आपणास विचार कर्तव्य नाहीं. कार्य घडण्यास कांहीं तरी एक बरें वाईट, लंगडें लुलें असें कारण पाहिजेच पाहिजे. आपणास प्रस्तुत स्थलीं फक्त कार्य काय घडलें या संबंधें लिहावयाचें आहे. ताप एक दिवस आला, दोन दिवस आला, काल्ची शक्ति आज नाहीं. आजची उद्यां नाहीं असा प्रकार घडत घडत सरते शेवटीं यमदूतांनीं या राजमोहऱ्यास ह्याचे वयाचे ४३ वे वर्षीं शनवार ता० १४ डिसेंबर सन १८६१ रोजीं रात्रीचे १०।।। वाजतां आमच्यामधून उचलून नेला.

प्रिन्स् आलबर्ट यांचे अंगीं प्राधान्य रीतीनें दृष्टिगोचर हो-

णारे मनमिळाऊपणा, कोणच्याही साधारण मनुष्याशीं सुद्धां प्रेमळ अंतःकरणानें व खुल्या दिलानें बोलण्याची रीत, कर्तव्य कर्म होतां-होईतों वेळच्यावेळीं बरोबर रीतीनें बजावण्याविषयींची उत्कट इच्छा, देशहिताची निश्चल अशी भक्ति, न्यायाविषयींचा पूर्ण अभिमान, मनाचा शुचिर्भूतपणा, उद्योगशीलता व कार्यदक्षता ह्या गुणांनीं ते जरी आमच्या दृष्टीच्या आटोक्या बाहेर गेले आहेत तरी ते आमच्या ज्ञानदृष्टीच्या आटोक्या बाहेर कधींही जाणार नाहींत.

ह्यांच्या मृत्यूनंतर राजनिष्ठ अशा प्रजाजनांनीं ह्यांचीं एक-नव्हे—एका पेक्षां अधिक—अशीं स्मारकें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या तऱ्हेचीं केलीं.

**प्रिन्स् ऑलबर्ट** यांची और्ध्वदेहिक क्रिया ता० २३ डिसेंबर सन १८६१ रोजीं झाली. ह्यावेळीं मंत्री, देशोदेशचे वकील, उपाध्याय, राज्ञीपुत्र **प्रिन्स् ऑफ वेल्स, प्रिन्स् आर्थर, ड्यूक ऑफ सक्सोबर्ग, महाराजा धुलिपसिंग** व आणखी कांहीं पुरुष मंडळी हजर होती.

# महाराज्ञीपुत्र आलफ्रेड अर्नेस्ट ड्यूक ऑफ एडिनबरो ह्यांचें हिंदुस्थानांत आगमन.

प्रजारक्षणदक्षेण राज्ञा भाव्यं स्वभावतः ॥
इति ज्ञात्वा राजपुत्रः प्रजां संवीक्षितुं ययौ ॥ १ ॥

इहलोकांत अवतीर्ण होऊन जो पुरुष ज्ञान संपादन करीत नाहीं त्याचें इहलोकांतील जिणें असून नसून सारखेंच गणलें जातें. ज्ञानप्राप्तीचीं अनेक साधनें आहेत; त्यांपैकीं, सच्छास्त्रांचा अभ्यास, निरनिराळ्या-देशांतील लोकांच्या आचारविचारांचें अवलोकन व मनन हीं मुख्य होत. निरनिराळ्या देशांतील लोकांचे आचारविचार आपणांस कळावयास पाहिजे असतील तर आपणांस निरनिराळ्या देशांत प्रवास केला पाहिजे. अर्थात्, देशाटन हा ज्ञान संपादनाचा उत्तम मार्ग आहे. प्रत्येक सधन मनुष्यानें ह्या मार्गाचें थोडें बहुत तरी अवलंबन करावें. ज्यांस सामर्थ्य असतें असे युरोपियन लोक देशाटन केल्याशिवाय राहत नाहींत. देशाटनामुळें पूर्वी जें ज्ञान संपादिलेलें

असतें तें दृढतर होतें, मन प्रशस्त होऊन विद्येचें अमोलिक भूषण जो विनय तो आपल्या अंगीं प्राप्त होतो. देशाटनापासून मनुष्य मात्रास जो फायदा होतो त्याचें थोडक्यांत एका कविताकारानें आपल्या कवितेंत खुबिदार रीतीनें वर्णन केलें आहे. ती कविता येणेंप्रमाणें:-

॥ केल्यानें देशाटन पंडितमैत्री सभेंत संचार ॥
॥ शास्त्रग्रंथ विलोकुनि मनुजा चातुर्य येतसे फार ॥ १ ॥

युरोपांत, ज्यांस अनुकूलता असते असे लोक देशाटन करतातच करितात. **महाराज्ञीपुत्र आलफ्रेड अर्नेस्ट ड्यूक ऑफ् एडिनबरो, प्रिन्स् ऑफ् वेल्स, ऑर्थर डुइल्यम पॅट्रिक, आलबर्ट (ड्यूक ऑफ् क्यॅनाट)** व **महाराज्ञीपौत्र प्रिन्स् आलबर्ट व्हिक्टर** हे ह्याच तत्वावर आपल्या **भरतभूमींत** येऊन गेले. तसेंच, युवराज **प्रिन्स् ऑफ् वेल्स** ह्यांनीं आपल्या पुत्रद्वयांस पृथ्वीपर्यटनार्थ मुद्दाम एका तारवावर पाठवून दिलें होतें. आश्चर्याची गोष्ट ही कीं, हे दोघे मुलगे त्या जहाजावर **मिड्शिप्मेन** ह्मणून काम करीत असत.

असो, **महाराज्ञीपुत्र आलफ्रेड अर्नेस्ट ड्यूक ऑफ एडिनबरो** हे इ. स. १८६९–७० सालीं आपल्या **भरतभूमींत** आले होते त्यासंबंधानें थोडक्यांत माहिती देतों. ती येणें प्रमाणें:–

हे, बुधवार ता० २२ माहे डिसेंबर सन १८६९ रोजीं "**गॅलाटि**" नांवाच्या आगबोटींत बसून **कलकत्यास** येऊन दाखल

झाले. ता० २३ डिसेंबर रोजीं कलकत्त्याच्या म्युनिसिपॅलिटीनें त्यांना मानपत्र दिलें. ता० २९ डिसेंबर रोजीं कलकत्ता चेम्बर ऑफ कामर्स व युनिव्हरसिटि ह्यांचीं मानपत्रें सादर करण्यांत आलीं. ता० ३० डिसेंबर ह्या दिवशीं ह्यांना "स्टार ऑफ इंडिया" हा किताब मिळाला. नंतर, काशी, दिल्ली, अलाहाबाद जबलपूर, आग्रा, लखनौ वगैरे प्रसिद्ध शहरांस आपल्या भेटीचा अलभ्य लाभ देऊन ता० ११ मार्च इ. सन १८७० रोजीं ह्यांची स्वारी मुम्बापुरींत येऊन पोंहोंचली. मुम्बापुरींत युवराजांचें यथायोग्य आदरातिथ्य करण्याविषयींच्या विचारासाठीं ता० २१ माहे जानेवारी इ. सन १८७० रोजीं एक सभा झाली. व आदरातिथ्याप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चाबद्दल फंड गोळा करण्यांत आला.

युवराज यावयाचे होते त्या दिवशीं ह्मणजे ता० ११ मार्च रोजीं दोन प्रहरपासून बोरीबंदर, भायखळा, परळ इकडे लोकांची फार गर्दी होती. बरोबर पांच वाजतां ज्या अग्निरथांत युवराज होते तो अग्निरथ बोरीबंदर स्टेशनांत येऊन ठेपला. अग्निरथाच्या अग्रभागीं चित्रविचित्र निशाणें झळकत असल्यामुळें तीं युवराज अग्निरथांत होते ह्या गोष्टीची साक्ष देत होतीं. अग्निरथ येऊन ठेपतांच नामदार गव्हरनर साहेब, श्रीमंत महाराज गायकवाड सरकार, कोल्हापुरचे महाराज, जुनागडकर, ह्यांसह सामोरे गेले. उतरल्याबरोबर युवराज परळ येथें "गव्हर्मेन्ट हाऊसमध्यें गेले.

युवराजाचे रथामागें गायकवाड सरकार, जुनागडकर, जगन्नाथ शंकरशेट ह्यांचे रथ गेले.

ता० १२ मार्च १८७०, शनिवार रोजीं सांगलीकर, मिरजकर, अक्कलकोटकर, कुरुंदवाडकर, जमखिंडीकर, सांवतवाडीचे राजे, जतकर व विंचूरकर वगैरे ह्यांणीं युवराजाला मानपत्र दिलें. हें मानपत्र कोल्हापुरचे महाराजानीं वाचिलें. तसेंच युवराजाला मुंबईच्या एकंदर लोकांनीं सुमारें ६००० वर ज्यावर सह्या होत्या असें मानपत्र सादर केलें. शिवाय, युनिव्हरसिटी वगैरेनीं युवराजाचे चरणीं आपलीं मानपत्रें सादर केलीं तीं वेगळींच.

शनिवार ता० १२ मार्च रोजीं मुंबईस दीपोत्साह झाला; नंतर युवराज एलिफन्टा केव्हज ( घारापुरीचीं कोरींव लेणीं ) पाहवयास गेले.

एप्रिल महिन्याचे सुरवातीस युवराज सीलोनास जाऊन पुढें कांहीं दिवसांनीं आपल्या देशांत परत गेले.



# प्रिन्स् ऑफ वेल्स यांचें जिवावरचें दुखणें गेलें.

मुमूर्षुमपि पुत्रं स्वं त्रायते स्म जगत्पतिः ॥
राजनी स्तुतिभिः स्तुत्वा तमेव शरणं ययौ ॥ १ ॥

महाराणीसरकार व त्यांची राजनिष्ठ प्रजा यांजवर आजपर्यंत जीं जीं कांहीं संकटें आलीं त्यांपैकीं **प्रिन्स् ऑफ् वेल्स** यांचा आजारीपणा हें एक होय. आजारी पडण्याचेपूर्वी कांहीं दिवस हे **स्कारबरो** येथें गेले होते. ह्यांचें नेहमींचें राहण्याचें ठिकाण ह्मटलें ह्मणजे **सँड्रिंगहॅम** हें होय. **स्कारबरो** येथून परत आल्यावर हे आजारी पडले. दिवसेंदिवस शक्ति नाहींशी होऊन दुखणें कोणच्या थरावर जाणार याची कोणासही बरोबर कल्पना करितां येईना. ता० २९ नोव्हेंबर सन १८७१ रोजीं **महाराणीसरकारला** आपल्या चिरंजीवांच्या आजारीपणाचें वृत्त कळतांच त्या **वुईंडसर** येथून **सँड्रिंगहॅम** येथें गेल्या. **महाराणीसरकार** तेथें कांहीं दिवस राहिल्यावर चिरंजीवास आराम पडला ह्मणून त्या परत **वुईंडसर** येथें आल्या. ता० ८ डिसेंबर रोजीं दुखणें उलटलें; आणि ह्यांचे वडील **प्रिन्स् आलबर्ट ( प्रिन्स् कन्सार्ट )** यांचा ज्या तापानें अंत झाला तोच ताप ह्यांच्या आंगांत होता असें ठरलें. आजारीपणांत ह्यांच्या भगिनी **अलिस** व गृहिणी **प्रिन्सेस ऑफ वेल्स**

ह्मा नेहमीं जवळ असत. कांहीं दिवस लोटल्यानंतर दुखण्याचा चढ होत गेला; व, रात्र आली कीं उजाडेल का नाहीं अशी रोज भीति वाटूं लागली, ह्मणून **महाराणीसरकारांकडे** **वुईंडसर** येथें मनुष्य पाठविला. निरोपाबरोबर, एक पळाचाही विलंब न करितां, **महाराणीसरकार** व राजघराण्यांतील मंडळी **सॅड्रिंगहॅम** येथें येऊन पोंचली. सर्व देशभर हाहाकार उडाला. ठिकठिकाणीं युवराजास आराम पडावा ह्मणून **परमेश्वराची** उपासना सुरू झाली. लोकांचीं मनें आपआपल्या कामधंद्यावर बसेनात. सर्वांचे डोळे युवराजाच्या बरेपणाकडे लागले व हरएक तऱ्हेचा औषधोपचार सुरू झाला.

पुढें, सुदैवानें ता. १४ डिसेंबर रोजीं ह्मणजे **प्रिन्स् ऑलबर्ट** (**प्रिन्स् कन्सार्ट**) यांणीं इहलोक सोडल्याला दहावर्षें पूर्ण झालीं, त्या दिवशीं, युवराजाच्या प्रकृतीस थोडा आराम पडला; व, आजच्यापेक्षां उद्यां बरें—उद्यांपेक्षां परवां बरें, असा उतार पडत पडत ता० १९ डिसेंबर रोजीं त्यांची प्रकृति इतकी बरी झाली कीं **महाराणीसरकार** त्या दिवशीं **वुईंडसर** येथें गेल्या. युवराजास पूर्ण आराम वाटल्यानंतर ता० २७ फेब्रुआरी १८७२ रोजीं युवराज, त्यांच्या पत्नी, व राजकुमारी **विआट्रिस्** यांसह **महाराणीसरकारांनीं** मोठ्या थाटमाटानें "**सेंन्ट पॉल्स**" नामक देवालयांत ईश्वरोपासना केली. उपासनेस जाण्याचा समारंभ फारच मजेचा झाला. ह्यावेळीं असंख्य जनसमूह बरोबर होता **फ्रान्स** देशचे राजे व राज्ञी हीं ह्मा समूहांत होतीं.

# प्रिन्स् ऑफ वेल्स युवराजाचें हिंदुस्थानांतील आगमन.

यदेक्षणपथं यातो युवराजो मनोरमः ।
अहं पूर्वमहं पूर्वं लोकस्तं दृष्टवांस्तदा ॥ १ ॥

घरधन्याला आपल्या घरांत काय काय वस्तू आहेत त्या कोठें असतात, चाकर माणसें कशीं आहेत, घरांतील इतर मनुष्यांचे स्वभाव व वर्तणूक हीं कोणत्या प्रकारचीं आहेत वगैरे गोष्टींची माहिती असणें आवश्यक आहे. अशी माहिती ज्या घरधन्याला असते त्याला त्याच्या इच्छेनुसार वाटतील तशा सोईच्या व्यवस्था करण्यास सांपडतात. आपल्या इच्छेनुसार ज्या ज्या वेळीं गोष्टी घडतात त्या त्या वेळीं आपल्या मानससरोवरांत आनंदलहरी उत्पन्न होतात; व ज्यावेळीं आपण आनंदी असतों त्यावेळीं आपणाला ज्या स्थितींत आपण असतों ती स्थिती रमणीय वाटते. आतां, ज्या घरधन्याला गृहांतील वर सांगिलेल्या गोष्टींची माहिती नसते त्याला त्याच्या इच्छेनुसार गोष्टी न घडल्यामुळें बऱ्याचवेळां गृहस्थाश्रम सुखावह होत नाहीं.

राष्ट्रासंबंधीं विचार करावयाचा असतां घरासंबंधी विचार केला

तरी तो कांहीं प्रमाद घडेल असें नाहीं. कारण, असंख्यात घरांचे एकीकरणानें राष्ट्र बनतें. घरामध्यें जशीं सर्व माणसें वयानें, अनुभवानें, व योग्यतेनें श्रेष्ठ अशा माणसाला घरधनी मानून त्याची आज्ञा शिरसा मान्य करून ह्या संसारसागरांत कालक्रमणा करितात त्याप्रमाणें संपूर्ण प्रजा राजाला योग्यतेनें श्रेष्ठ मानून त्याच्या आज्ञेचें उल्लंघन करीत नाहींत. आतां, घर व राष्ट्र हीं, जर मुळाशीं गेलें, तर एकाच तत्वावर आहेत असें ठरतें.

असें जर आहे तर राज्यकर्त्या पुरुषाला अगर ज्याला कांहीं कालानें तरी प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें राज्यकर्ता होण्याचा समय येणार अशा पुरुषाला आपले प्रजाजनासंबंधीं हरएक माहिती असणें ही आवश्यक गोष्ट आहे. राज्यकर्त्या पुरुषाला आपल्या प्रजेची माहिती नेहमीं दोनप्रकारांनीं मिळत असते. स्वतः खुद्द जातीनें मिळवावयाची हा एक प्रकार; व, दुसरा दुसऱ्याकडून मिळवावयाची तो. ह्या दोन प्रकारांपैकीं पहिला प्रकार जास्त बरा हें कोणीही कबूल करील; कारण, कलियुगमानानें विचार केला असतां, कांहीं अपवाद खेरीजकरून, दुसरा प्रकार बऱ्याच प्रसंगीं भानगडीचा व धोक्याचा असतो.

या सर्व प्रतिपादनावरून युवराज स्वतः आह्मां **हिंदुस्थान**वासी प्रजाजनांची माहिती करून गेले हा एक आह्मांवर ईश्वरीप्रसादच नव्हे काय? युवराज आपल्या राजनिष्ठ अशा **हिंदुस्थान**वासी प्रजाजनाला पाहावयास येणार ही सुवार्ता आह्मां **हिंदुस्थान**वासी

लोकांस येऊन पोंचल्यापासून आमचे नेत्र त्यांच्या आगमनाकडे लागले. युवराजांनीं **हिंदुस्थानां**तील ठळक ठळक ठिकाणें पाहून पुनः स्वदेशीं गमन केलें. त्यांचा प्रत्येक स्थळीं चांगला आदरसत्कार झाला. युवराजही प्रजाजनांनीं केलेल्या सत्काराबद्दल खूष झाले. **हिंदुस्थानां**तील ज्या ज्या ठिकाणीं ते गेले त्या त्या ठिकाणची समग्र माहिती प्रस्तुत चरित्रांत देतां येत नाहीं ह्मणून आमच्या इलाख्याचे मुख्य ठिकाणीं ह्मणजे **मुंबापुरी**ला आले त्यावेळचीच हकिकत देऊन या चरित्राचा हा भाग संपवितों.

युवराजांची स्वारी आपल्या परिवारजनासह सोमवार ता० ८ माहे नवंबर सन १८७५ रोजीं "**सरापीस**" नांवाच्या आगबोटींतून आमच्या **मुंबापुरी**ला येऊन दाखल झाली. ठरल्या-प्रमाणें युवराज ज्या आगबोटींतून येत होते ती आगबोट **कुलाब-दांडी**वरून दिसूं लागल्याबरोबर तीन तोफा झाल्या. आगबोट बंदरांत आल्यावर सहा लढाऊ जहाजांनीं, प्रत्येकीं एकवीस एकवीस तोफांची, सलामी दिली. युवराज ज्या मार्गानें गोदींतून **परळ** येथें याव-याचे होते तो सर्व मार्ग दुतर्फा आढळणाऱ्या लहान मोठ्या अशा सुंदर निशाणांनीं चित्रविचित्र झालेला दिसत होता. येथें असतांना युवराजांचा मुक्काम **परळ** येथील बंगल्यांत होता. युवराजाला पाहण्यासाठीं लोकांची वाटेनें सारखी रांग लागली होती. गाड्याघोड्यांपासून पादचारी लोकांस त्रास होऊं नये ह्मणून पोलिस अधिकारिवर्गानें आपणाकडून होईल तितकी व्यवस्था ठेविली होती. आगबोटींतून

गोदींत ज्या ठिकाणीं युवराज उतरावयाचे होते त्या ठिकाणीं बसावयासाठीं जागा तयार केली होती. त्या जागेंत सरकारचे बडे बडे अधिकारी, शहरांतील वजनदार लोक, कित्येक विद्वन्मणी, कांहीं निरनिराळ्या प्रांतांतील राजेरजवाडे वगैरे मंडळी सामोरी बसली होती. **सरसालरजंग, समशेर उमराव गायकवाड, म्हैसूरचे महाराज, उदेपूर व मेवाड** येथील **राणे, कच्छचे राव** ही मंडळी यांत होती. चार वाजण्याचे सुमारास युवराज या स्थळीं येऊन आपल्या आसनावर विराजमान झाल्यानंतर येथील म्युनसिपाल कमेटीचे सभासदांनीं त्यांस मानपत्र दिलें. मानपत्र वाचून झाल्यावर युवराजानीं जमलेल्या मंडळीचे आभार मानून **हिंदुस्थान**ची प्रजा राजनिष्ठ आहे असें मला प्रत्यक्ष अनुभवावरून निःसंशय वाटतें असें आपल्या मातोश्रीला सांगण्याचें अभिवचन दिलें. नंतर **गायकवाड, म्हैसूरचे महाराज, उदेपूरचे** व **मेवाडचे राणे, सरसालरजंग, कच्छचे राव** इत्यादिक थोर मंडळाची आपल्या योग्यतेस उचित अशा रीतीनें विचारपूस करून कांहीं बडे लोक व राजेरजवाड्यांसहवर्तमान युवराजांची स्वारी **परळ** येथें गेली.

दुसरे दिवशीं ह्मणजे ता० ९ नोव्हेंबर रोजीं युवराजांचा वाढ दिवस होता ह्मणून तन्निमित्त **मुम्बापुरींतील** बरेच ठिकाणीं व विशेषकरून **कोटांत, काळकादेवीचे** रस्त्यावर व **एलफिन्स्टन सर्कल**वर दीपोत्सव झाला.

नंतर कांहीं दिवसांनीं युवराजाची स्वारी **मुम्बापुरींतून** निघून **हिंदुस्थान**च्या प्रसिद्ध स्थळीं तीं स्थळें पाहण्याकरितां गेली; व, तीं पाहून परत आल्यावर परत स्वदेशीं गेली.

युवराजांच्या आगमनापासून **हिंदुस्थानां**तील सर्व प्रजेस आनंद झाला व त्यांच्या सर्वतोपरी मान्य अशा न्यायी व प्रेमल अशा वर्तनक्रमानें दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें.

आमचे राज्यकर्ते असेच वेळोवेळीं येऊन आमची खरी स्थिति पाहून आमचे त्यांना पाहण्यास उत्सुक झालेले नयन (थोडाच काल कां होईना) तृप्त करोत. अशी आमची जगच्चालकापाशीं मनःपुरःसर प्रार्थना आहे. कारण, प्रजेच्या बऱ्यावाईट स्थितीची योग्य कल्पना राज्यकर्त्यांचे प्रत्यक्ष नजरेनें पाहून जास्त लक्षांत येईल; व अशी प्रत्यक्ष स्थिती त्यांना कळली ह्मणजे राजा या नात्यानें पाळण्याचा जो राजधर्म तो त्यांच्याकडून योग्य पाळला जाईल. व राजधर्म योग्य पाळला गेला ह्मणजे प्रजा व राज्यकर्ता यांमध्यें ऐक्यभाव चिरस्थायी होईल.



# केसर इ-हिंद-किताब, आणि दिल्ली येथें इ० स०१८७७त भरलेला बडा दरबार.

जित्वा सर्वान्विशेषेण भूपालान् श्रुतविक्रमान् ॥
अलंचकार नो राज्ञी सार्वभौमपदं ततः ॥ १ ॥

महाराज्ञी व्हिक्टोरिआ यांजला हिंदुस्थानचें सार्वभौमत्व प्राप्त झाल्यावर पार्लमेन्ट सभेनें महाराणी सरकारास (इंग्रजींत) "एम्प्रेस ऑफ इंडिया" (मराठींत) केसर-इ-हिंद असा किताब असावा अशाविषयीं कायदा ठरविला; व पार्लमेन्टच्या सदर कायद्यानुसार महाराज्ञीनें नवीन धारण केलेला किताब आह्मां हिंदुस्थानवासी प्रजाजनास महशूर व्हावा ह्मणून विलायतसरकारच्या हुकुमावरहुकुम आमच्या हिंदुस्थानांतील मोंगलाईतल्या प्रसिद्ध दिल्ली शहरीं एक जंगी दरबार ता० १ जानेवारी १८७७ रोजीं त्यावेळच्या हिंदुस्थानच्या गव्हरनर जनरल साहेबांच्या अध्यक्षतेखालीं भरला.

**निजाम, शिंदे, होळकर** आदिकरून सर्व राजेरजवाड्यांना व इतर बड्या कामगार मंडळीला दरबारास हजर राहण्याविषयीं निमंत्रण झालें होतें. निमंत्रणाप्रमाणें **निजाम, शिंदे, होळकर, ह्मैसूरचे महाराज** वगैरे कांहीं खेरीज करून झाडून सारे राजे रजवाडे, बडे कामगार अशी मंडळी दरबारास हजर होती.

पुरातनकाळीं पंडूराजे निवर्तल्यावर **दुर्योधन** याजकडे वडील घराण्याच्या नात्यानें जरी राज्याधिकार चालविण्याचा अधिकार आला होता तरी या सोमवंशी कुळांतील लहान घराणें राज्य चालवीत असे. राज्याधिकार स्थापन करण्याचे हेतूनें **धर्मराजानें** आपल्या कनिष्ठ बंधूंकडून प्रथमतः सर्व पृथ्वी जिंकून नंतर सर्वांकडून आपलें सार्वभौमत्व कबूल करविण्याकरितां ज्याप्रमाणें **हस्तिनापुरीं राजसूययज्ञ** करविला होता त्याप्रमाणें **हस्तिनापुरीं** ह्मणजे **दिल्ली** शहरीं घडलेला सदहू समारंभ होय. **आंग्लभौमांनीं** प्रथम **हिंदुस्थानां**तील सर्व राजे जिंकून नंतर त्यांजकडून आपलें सार्वभौमत्व कबूल करून घेण्याकरितां हा समारंभ करविला होता हें उघड सांगितल्याशिवाय कळणार नाहीं असें नाहीं.

**राजसूययज्ञा**चे वेळीं ज्याप्रमाणें मुख्य विधि यज्ञाचा होता त्याप्रमाणें सदर दरबारचा मुख्य विधी इंग्लंडध्वजारोपण करण्याचा होता.

दरबार ज्या जागेंत भरला होता ती जागा शहरापासून तीन मैल लांबीवर असून त्या सुशोभित केलेल्या जागेचे एकाबाजूस एक उत्तम सिंहासन **गव्हरनर जनरल** साहेबांकरितां तयार केलें

होतें. ह्या सिंहासनासमोर एक अर्ध चंद्राकृती आकाराचें दुसरें विस्तीर्ण आसन तयार करून तें **मुंबई** व **मद्रास** येथील **गव्हरनर** व **पंजाब** व **वायव्यप्रांत** येथील **लेफटेनेंट गव्हरनर** व जमलेल्या बड्या राजेरजवाड्यांकरितां ठेविलें होतें. ज्या सिंहासनावर **गव्हरनर जनरल** साहेब विराजमान झाले होते त्याच्या मागील बाजू देशोदेशचे वकील वगैरे मंडळींनीं सुशोभित केली होती.

दरबारचे दक्षिण भागाला १५००० हजार सैन्यउभें ठेविलें होतें. **गव्हरनर जनरल** साहेब बरोबर १२ वाजतां दरबारांत दाखल झाले. इतर सर्व मंडळी साहेब मजकुरांच्या अगोदरच हजर होती. **गव्हरनर जनरल** साहेब आल्याबरोबर त्यांजला इतर जमलेल्या मंडळींनीं उत्थापन दिलें; व नंतर दरबारच्या कामाला सुरवात झाली. दरबारच्या कामाला सुरवात झाल्याबरोबर **गव्हरनर जनरल** ह्यांचे हुकुमावरून मुख्य हेरल्ड ह्यांनीं दरबार भरविण्याचा उद्देश सांगून **पार्लमेन्ट** सभेनें ठरविलेला कायदा व त्या कायद्यानुरोधानें **महाराणीसरकार**चा वाढलेला किताब सांगितला. व सदरहू वाढलेला किताब सर्वमहशूर व्हावा ह्मणून जो जाहीरनामा प्रसिद्ध करावयाचा होता तो दरबारच्या मंडळीस वाचून दाखविला. जाहीरनामा वाचून झाल्यानंतर **इग्लंडची** ध्वजा उभारण्यांत आली. ध्वजा उभारल्याबरोबर १०१ तोफांची सरबत्ती होऊन **"ईश्वरा राज्ञीचें रक्षण कर"** या गाण्याचा जयघोष झाला

ह्यानंतर **गव्हरनर जनरल** साहेबांनीं भाषण केलें. त्या भाषणाचा सारांश येणें प्रमाणेः—

**महाराज्ञी व्हिक्टोरिआ** ह्यांचें राज्य संपूर्ण भूतलापैकीं बऱ्याच भागावर आहे. **महाराज्ञीचें हिंदुस्थानां**तील प्रजेवर ज्या प्रमाणें प्रेम आहे त्या प्रमाणें इतर कोणत्याही भागांतील प्रजेवर नाहीं. **हिंदुस्थान**देश **महाराणीसरकार**च्या पूर्वजांनीं मिळविला असून त्याचें सार्वभौमत्व आपल्या कुटुंबाकडे निरंतर असावें अशी **महाराणीसरकार**ची इच्छा आहे, ह्मणून **हिंदुस्थानां**तील राजेरजवाडे यांच्या हक्कांचें संरक्षण करणें व प्रजेचें चांगल्या रीतीनें कल्याण करणें ही आपली इतिकर्तव्यता आहे असें त्या समजतात. यापूर्वीं या देशांत अरेरावी असून "बळी तो कान पिळी" हें तत्व बनलें होतें. हल्लीं त्याच्या अगदीं उलट स्थिती असून वित्त आणि जीवित यांच्या सुरक्षितपणाबद्दल भीति बाळगण्याचें मुळींच कारण राहिलें नाहीं. **महाराणीसरकार** यापुढेंही **हिंदुस्थाना**संबंधीं पराकाष्ठेची काळजी घेतील.

नंतर साहेब मजकुरांनीं मुलकी व लष्करी खात्यांतील गोऱ्या अंमलदारांची त्यांनीं केलेल्या मेहनतीबद्दल स्तुति करून **महाराणी सरकार**च्या तर्फेनें त्यांचे आभार मानिले; व नेटिव राजांस

"तुह्मी राजभक्त आहां ही एक स्पृहणीय व आनंद मानण्याजोगी गोष्ट आहे. तुमच्या या वर्तनानें **ब्रिटिश** राज्यास बळकटी येईलच. तुमचें व **महाराणी सरकार**चें हित एकच आहे असें खुद्द **महाराणीसरकार** समजतात" असें बोलले.

या वेळीं जो जाहीरनामा प्रसिद्ध झाला त्याचे सरकारानें निरनिराळ्या भाषेंत तर्जुमे करून ते प्रसिद्ध केले त्या तर्जुम्यांपैकीं मराठी तर्जुमा अक्षरशः आमचे वाचकांसाठीं आह्मीं यांत सादर करितों तो येणेंप्रमाणेः—

# मलिकामा आझमा यांचा जाहीरनामा.

---

## विक्टोरिया मलिकामा आझमा.

"संयुक्तराज्याचे व त्याचे उपराज्यांचे **इंपीरियल क्रौनाचे पादशाही** किताबांत आणखी किताब वाढविण्याचा अधिकार **आलिया जनाब मलिकामा आझमा** यांस देण्याविषयीं आक्ट" या नांवाचा आक्ट **पार्लमेंट** सभेचे हल्लींचे सेशनांत ठरला आहे. त्या आक्टांत असें निरूपण केलें आहे कीं, **ग्रेटब्रिटन** व **आयर्लंड** यांचा संयोग करण्याविषयींचे आक्टांत खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे. ह्मणजे सदर्हू प्रकारचा संयोग झाल्यानंतर त्या संयुक्तराज्याचे व त्याचे उपराज्यांचे **इंपीरियल क्रौनाचे पादशाही** किताब असणें ते **मलिकामा आझमा** त्या संयुक्तराज्याचे मोठे शिक्यानिशीं **पादशाही जाहीरनामा** करून जे ठरविण्याचे त्यांचे मर्जीस येतील ते **पादशाही** किताब होतील असें ठरविलें आहे; आणि त्या आक्टांत आणखी असें निरूपण केलें आहे कीं, सदर्हू आक्टावरून व तारीख १ जानुआरी सन १८०१ चे मोठे शिक्यानिशीं केलेले **पादशाही जाहीरनाम्या**वरून आमचे हल्लींचे किताब "**विक्टोरिया ईश्वर** कृपेनें **ग्रेटब्रिटन** व **आयर्लंद** या संयुक्तराज्याची **मलिकामा आझमा** व **धर्मसंरक्षक**" हे आहेत; आणि त्या आक्टांत आणखी असें निरूपण केलें आहे कीं, **हिंदुस्थान**चा राज्यकारभार अधिक चांगले रीतीनें चालण्याविषयीं आक्ट आहे त्या आक्टांत खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे ह्मणजे **हिंदुस्थान**चा राज्यकारभार आजपर्यंत आमचे वतीनें

ईस्टइंडिया कंपनीचे स्वाधीन होता तो आमचे स्वाधीन व्हावा व यापुढें हिंदुस्थानचा राज्यकारभार आह्मी व आमचे नावानें चालवावा व राज्यकारभार आह्मांकडे सदर्हूप्रमाणें आल्याचे निशाणीबद्दल आमचे किताबांत आणखी किताब वाढवावा हें योग्य आहे असें ठरविलें आहे; आणि त्या आक्टांत सदर्हू गोष्टीचें निरूपण केल्यानंतर असें ठरविलें आहे कीं हिंदुस्थानचा राज्यकारभार आह्मांकडे आल्याची सदर्हू प्रकारची निशाणी असावी ह्मणून संयुक्तराज्याचे व त्याचे उपराज्यांचे इंपेरिअल क्रौनास हल्लीं जे किताब आहेत त्यांत संयुक्त राज्याचे मोठे शिक्क्यानिशीं आमचा पादशाही जाहीरनामा करून आह्मांस योग्य वाटेल त्याप्रमाणें आणखी किताब वाढविण्याचा अधिकार आह्मांस आहे. एशियास आमचे प्रिविकौन्सिलचे सल्ल्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्याचें व ज्ञापन करण्याचें आह्मांस योग्य वाटलें आहे. आणि सदर्हू सल्ल्यानें आह्मी या जाहीरनाम्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरवितों व ज्ञापन करतों. ह्मणजे ज्या चार्टरांचा व कमिशनांचा व लेटर्स पेटंटांचा व ग्रांटांचा व रिटांचा व आपैंट मेंटांचा व तसेच दुसरे दस्तऐवजांचा अंमल संयुक्त राज्याबाहेर नाहीं ते सर्व चार्टर व कमिशनें व लेटर्स पेटंट व ग्रांट व रिटें व आपैंटमेंट व तसे दुसरे दस्तऐवज खेरीज करून ज्या इतर प्रसंगीं व ज्या इतर दस्तऐवजांत आमचे किताबांचा उपयोग करण्यांत येतो त्या सर्व इतर प्रसंगीं व त्या सर्व इतर दस्तऐवजांत संयुक्तराज्याचे व त्याचे उपराज्यांचे इंपिरियल क्रौनाचे हल्लीं जे किताब आहेत त्यांत खालीं लिहिलेला आणखी किताब वाढवावा ह्मणजे ल्याटीन भाषेंत "इंडिई इंपेन्याटिक्स" हे शब्द व इंग्रजी भाषेंत "एम्प्रेस आफ् इंडिया" हे शब्द वाढवावे असें आह्मी ठरवितों व ज्ञापन करतों.

आणि आमची आणखी अशी इच्छा व मर्जी आहे कीं, या जाहीरनाम्यांत वर मुद्दाम खेरीज केलेल्या कमिशनांत व चार्टरांत व लेटर्स पेटंटांत व ग्रांटांत व रिटांत व आपैंटमेंटांत व तसेच दुसरे दस्तऐवजांत सदर्हू वाढविलेला किताब घालूं नये.

आणि आमची आणखी अशी इच्छा व मर्जी आहे कीं, जें सोन्याचें व रुप्याचें व तांब्याचें नाणें हल्लीं संयुक्तराज्याचे चालू व कायदेशीर नाणें आहे तें सर्व सोन्याचें व रुप्याचें व तांब्याचें नाणें आणि जें, सोन्याचें व रुप्याचें व तांब्याचें नाणें या तारखेस किंवा या तारिखे नंतर आमचे हुकुमावरून तसेंच छापाचें पाडण्यांत येईल तें सर्व सोन्याचें व रुप्याचें व तांब्याचें नाणें आमचे किताबांत सदर्हू प्रकारचा किताब वाढविला आहे. तथापि सदर्हू संयुक्तराज्याचें चालू व कायदेशीर नाणें आहे असें समजावें. आणि ज्या नाण्यावर आमचे किताब किंवा त्यांचा कोणताही भाग किंवा कोणतेही भाग असतील व जें सदर्हू संयुक्तराज्याचे उपराज्यांपैकीं कोणतेही उपराज्यासाठीं पाडलें असेल व त्यांत चालविलें असेल व जें सदर्हू प्रकारचें उपराज्याचें चालू व कायदेशीर नाणें आमचे **जाहीरनाम्या**वरून ज्ञापित केलें असेल. जें सर्व नाणें यापुढें पाडण्यांत येईल व चालू करण्यांत येईल तें सर्व नाणें सदर्हूप्रमाणें किताब वाढविला आहे तथापि त्या नाण्याबाबद आमची मर्जी आणखी ज्ञापित करण्यांत येई तोंपर्यंत सदर्हूप्रकारचें उपराज्याचें कायदेशीर व चालू नाणें ह्मणून चालू राहील.

आमचे **वुइंडसर** येथील कोर्टांतून तारीख अठ्ठाविसावी एप्रिल सन अठरारों शाहात्तर रोजीं आमचे कारकीर्दीचे एकूणचाळिसावे वर्षांत दिला.

**ईश्वर मलिकामा आझमाचें संरक्षण करो.**

वमजिवे हुकम.

**वंदेगान आलीजनाब, नवाब मुस्तताब,**

**मो अल्ला अलकाब**

**कमरिकाब, अशरफुल अशराफ इंडियाचे व्हैसराय व गवरनर जनरल** साहेब बहादूर, **दर इजलास कौन्सिल.**

( True translation )

Sd. Venayak Wassoodew, oriental translator to Government.

# राजकन्या ॲलिस हिचा स्वर्गवास.

॥ अपत्यं सर्वस्नेहानां पितॄणामास्पदं यतः ॥
॥ हरता मृत्युना तत्किं निघृणेन नहि कृतं ॥ १ ॥

आईचें मुलावर जें प्रेम असतें त्याहून भिन्न असें प्रेम मुलीवर असतें. कोणच्याही कुटुंबांत पहा, मग तें श्रीमंत असो वा गरीब असो, मुलींनासुद्धां बापापेक्षां आईचा ओढा जास्त असतो. मुलगी सासऱ्यास जावयास निघाली तर बापाचा निरोप घेतांना, बहुतेक उदाहरणांत, मुलीच्या डोळ्यांतून आसवें येत नाहींत; परंतु आईचा निरोप घेतांना, ती धळधळां रडूं लागते. आईलाही मुलगी नीट नांदून कर्तीसवर्ती होईपर्यंत तिची नेहमीं काळजी असते. त्यांत जर मुलगी सद्गुणी असेल व मातापितृसेवेंत तत्पर असेल तर कुटुंबांत ती प्रिय होते. अशा सद्गुणी व मातापितृसेवेंत तत्पर असणाऱ्या मुलींत शोभेल अशीच राजकन्या ॲलिस ही होती. राजकन्या ॲलिस हिनें आपल्या बापाच्या शेवटल्या दुखण्यांत उत्तम तऱ्हेची शुश्रूषा केली हें ह्यापूर्वी वाचकांस माहीत झालें आहेच. तसेंच पतीच्या आमरणवियोगानें महाराणी सरकारास जें दुख झालें त्या दुःखाचें अंशतःतरी सांत्वन

राजकन्या ॲलिस हिनें केलें. **महाराणी सरकार**च्या मनांत पतीच्या अक्षयींच्या वियोगामुळें जेव्हां जेव्हां दुःखाचे उमाळे येत तेव्हां तेव्हां **ॲलिस** ही अपल्या समयोचित वर्तनानें त्या उमाळ्यांस **महाराणी सरकार**च्या अंतःकरणांत उच्छृंखल होऊं देत नसे. हिच्या सान्निध्यापासून **महाराणी सरकार**च्या अंतःकरणांत पतीच्या अक्षयींच्या वियोगामुळें झालेली जखम भरल्यासारखी वाटत होती. परंतु जेव्हां आवडती **ॲलिस** परलोकवासी झाल्याची दुःखवार्ता **महाराणी सरकार**ला कळली तेव्हां भरल्यासारखी वाटत असलेली जखम पुन्हा विदारण होऊन असह्य अशा मानसिक वेदना त्यांना बऱ्याच कालपर्यंत सहन कराव्या लागल्या.

पित्याचे सर्व गुण हिजमध्यें विधात्यानें जशाचे तसे ओतले होते. ही फार परोपकारी, शहाणी, व दूरदर्शी अशी होती. **महाराणी सरकार**ची लाडकी कन्या ह्मणजे कायती एक ॲलिस होती. ही **महाराणी सरकारा**कडे आली कीं त्यांना हिला कोठें ठेवूं आणि कोठें न ठेवूं असें होत असे. पतीच्या मागें **महाराणी सरकारा**जवळ ही बहुतेक असे ह्यामुळें हिचा मृत्यु **महाराणी सरकारा**स अत्यंत दुःखद झाला. ही ता० १४ डिसेंबर १८७८ शनिवार रोजीं परलोकवासी झाली.

# महाराज्ञीपुत्र लिओपोल्ड जॉर्ज डंकन ड्यूक ऑफ ऑलबनी ह्यांचा अकालिक मृत्यु.

नष्टपुत्रैव जानाति पुत्रवत्या: सुखं ध्रुवम् ॥
नहि मूढो विजानाति विदुषां च परिश्रमम् ॥ १ ॥

मनुष्य मात्राचे आपल्या या मृत्युलोकच्या वस्तींत तो कितीही सुदैवी असला तरी आयुष्यकालक्रमणेचे सर्वच दिवस सारखे जातात असें नाहीं. प्रत्येक जणाला मग तो मनुष्य राजा असो कीं रंक असो; थोर असो कीं लहान असो; पुरुष असो कीं स्त्री असो; मोठा पंडित असो कीं अक्षरशत्रु असो; बलवंत असो कीं बलहीन असो; सद्गुणी असो कीं दुर्गुणी असो; त्याला निदान कोणचाना कोणचा तरी दिवस कोणच्याना कोणच्या तरी कारणानें अगर कारणांनीं वाईट हा जाणारच. या सर्वव्यापक सिद्धांतानुसार इ० सन १८८४ सालच्या मार्च महिन्यांतील एक दिवस आपल्या **महाराज्ञीस** वाईट गेला. तो दिवस ह्मणजे त्यांचे कनिष्ठ व चतुर्थ चिरंजीवाच्या अकालिक मृत्यूची बातमी त्यांना ज्या दिवशीं पोंचली तो. **महाराज्ञीचे** हे चिरंजीव अगदीं बालपणापासून तों तहत या लोकांतून प्रयाण

करीपर्यंत विद्याव्यसनीं असल्यामुळें त्यांनीं शरीरप्रकृतीकडे योग्य लक्ष दिलें नव्हतें; व ह्मणूनच त्यांची प्रकृती बांगडी सारखी नाजूक झाली होती. हे उत्तम वक्ते असून कांहीं कालपर्यंत **पार्लमेन्ट** सभेचे सभासदही होते. ह्यांचे अंगीं चित्रकलेंत प्राविण्य आलें होतें. ह्यांच्या पत्नी सुशील असल्यामुळें गृहस्थाश्रमांतील जाण्यास खडतर अशा पंथापासून यांस काडीचीही इजा झाली नाहीं. हे जात्या नाजुक व अशक्त असल्यामुळें ह्यांजला त्यांच्या तेथील पूर्व दिशेनें वाहणाऱ्या वाऱ्याची रूक्षता त्यांच्या शरीरप्रकृतीस हितावह होणार नाहीं असें वाटलें. ह्मणून ते आपल्या प्रियपत्नीला **क्लेरमाउन्ट** येथें ठेवून **फ्रान्स** देशांत **कॅनिस** नांवाचें शहर आहे त्या शहरीं गेले. **कॅनिस** येथील हवापाणी त्यांना बरें मानवलें. परंतु, ता० २७ मार्च रोजीं हे जिन्यावरून खालीं उतरत असतां पाय घसरून पडले. पडल्यापासून फक्त गुडघ्यालाच थोडीशी इजा झाली. दुसरे दिवशीं रात्रौ अपस्मारासारखा एक झटका येऊन ह्यांच्या शरीरांतील पंच महाभूतें पृथक् झालीं.

वेळ आली ह्मणजे यत्किंचित् कारणावरूनही मनुष्याचा प्राण जातो. नाहींतर सहा सहा महिने खितपणीला पडलेल्याचे प्राण जातां जात नाहींत.

ह्यांची और्ध्वदेहिक क्रिया ता० ५ एप्रील सन १८८४ रोजीं ह्यांचे ज्येष्ठ भ्राते **प्रिन्स् ऑफ वेल्स** ह्यांच्या हस्तें झाली.

# महाराज्ञीच्या राज्यांतील पंचाशद्वार्षिकोत्सव

( ज्युबिली सन १८८७ )

पञ्चाशद्वर्षपर्यंतमन्तरेणाहवं यतः ॥
राज्यं कृतं न केनापि ज्ञात्वैवं चक्रुरुत्सवम् ॥ १ ॥

बरींच उदाहरणें लक्षांत आणलीं असतां लक्ष्मी व तदंगभूत असणारें ऐश्वर्य हीं दोन्ही कोणत्याही एकाच राष्ट्रांत अगर व्यक्तींत बराच कालपर्यंत वास्तव्य करितात असें अनुभवास येत नाहीं; व ज्या राष्ट्राचे अगर व्यक्तीचे ठायीं लक्ष्मी व तदंगभूत असणारें ऐश्वर्य ह्या दोन्ही गोष्टी बराच कालपर्यंत वास्तव्य करितात तें राष्ट्र अगर ती व्यक्ती अर्थातच भाग्यशाली होय. आतां लक्ष्मी व ऐश्वर्य हीं दोन्हीही एकदिलानें ज्या व्यक्तींत अगर ज्या राष्ट्रांत दृष्टिगोचर होतात त्यांतील एक व्यक्ति आपल्या भाग्यशालिनी **व्हिक्टोरिआ राज्ञी** व दुसरी ज्या जगाच्या भागावर त्या राज्य करितात तें त्यांचें राष्ट्र हीं होत.

इंग्लंडच्या इतिहासांत ज्यांना राज्योपभोग ५० वर्षेपर्यंत सतत व अव्याहत रीतीनें घेतां आला असे तद्देशीय प्रभू फारच-

थोडे ह्मणजे संख्येसंबंधें विचार केला असतां आपल्या हाताच्या बोटां पलीकडे जावयास नको इतकेच आढळतात. असे जे कांहीं थोडे प्रभू आढळतात त्यांच्या वेळच्या देश व समाजस्थितीचा विचार केला तर हल्लीं इतकी स्वस्थता देश व समाज ह्या दोहों-पैकीं एकांतही नसल्यामुळें पंचाशद्वार्षिकोत्सवाचे कांहीं समय आले असतांही तो उत्सव प्रजाजनांचे हातून झाला नाहीं ही फार शोचनीय गोष्ट होय.

असो, आमच्या दयाळू **महाराज्ञी**च्या राज्यांत सर्वत्र सारखी शांतता असल्यामुळें प्रजाजनांच्या सुदैवानें हा शुभप्रसंग आला व तो मनःपूर्वक व कृतज्ञतापुरःसर आह्मीं सर्वांनीं साजरा. केला हें सर्वांस विश्रुतच आहे.

आह्मां सर्वत्र प्रजेच्या, आपल्या सद्वर्तनानें प्रीतीस पात्र झालेल्या **महाराज्ञी**च्या राज्याचा प्रस्तुत पंचाशद्वार्षिकोत्सव आह्मीं **हिंदुस्थानवासी** प्रजाजनांनीं ता० १६।१७ फेब्रुआरी स० १८८७. रोजीं करावा असें ठरल्यावरून तो समारंभ त्या दोन दिवशीं **हिंदुस्थान**च्या सर्व भागीं अतिशय थाटानें व आनंदानें झाला. राजनिष्ठा व स्वामिभक्ति हीं आमचे अंतःकरणांत सदैव वास्तव्य करीत असल्यामुळें आह्मीं केलेल्या उत्सवाचें बीज होऊन त्याचा परिणाम विलायतच्या वर्तमानपत्रकारांवर उत्तम तऱ्हेनें मुद्रित झाला; व त्यांनीं आमचें अभिनंदनही केलें. आमच्या राजनिष्ठेबद्दल आह्मांस तो एक बिल्लाच मिळाला

असें समजूं लागलों तर आमचा समज असमंजसपणाचा आहे असें कोणीही समंजस मनुष्य ह्मणणार नाहीं. त्या दोन दिवसांत **हिंदुस्थान**च्या २८ कोट प्रजेचीं मनें राजनिष्ठेनें प्रोत्साहित होऊन आनंदलहरींत निमग्न झालीं होतीं. मोठमोठ्या शहरांतील लोकांनीं तारायंत्रद्वारें प्रस्तुत उत्सवानिमित्त **महाराज्ञीला** विलायतेंत पाठविलेले संदेश वाचून **महाराणी सरकारांस** कितीबरें आनंद झाला असेल? व तो किती झाला ह्याची वाचकांस योग्य व अचुक कल्पना यावी ह्मणून खुद्द **महाराणी सरकारनीं मुंबईचे गव्हर्नर** साहेबांस आह्मीं केलेल्या उत्सवाप्रीत्यर्थ झालेला आनंद प्रदर्शित करण्याकरितां जी तार पाठविली ती आमच्या वाचकांचे माहितीसाठीं देतों. तिचा सारांश येणेंप्रमाणें:—

"एतद्देशीय राजे लोक हो! व राज्ञीचे राजनिष्ठ **हिंदुस्थान**वासी प्रजाजनहो! तुह्मीं माझ्या राज्याच्या पंचाशद्वार्षिकोत्सवप्रसंगीं जो आनंद प्रदर्शित केला त्याजबद्दल मी आपली फार आभारी आहें."

# महाराज्ञीपुत्र ड्यूक ऑफ क्यनॉट ह्यांचें स्वदेशीं गमन.

सुखं भुक्तं मयानेन विधिना वञ्चितेन किम् ॥
इति चिन्तानिमग्नोऽयं लोकोऽरोदीदसंशयम् ॥ १ ॥

थोर कुलांत उत्पन्न होऊन त्या कुलाला आपल्या उद्यमशीलतेनें व सद्गुणसंपन्नतेनें शोभिवंत करणें ह्यासारखें दुसरें भूषणच नाहीं. थोर कुलांत जे मनुष्य उत्पन्न होतात त्यांतील फारच थोडे लोक अशा प्रकारचे निपजतात. बड्या लोकांपैकीं बहुतेकांच्या मुलांना कलाविज्ञानादि गोष्टी शिकाव्या असें वाटतच नाहीं. कला वगैरे पोटभरू लोकांनींच शिकाव्या असा बहुतेकांचा समज झालेला दिसतो. थोर लोकांच्या मुलांचा असा समज होणें ही गोष्ट राष्ट्राचा उत्कर्ष होण्याचे कामीं अत्यंत विघातक आहे. इंग्लंड देशांत मी अमक्याचा मुलगा तेव्हां अमुकच धंदा करीन व अमुक करणार नाहीं असा लोकांचा ग्रह नाहीं. ज्या धंद्यांत ज्याची गति असेल तो

धंदा तो आपखुषीनें शिकतो व ह्मणूनच इंग्लंड आज एवढ्या उन्नतावस्थेंत आहे. ह्याचें उत्कृष्ट उदाहरण ह्मटलें ह्मणजे ज्यांच्या गमनाबद्दल आह्मी लिहीत आहों ते महाराज्ञीपुत्र ड्यूक ऑफ क्यॅनॉट हे होत. ह्यांनीं "मी राज्ञीपुत्र" "मला पैशाची-ह्मणूनच नौकरीची काय जरूर?" हे व अशातऱ्हेचे उन्नतीच्या कामीं अपायकारक असे विचार मनांत न आणतां इ. स. १८८३ च्या नोव्हेंबर महिन्यांत येथें येऊन पुढें थोडक्याच कालांत मुंबई इलाख्याच्या कमान्डर-इन्-चीफची जागा पत्करली. ह्या जागेवर त्यांनीं सुमारें साडेतीन वर्षें काम केलें. आपल्या उद्यमशीलतेनें व सद्गुणसंपन्नतेनें ह्यांनीं आपलें भाग्यशाली कुल शोभिवंत केलें ह्यांत तिलप्राय संशय नाहीं. युद्धकलेंत हे पक्के मार्मिक होते, ही गोष्ट त्यांनीं बजावलेल्या हुद्याच्या कामावरून कळून आली; व सांप्रतच्या ब्रिटिश राज्यपद्धत्यनुसार नुसते राज्ञीपुत्र ह्मणून एवढ्या जबाबदारीची जागा कधींही मिळावयाची नाहीं; अंगांत त्या जबाबदारीच्या जागेचें काम नीट रीतीनें करण्याची कर्तबगारी अवश्य लागते. ह्यावरूनही त्यांच्या अंगीं असणाऱ्या गुणांची वाचकांस कल्पना येईलच. हे आपल्या पत्नीसह आमच्या देशांत होते. ह्यापूर्वीं महाराणी सरकारचे दोन पुत्र आपल्या भरतभूमींत येऊन गेले, परंतु महाराणी सरकारच्या स्नुषांपैकीं

डचेस ऑफ क्यनॉट ह्यांनींच प्रथमतः हिंदुस्थानाला आपल्या भेटीचा अमोलिक असा लाभ दिला. ड्यूक साहेबांप्रमाणेंच डचेस ह्या भारतवर्षीय लोकांस प्रिय झाल्या. ड्यूकसाहेब आपल्या पत्नीसह ता० १३ मार्च सन १८९० रोजीं सायंकाळीं पांच वाजतां केसर-इ-हिंद नांवाच्या आगबोटीनें स्वदेशीं गेले.

# महाराज्ञीपौत्र प्रिन्स् व्हिक्टर यांचा शोचनीय मृत्यु.

सर्ववस्तुवियोगोत्थं दुःखं सह्यं च प्राणिनाम् ॥
अपत्यविरहोद्भूतं सहनीयं कदापि न ॥ १ ॥

कांहीं कालेंकरून आमचा होणारा राजा, सुगुण सौजन्य व विद्या हीं तिन्हीही अंगीं असल्यामुळें ज्यानें आपलें इहलोकांतील जिण्याचें सार्थक केलें असें ह्मणवून घेतलें, जो आपल्या सद्गुण संपन्नतेमुळें आपल्या मातापितरांचा जीव कीं प्राण बनला होता. ज्याच्या आंगचे गुण अल्पवयांतच बरेच विकसित झाल्यामुळें उत्तरोत्तर ते जास्त विकसित होणारेंच असें भाकित करण्याचा प्रजाजनांस अधिकार आला होता, असा तो राजपुत्र बोलतां बोलतां जगाच्या उंबरठ्यावरून अंगांत आंत जाण्याची शक्ति व स्थिती असल्यामुळें आंत शिरतो न शिरतो तोंच, त्याला आपल्या आवडत्या मातापितरांस, परम पूज्य अशा आजीबाईस, व राजनिष्ठ अशा प्रजेस शोकसागरांत ढकलून देऊन स्वर्गलोकचा रस्ता धरावयास लागावा हा आह्मां प्रजाजनांच्या, त्याच्या आवडत्या मातापितरांच्या

व आजीबाईच्या दैवाच्या दारुण दुर्विलासाचाच प्रभाव नव्हे काय? हर! हर! अशा प्रकारचा दुर्धर प्रसंग प्रत्यक्ष हाडवैऱ्यावरही येऊं नये. आतां तर हा प्रसंग खुद्द दयाळू **राणीसरकारच्या** कुटुंबांत आला हें पाहून **राणीसरकारच्या** सर्व राजनिष्ठ प्रजेचीं अंतःकरणें दुःखाग्नीनें होरपळलीं ह्यांत नवल तें कोणतें? व आमच्यापेक्षां राजपुत्राच्या मातापितरांच्या व आजीबाईच्या मनाची किती शोचनीय स्थिती झाली असेल याचा निर्णय वाचकांस सहज करतां येईल. यांच्या मृत्यूपूर्वी एक महिन्यापासून त्यांच्या लग्नसमारंभासंबंधीं तयारी चालली होती. परंतु, यांच्या दुर्दैवी भावी पत्नी **व्हिक्टोरिया मेरी ऑफ टेक** यांच्या नशिबीं हा सोहळा यांच्याशीं घडून येण्याचा नसल्यामुळें दुष्ट काळानें या सोहळ्यांतील नायक ह्मणजे **महाराज्ञीपौत्र प्रिन्स् व्हिक्टर** यांस आह्मांमधून कायमचें ओढून नेलें.

**प्रिन्स् व्हिक्टर** हे सन १८८९ सालीं आमच्या **भरतभूमींत** येऊन आमच्या पाहुणचाराचा योग्यरीतीनें स्वीकार करून गेले ही गोष्ट आपणां हरएकास महशूर आहेच. ते ज्या वेळीं येथें आले त्या वेळीं त्यांचे अंगीं असणारे सद्गुण आह्मांस पूर्णपणें माहित झाले; व राजाधिराज होण्यास अवश्य लागणारे गुण त्यांचे अंगीं आहेत अशी आमची खात्री झाली. व त्या वेळेपासून त्यांनीं आपल्या सद्वर्तनानें आमचीं मनें आपणाकडे आकर्षण करून घेतलीं होतीं ह्मणूनच त्यांची निधनवार्ता ऐकून दुःखानें आमचीं अंतःकरणें कळवळलीं ह्यांत विशेष तें काय?

यांचा जन्म ता० ८ जानेवारी सन १८६४ रोजीं झाला, अंतसमयीं यांचें वय २७।२८ वर्षांचें होतें. अंत गुरुवार ता० १४ माहे जानेवारी १८९२ रोजीं सकाळीं ८।९ वाजण्याचे सुमारास इन्फ्लुएनझा तापानें झाला.

ही राजघराण्यावर कोसळलेली कहराची वार्ता आमच्या मुंबापुरींत ता० १४ रोजीं सायंकाळींच येऊन पोंचली. बातमी येऊन पोंचल्याबरोबर येथील युनिव्हर्सिटीटॉवरवरील घंटेनें ओरड करून ही शोकवार्ता **मुंबापुरस्थांस** विदित केली. याच दिवशीं **नामदार गव्हरनर साहेबांचे परळ** येथील बंगल्यांत सायंकाळचे खेळ खेळण्यास कांहीं बडे लोक जमले होते त्यांस ही बातमी कळतांच त्यांचे अंतःकरणांत दुःखाचे उमाळे येऊन ते घरोघर परत गेले.

अशा तऱ्हेचा हृदयद्रावक व शोचनीय प्रसंग विधात्यानें कोणावरही आणूं नये. अशाविषयीं त्याची प्रार्थना करून माझ्या लेखणीला या वेळेस कांहींशी विश्रांति देतों.



# महाराणी सरकारचा पणतू.

ज्या प्रमाणें परप्रकाश प्रकाशित शीत चंद्राच्या आकर्षणानें अमर्याद खोल उदधिला भरती व ओहोटी प्राप्त होते त्याप्रमाणेंच सर्व शक्तिमान **विश्वचालकाच्या** कृतीमुळें मनुष्य प्राण्याच्या मनामध्यें सुख दुःखाचा विकार उद्भवतो. मनुष्याची कोणतीही स्थिती असो. असा एक नियम आहे कीं सर्वच दिवस त्याला सारखे जात नाहींत. आयुष्यक्रमाच्या कालामध्यें कधीनाकधीं तरी दुःख आपला अनुभव—मग तो थोडा कां होईना—दाखविल्या शिवाय राहत नाहीं. सर्व जगाची उत्पत्ती व लय ज्याच्यापासून व ज्याच्याठायीं आहे अशा परमेश्वरानें **महाराणी** सरकारास त्यांच्या प्रीय नातवाच्या मृत्यूनें झालेले दुःखाचा विसर पडावा ह्मणूनच कीं काय कीं ता. २३ माहे जून सन १८९४ रोजीं त्यांना एका पणतूचा लाभ करून दिला. सदरहू पणत्वंड हें **महाराज्ञी** पुत्र **युवराज प्रिन्स आफ वेल्स** ह्यांचें नात्वंड होय. सर्व देशांत ह्या राजकुलांमध्यें अवतीर्ण झालेल्या बालकाच्या जननानें आनंदी आनंद झाला व तत्संबधी असंख्यात अभिनदंन पत्रिका राजघराण्यांत सादर झाल्या.

# जामातृ निधन.

आपल्या दयाळू **महाराज्ञी सरकारच्या** कन्या **बिआट्रीस** ह्यांचे प्रीय पति **प्रिन्स हेनरी मॉरीस ऑफ बटनबर्ग** ह्यांच्या मृत्यूची हकीकत नमूद करण्याचें दुःखद काम आमच्या नशिबीं आले ह्याबद्दल फार वाईट वाटतें; परंतु **महाराज्ञीच्या** चरित्रा पैकींच तो एक भाग असल्यानें थोडक्यांत त्यासंबधीं चार शब्द लिहितो. **प्रिन्स हेनरी** ह्यांचा जन्म इ. स. १८५८ साली ता, ५ आक्टोबर रोजीं **मिलन** येथें झाला. ह्यांचा विवाह इ. स. १८८२ त जून महिन्याच्या २३ तारखेस **विपिंगहॅम** चर्च मध्यें झाला. "ब्लॉंडी" नांवाच्या आगबोटीवर २० जानेवारी सन १८९६ रोजीं हे परलोकवासी झाले. ह्यांच्या मृत्यूनें **महाराणी सरकार** व त्यांच्या कन्या **बिआट्रीस** ह्यांस अनिवार दुःख झाले.

---

# नवीं पुस्तकें.

श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर ह्यांजकडून आश्रय मिळालेलें, सुप्रसिद्ध—ब्ल्यॅकीकृत "सेल्फकल्चर" नामक इंग्रजी ग्रंथाचें मराठी भाषांतर.

## आत्मोन्नति.

किंमत एक रुपया ट० ख० १ आणा. पुस्तकाचे भाग [ १ ] मानसिक उन्नत्ति. [ २ ] शारिरिक उन्नत्ति. [ ३ ] नैतिक उन्नत्ति.

सदर्हु पुस्तक प्रो. मो. के. दामले एम्. ए.; प्रो. अ. शि. साठे एम्. ए व रा. सा. ग. कृ. देशमुख बि. एल् एल्. बी. ह्या विद्वानांनीं तपासून शुद्ध केलेलें आहे.

---

## गंगागोविंदसिंह

अथवा

## वारन हेस्तिंग्सचा उजवा हात.

किंमत दोन रुपये. ट० ख० २ आणे.

---

## बाळ गंगाधर टिळक

ह्यांचें चरित्र.


किंमत सहा आणे.

वझे आणि मंडळी,

गिरगांव ब्याक् रोड, मुंबई.

डी० के० राईलकर आणि कंपनी
वॉचमेकर्स अॅन्ड रिपेअरर्स.
ठाकूरद्वाररोड, जितेकराची चाळ.
गिरगांव पोष्ट मुंबई.

मजबुत व सुबक असून खात्रीचीं घड्याळें ७ रुपयां
पासून आमचेकडे विकत मिळतील.
फारच स्वस्त असून टिकाऊ
व वापरण्यास उत्तम.



ग्यारंटी २ वर्षाची.

आमचे दुकानांत सर्व तऱ्हेची वॉचेस, क्लाक्स, टाईमापिसेस, शेडे, सांखळ्या, गारेचे चष्मे, वगैरे किफायत भावानें विकत मिळतील. तसेंच वॉच रिपेरीस लागणारें सर्व सामान व हत्यारेंही मिळतील. तसेंच रिपेरीचें काम उत्तम प्रकारें केलें जाईल. च्यार्ज माफक. अनुभव घेतल्यावर खात्री होईलच. अर्ध्या आण्याचें टिकीट पाठविल्यास क्यॉटलाग पाठवूं.